सालअखेर " ७ " १८८

किरकोळ अंकास .................. ८४

नोटिशीबद्दल.

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस.... ८१८६

दुसरे खेपेस ........ ८१

Single copy............................ 4 as.

Advertisement

Below 10 lines...2 Rs.

er line over 10...4

Repetition per line 3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXVIII AKOLA MONDAY 12 NOVEMBER 1894 NO. 44

वर्ष २८ आकोला सोमवार तारीख १२ माह नोवेंबर सन १८९४ इ० अंक ४४

वऱ्हाडसमाचार

मिती कार्तिक शुद्ध १४ शके १८१६

हिंदुस्थानांत तूर्त दोन पक्ष आहेत आंग्लो इंडियन आणि इंडियन. इंडियना मध्यें देखील हिंदू व मुसलमान असे दोन मुख्य वर्ग असून त्यांची आपसांत फाटाफूट लागली आहे. सर्व वर्चस्व, श्रेष्ठत्व व प्रभुत्व हें आंग्लो-इंडियन आपल्या वर्तनांत नेहमीं आमच्या प्रत्यन्तरास आणून देतात. उदार मनाचे व उदात्त विचाराचे असे आंग्लो-इंडियन थोडे! बहुत करून सर्वांच्या मनाचा कल असा आहे कीं राज्यकारभारांतील मुख्य मुख्य हुद्यांच्या जागा सर्वतोपरी आंग्लो-इंडियनाच्या कलाटी उपभोगार्थ ब्रम्हदेवानें लिखित केल्या आहेत. अधिकारप्राप्ती बरोबर अक्कल, अनुभव व विद्वत्ता यांचा मक्ता मिळत असतो. आपळें देव्हारें मानवावें आणि तें चिरकाल चालावें अशा हेतूनें कित्येकांचा प्रयत्न हिंदु मुसलमानांमध्यें कलागती लावून देण्याचा असतो. बंगालचे लेफटेनंट गव्हरनर सर चार्लस इलियट स्पष्ट बोलून शिकलेल्या नेटीवा विषयीं हृद्गत मत्सरबुद्धी व्यक्त करितात. लार्ड हारिस मुंबईचे गव्हरनर संतापानें हिंदु लोकांस श्राप देत आहेत. गोरक्षणाचे दंगे व मशिदी समोरील वाद्यानिमित्त होणारे दंगे यांनीं हिंदु मुसलमान लोक उभयतां हवालदील होऊन गेले आहेत. सांप्रत हिंदूवर सरकारची गदा आहे कां कीं त्यांच्यांत शिकलेले सवरलेले लोक पुष्कळ आणि तेच ठिकाठिकाणीं आंग्लो-इंडियनाच्या सुलतानशाहीला आड येतात. आंग्लो-इंडियन पत्रकारांनीं बंधुजनोंन नेटिवावर सारखी समशेरी लेखनद्वारा चालविलीच आहे. एकंदरीनें या देशांत जम लेल्या आंग्लो इंडियनांनीं महाराणी सरकारच्या १८५८ सालच्या जाहिरनाम्यास हरताळ लावण्याची पाळी आणिली आहे. हा जाहिरनामा म्हणजे सर्व इंडियनाच्या हक्कांचा किल्ला आहे आणि तो जमीनदोस्त करण्याचा प्रयत्न जारीनें चालला आहे. जात, धर्म, व रंग यांच्या भिन्नपणामुळें महाराणी सरकारच्या प्रजेचे हक्क कांहींही कमी होणार नाहींत असा मूळ सिद्धान्त आहे तथापि त्याचें तथ्य येथील राज्यकारभारांत शेंकडा एक लक्षांश भागानें तरी दिसून येत आहे काय? कशाला येईल, नाक दाबल्या खेरीज आह्मी तोंड उघडणारच नाहीं.

## प्रांतिक जाहिरसभा

हल्लीं या प्रांतीं जमिनीवर सारा वाढविण्याविषयीं सरकारी खलबतें चालूं आहेत. साऱ्याच्या प्रश्नाप्रमाणें जंगल खात्याच्या चालूं व्यवस्थेनें देखील रयत लोक हवालदील झाले आहेत. या दोन गोष्टी जशा अत्यंत स्थानिक महत्वाच्या व लोकांच्या हिताहिताच्या आहेत तशा दुसऱ्या कांहीं राजकीय व शाळाखात्याच्या गोष्टी अत्यंत दुःखमूलक आहेत असें वऱ्हाड सार्वजनिक सभेच्या लक्षांत भरलें. तेव्हां तद्विषयक लोकमत जागृत करावें, आणि लोकमताचेंच योग्य प्रकाशन सरकारच्या दृष्टीसमोर व्हावें अशा हेतूनें प्रांतिक जाहिरसभा आकोल्यास भरविण्याचा संकल्प ठरला.

ही सभा गेल्या ३-४ तारखेस आकोलें शहरीं भरणार असल्या विषयीं सर्व प्रांतभर दुमदुमत होतें आणि या सार्वजनिक कार्यासंबंधानें सर्वत्र चळवळ चालूं होती. त्यांत मुख्यत्वेंकरून खामगांव, मलकापूर, व जळगांव, या तिन्ही तालुक्यांची फेर मोजणी संपून येथील धारा वाढविण्याच्या सूचना वरिष्ठ सरकाराकडे गेल्याविषयीं लोकांस खबर होती ह्मणून त्या तालुक्यांतील लोक या सभेला येण्या विषयीं फार उत्सुक होते. सभेचे चालक आकोल्यास राहण्याची, खाण्यापिण्याची वगैरे सर्व व्यवस्था सुयंत्र व सुरेख ठेवणार आहेत इतकेंच नाहीं तर गरीब शेतकरी वगैरे लोकांची दोन दिवस जेवण्याची व औषध पाण्याची सोय फुकट होणार आहे असें प्रसिद्ध झाल्यामुळें व उत्सुक लोकांस आश्वासनें मिळाल्यामुळें बाहेर गांवचे लोक दुसरे तारखेपासून सभेच्या स्थळीं झुंडीच्या झुंडीनें येऊं लागले. मलकापूर स्टेशनापासून तों धामणगांव स्टेशनापर्यंत प्रत्येक स्टेशनावर इतके लोक जमले कीं आगगाडींत जागा नाहीं व टिकिटें नाहींत असा प्रकार सर्वत्र झाला जागोजाग लोक थोपून राहिले. आदितवारच्या ह्मणजे सभेच्या दुसरे दिवशीच्या अखेरच्या गाडीपर्यंत आकोल्यास लोक येत होते. खेडोपाडीं व गांवोगांव सभेविषयीं एकच धांदल उडून गेली होती आणि आकोल्यास एकंदरीनें एवढा लोक समूह जमला कीं पूर्वी असा जमाव या प्रांतीं किंबहुना राष्ट्रीय सभेंत आणि पुष्कळ शहरीं एका समास्थळीं दृष्टीस पडला नसावा. परिणामीं गोड तेंच गोड या न्यायानें सिंहावलोकन केलें ह्मणजे अकोल्याच प्रांतिक जाहिरसभेचा एक अद्भुत, अदृष्टपूर्व व चित्तवेधक असा समारंभ झाला. जमलेल्या लोकांची संख्या दहा हजारावर असावी. हा समुदाय शेतकरी, पाटील, देशमुख देशपांडे शेट, साहुकार, वर्तमानपत्रवाले व दहा वीस वकील अशा नानाविध लोकांचा मिळून होता आणि त्यांत शेतकऱ्यांचा वर्ग फार मोठा असून तोच काय तो मुख्य होता. सार्वजनिक सभेनें फार उत्तम कार्यमालेस हात घातला असून सभेला लोकमताचें इतकें पाठबळ मिळालें हें सार्वजनिक सभेच्या भावी भाग्यकालाचें व प्राबल्याचें सुचिन्ह होय. सार्वजनिक सभेच्या निमंत्रणानें दहा हजारावर लोक एकत्र जमले ही गोष्ट कांहीं सामान्य नाहीं आणि ईश्वर करो आणि सभेचें लोकदत्त साम्राज्य चिरकाल सुखावह होवो!

सभागृहाची रचना नामी होती. दरवाज्याशीं एक वेलपत्तीदार अशी सुंदर कमान होती. आजूबाजूनें फुलझाडांची दुतर्फी रांग होती दवाखाना, पोष्ट आफिस, आणि सेक्रेटरीची कचेरी, व दुसरे कांहीं कोठीचे वगैरे तंबू यांनीं दर्शनी भाग शोभायमान दिसत होता. सभेचे मुख्य स्थळीं मोठा टोलेजंग मांडव दिला होता आणि क्रमशः खोल खोल असे दुतर्फी ओटे केले असून सर्वांच्या पुढें एक उंच ओटा केला होता. सर्व मांडवभर खल्या बैठकीची योजना होती. शनिवार तारीख ३ नोव्हेंबर रोजीं दोनप्रहरीं दोन वाजण्याच्या सुमारास सभेच्या कामास सुरवात झाली. अध्यक्षस्थान रा. रा. पांडुरंग गोविंद वकील यांनीं विराजमान केलें होतें. स्वागत कमिटीचे अध्यक्ष राव साहेब देवराव विनायक यांनीं प्रथम जमलेल्या मंडळींचें स्वागत केलें. त्यांच्या भाषणाचा सारांश चौथ्या पृष्टावर स्वतंत्र दिला आहे. त्याच प्रमाणें अध्यक्षांचे भाषणाचा भावार्थ त्याच्या खालींच दिला आहे. अध्यक्षांनीं आपल्या सुरुवातीच्या भाषणा नंतर राव साहेब देवराव विनायक यांस पहिली सूचना सभेपुढें आणण्या विषयीं आज्ञा केली.

### विषय १ शेतकऱ्यांची पेढी

राव साहेब देवराव विनायक यांनीं या विषयावर प्रथम सूचना केली. ते ह्मणाले कीं हा समारंभ पाहून व हा लोक समाज पाहून दुसरा विद्वान असा मनुष्य प्रेसिडेंटांनीं निवडला असतां तर ठीक होतें. पण ते व्यवहारचतुर आहेत तेव्हां भिकारी विषयावर भिकारी मनुष्यास बोलण्यास सांगितलें हेंही चांगलें झालें. शेतकरी लोक कर्जबाजारी असल्यास त्यांच्या बचावासाठीं ही पेढीची युक्ती आहे आणि मुंबईचे गव्हरनर फर्ग्युसन साहेब असतांना सर वेडरबर्न यांनीं पुरंदर तालुक्या साठीं सूचविलेल्या पेढीच्या व्यवस्थेवर या पेढीची शिस्त बसविली आहे. शेतकरी कर्जबाजारी आहेत किंवा नाहींत याचा तपास करितांना माझे मित्र राजश्री नानोपंत यांनीं इलिचपूर सारख्या उत्तम जिल्ह्यातले आंकडे दिले आहेत त्या वरून खात्री होईल उदाहरणार्थ,

दर्यापूर तालुका—गांव ३१ खातेदार १५७१, त्यांत कर्जदार ९९२, कर्जदारांच्या जमिनी वरील साऱ्याची रक्कम २०७०४ रुपये १५ आ. ९ पै. आणि या जमिनीवर कर्जाची रक्कम २९१४५९ रुपये आहे

इलिचपूर तालुका—गांव ५९; खातेदार १४०४; कर्जदारांच्या जमिनीचा सारा रुपये १६८८८ आणि त्याच जमिनीवर कर्ज २८५५४६ रुपये आहे.

खामगांव तालुक्यांतील माटरगांव व दादगांव येथील कर्जदारास सारा ४८८ रु० द्यावा लागतो आणि त्यांच्या जमिनीवर ६६४० रुपये कर्जाचा बोजा आहे त्याच तालुक्यांतील सांगवे गांवीं ४२ खातेदारांपैकीं २९ कर्जदार असून त्यांस सारा रु० ९९४. द्यावा लागतो आणि १३६५० रुपये कर्ज आहे.

वरील उदाहरणें ऐकतां क्षणींच सर्व मांडवभर शेतकरी कर्जबाजारी असल्या विषयीं एकच कलकलाट व गोंगाट झाला. शेंकडा ३३ लोक सावकारी कर्जामुळें बुडून गेले आहेत तेथें लोक सुखी कीं दुखी हा प्रश्न कोठला राहणार!

नंतर वक्त्यानें कर्जबाजारी रयत होण्याचीं कारणें दाखविण्याचा प्रयत्न केला. ते ह्मणाले कीं सारा फार जबर आहे तेव्हां जमीन विकूनही धान्य शिलकींत नसतें आणि पावसाळ्याच्या आरंभाला लागवड, वाहणी, बैलाची खरेदी वगैरे साठीं कर्ज काढावें लागतें. दुसरें कारण कित्येक असें सांगतात कीं, सारा सोपा आहे परंतु शेतकऱ्यांचा मुर्खपणा गैरसमंजसपणा, व फाजील खर्च हींच मुख्य कारणें आहेत. वेडगळपणाचे कांहीं दाखले रावसाहेबांनीं दिले. आणि कशानें हा कर्ज झालें असेल तरी रयत कर्जबाजारी आहे तेव्हां त्याला व्यवस्था कोणती योजावी? योजना अशी पाहिजे कीं सावकारांचा नाराजी न होतां शेतकऱ्याचें काम झालें पाहिजे. सावकार व्याज शेंकडा २४ घेतात पण त्यांचें मुद्दल वसूल होतां होतां पराकाष्टा होते कुणब्यांची बुडणूक होते म्हणतात पण कोर्टखर्च, अधारांतला खर्च वगैरे बजा जातां सावकारास फारसा फायदा होत नाहीं. रयत सावकार व सरकार यांचे पंच नेमून त्यामार्फत हिशोब ठेविला, शेतीच्या गहाणावर कर्ज देण्याची पेढी चालविली व व्याज दरसाल १२ प्रमाणें आकारलें तर शेतकऱ्यांची पेढी चांगली चालण्या सारखी आहे. सरकारनें वायद्या प्रमाणें हीं कर्जें वसूल करून दिलीं व स्टांप, रजिस्ट्रेशन वगैरे फीची रक्कम कमी घेतली तर सरकारची जमिन चांगली राहील, सावकार खुषी राहील आणि कर्जवान शेतकऱ्यांस मदत होईल.

कारची जमीन चांगली राहील, सावकार खुषी राहील आणि कर्जवान शेतकऱ्यांस मदत होईल.

या पेढीच्या सूचनेला अनुमोदन देण्यासाठीं रा. रा. नारायण गोविंद केतकर वकील हे उठले. त्यांच्या भाषणाचा सारांश असा कीं इंग्रजी राज्यानें सर्वत्र शांतता व आबादानी झाली. सुखरूपपणानें जीवित व वित्त हीं उपभोगतां येऊं लागली आणि साऱ्याची रक्कमही नियमित ठरली. या सुखावह राज्यपद्धतीमुळें खानदेश, इंगोली, व नागपूर इकडील मुलुखापेक्षां या प्रांतीं लोकसंख्या फार झपाट्यानें वाढली आहे. एकाचे एकवीस होतात पण एका एकाराची एकवीस एकर जमीन होत नाहीं. पडीत जमिनी वहितीस आल्या. हा राज्यस्थितीचा परिणाम झाला. निकडून प्रजेची उन्नती, उत्कर्ष व फायदा होईल ते उपाय करण्याकडे सरकार तत्पर आहे परंतु आदा पाहून खर्च करणें, बारा कोसावरून ज्याचें त्यानें घर पाहणें, इत्यादि गोष्टी व्यक्तिमात्राच्या आहेत. वऱ्हाडांत शेंकडा ८० शेतकरी आहेत आणि त्यांच्या जवळच्या जमिनीवर साऱ्याच्या सोळापट कर्ज आहे तेव्हां अशा कर्जबाजाऱ्यांच्या उद्धारार्थ उपाय कोणता? उपाय सुचविण्या पूर्वीं राजश्री केतकर ह्मणाले कीं इतर कारणापेक्षां इंग्रजी राज्यातली शांतता हेंच रयतेच्या कर्जबाजारीपणाचें मूळ कारण आहे. अलिकडे गरीब व श्रीमंत हा भेदाभेद मोडत चालला आहे. जो तो श्रीमंताचें पाहून त्यांचेंच अनुकरण सर्व व्यवहारांत करूं इच्छितो. या अनुकरणानें व समसमानतेच्या विचारानें गरीब लोक शक्तीबाहेर खर्च करितात आणि नाना विपत्तींत पडतात. शेतीवाले होते त्यांच्या शेती दुसऱ्यांच्या मालकीच्या झाल्या. दुसरा उद्योग धंदा व कारागिरी ठाऊक नसल्यामुळें पुष्कळ शेतीवाले शेतांतले मोल मजूरदार झाले. अशा मजूरदार शेतकऱ्यांची निकृष्ठ स्थिती आहे व हा वर्ग जगांतून नाहींसा होत चाललेला आहे! फक्त शेतीचे मालक जे कर्जदार आहेत त्यांच्या उन्नती साठीं कांहीं उद्योग साध्य आहे. सरकार म्हणजे पृथ्वीपती विष्णु आहे तेव्हां सरकार मदत करूं लागल्यास 'अनंत हस्ते कमलावरानें देता किती घेशील दो करानें' अशी गोष्ट होईल. परंतु सरकारावरच अवलंबून न राहतां आपल्या आपणच कांहीं खटपट केली पाहिजे. इंग्रजी पद्धतीवर व्यापारी मंडळ्या निघाल्या तर दहा दहा रुपयांच्या भागांनीं पांच सहा लक्ष भांडवल या ठिकाणीं देखील जमेल. अशा पेढीचें कर्ज काळी प्रमाणें वसूल करण्यांत आलें तर सावकाराच्या अनेक लबाड्या गणपती, जस्वद, वगैरे तात्काळ बंद होतील. लोकांच्या जवळ पोस्टल ब्यांकेतून पैसा पुष्कळ आहे. तो प्रामाणिकपणानें सव्याज पैसा परत मिळतो अशी खात्री झाल्यास व सरकारचें साह्य मिळाल्यास पुष्कळजण पेढी काढण्यास मदत करितील आणि आपले श्रम फुकट जाणार नाहींत.

या सूचनेवर मे. सलिमखान सौदागर, रावसाहेब भगवतंराव देशमुख दर्यापूरकर, राजश्री मारुती नाईक आसलकर, शेट सुरजमल, व चुनिलाल गुलाबचंदजी यांनीं शेतकऱ्यांच्या पेढीविषयी आपली संमती दर्शविली आणि पहिली सूचना सर्वानुमतें पसार झाली.

विषय २ –शेती शिक्षण व धंदे शिक्षण.

रा० रा० नारायण काशिनाथ दाते हे ही सूचना करितांना ह्मणाले कीं आपल्या देशाची व समाजाची स्थिती सुधारण्याला शेतकी पुरे नाहीं. दुसरे धंदे वाढले पाहिजेत. हल्लीं जीवनवृत्ती विषयीं भयंकर युद्ध चालू आहे. त्यामध्यें टिकाव धरणें मोठें कठीण आहे. हल्लींच्या स्थितीमध्यें आपण नामशेष होऊं. इंग्लंडच्या एका माणशी साळिना प्राप्ती ४० पौंड आहे तेथें इंडियनाची प्रत्येकीं २ पौंड असून त्यांतून कर वजा जातां बाकी २९॥ रुपये राहते. शेतीवर अवलंबून टिकाव लागणार नाहीं. युनायटेड स्टेटस, केप, आस्ट्रेलिया वगैरे द्वीपान्तरीं जमिनी पुष्कळ असल्यामुळें शेतीवर चरितार्थ चालतो. लोकसंख्या वाढली. शेती निकस झाली आणि देशान्तरावर जाण्यास लोकांस साधनें नसलीं ह्मणजे इतर धंदे निघाले तरच राष्ट्राचा निभाव लागतो. तेव्हां वऱ्हाडांत, निदान जिल्ह्याच्या सदर ठिकाणीं तरी धंदे शिक्षणाच्या शाळा काढण्या विषयीं सरकारनें व्यवस्था करावी ह्मणून मी सूचना आणिली आहे.

अनुमोदिन देते वेळीं रा. दत्तात्रय विष्णु भागवत यांनीं फक्त शेतीच्या शिक्षणाचें महत्व दाखविलें. ते ह्मणाले कीं चालत आलेल्या परंपरेच्या गोष्टी साहचर्यानें कळतात. परंतु त्याच शालागृहांतून यथःशास्त्र शिकविल्या तर फायदा पुष्कळ होईल. शेतीच्या शिक्षणानें जेथें १० खंडी उत्पन्न होतें तेथें २८ खंडी उत्पन्न करितां येईल. आणि सरकार सारा दुपटीच्या जवळ वाढविणार आहे अशा वेळीं आपण शेताच्या शिक्षणाच्या शाळा स्थापण्याविषयीं सरकारास विनंती केलीच पाहिजे. ही सूचना सर्वानुमतें पसार झाली.

विषय ३ रा – कायदे कौंसिला विषयीं.

रा० रा० मोरो विश्वनाथ जोशी या विषयावरील सूचना आणतांना मोठ्या आवेशानें, उच्च स्वरानें व सोप्या भाषेंत बोलले. यांचें भाषण पहिल्या प्रतीचें होऊन तें लोकांस फार आवडलें. त्यांच्या भाषणाचा आशय असा कीं:–

वऱ्हाड प्रांताला दोन तऱ्हेचे कायदे लागूं होतात. कांहीं सर्व हिंदुस्थाना करितां केलेले कायदे असतात ते लागूं करितात आणि कांहीं वऱ्हाडासाठीं मुद्दाम केलेले असतात. हे दोन्ही प्रकारच कायदे कलकत्याचे लाट साहेब जे व्हाइसराय यांच्या हुकमतीनें लागू होतात. व्हाइसराय साहेबांची छोटेखानी व बडें अशीं दोन कौंसिलें आहेत. त्यांत छोटेखानी कौंसिलांत मुख्य राजकीय विचार होत असतात आणि तेथें वऱ्हाडासाठीं कायदे तयार होतात. बड्या कायदे कौंसिलांत सरकारनें नेमलेले व रयतेनें निवडलेले असे कौंसिलदार असतात या बड्या कौंसलापुढें वऱ्हाडचे कायदे येत नाहींत. छोट्या कौंसलांत सरकारला जें दिसेल तेंच खरें. रयतेच्या तर्फे कोणी नसतें. जिल्हा बोर्डला वगैरे कायदे या छोटेखानीं कौंसलांत तयार होतात आणि त्या मुळें रयतेला कोणती फायद्याची गोष्ट याचा नीट विचार होत नाहीं. घाऱ्या संबंधानें तरी हीच व्यवस्था. कमिशनरांची शिफारस रेसिडेंटाकडे, रेसिडेंटाची लाट साहेबा कडे आणि लाट साहेबांच्या छोट्या कौंसलांत निकाल केला जातो. बड्या कौंसलांत रयतेचे मुखत्यार असतात आणि तेथें सरकारचीच खुद्द राय चालत नाहीं पाटीलकी व पटवारीपणा यांचा कायदा छोट्या कौंसलांत झाल्या मुळें पुष्कळ लोक बेवतनी व बेरोजगार झाले आहेत. रयतेचे मुखत्यार असते तर असा कायदा झाला नसता. येणें प्रमाणें रयतेच्या हिता कडे बिलकूल लक्ष पोचत नाहीं म्हणून वऱ्हाडचे कायदे बड्या कौंसलांत पसार व्हावे म्हणून सरकारास मारुजा करणार आहो आणि हा उपाय लोकांच्या दुःखमुळाच्या जडीला हात घालण्या सारखा आहे.

या सूचनेवर अनुमोदन देतांना रा. रा. दामोदर गणेश पटवर्धन बोलले कीं व्हाइसरायच्या बड्या कौंसलांत वऱ्हाड तर्फे मुखत्यार नाहींत तथापि पायरी पायरीनें आपले हक्क मिळविण्या साठीं सध्यां बड्या कायदे कौंसलांत वऱ्हाडचे कायदे पसार व्हावेत असें सुचविलें आहे म्हणजे निदान वऱ्हाडतर्फे नाहींत तरी आपल्या स्वदेश बांधवांनीं निवडलेल्या लोकांच्या हातून आपल्या प्रांता साठीं कायदे तयार होतील. सूचना पसार झाली.

विषय ४ था – उच्च प्रतीच्या जागे साठीं विद्येची लायकी

ही सूचना रा. रा. गोविंद नारायण काणे यांनीं आणिली. त्या वेळचें त्यांचें भाषण मंडळीस चांगलें आवडलें. त्यांच्या भाषणांतील मुद्दे असे:–

सरकारचे कामगार प्रजेचें कल्याण करणारे पाहिजेत. त्यांना मराठी, उर्दू, किंवा धेडगुजरी भाषा येत असून लोकांची बोली निदान कळली पाहिजे. कायद्याचें ज्ञान अवश्य पाहिजे आणि त्यांच्या अंगीं विद्वत्ताही पाहिजे. या गोष्टीचा अभाव असला म्हणजे फार अन्याय व जुलूम होतो आणि शिकलेले लोक पिळत असूनही शिफारशीचे व दशिल्याचे लोक पुढें सरसावून सर्वत्र अंदाधुंदी चालू होते.

या सूचनेवर अनुमोदन देतांना रा. रा. यशवंत गोविंद केसकर प्रयोशसिंग झुर्के हे बोलले कीं एका पक्षीं कायदे करणें सोपें पण ते अंमलांत आणण्याचे फार कठीण. तेव्हां अंमलदार विद्वान सुजाण, राजकार्य धुरंधर असे नेमणें फार आवश्यक आहे. कांहीं तरी विद्येच्या लायकीचा नियम लागूं केला पाहिजे. मुंबई इलाख्या प्रमाणें इकडे न्याय कोडतावर मुनसफी किंवा एल. एल. बी पसार असलेले गृहस्थांस नेमण्याची पद्धति सुरू झाली पाहिजे. अंमलदारांचें यंत्र उत्तम पाहिजे. नवशिके, अप्रबुद्ध, व अनुभव शून्य लोकांस अधिकारावर प्रथम नेमावयाचें, नंतर त्यास पुळपुळीत डिपार्टमेंटल परीक्षा देण्यास लावावयाचें आणि कोणी ती परीक्षा झाली नाहीं तर त्यास बडतर्फी द्यावयाची. ही पद्धत किती चुकीची आहे! शिफारशी मंडळीची भरती या प्रांतीं विशेष होते तेथें कांहीं नियम लागूं केले तर फार बरें!

या सूचनेच्या समर्थनार्थ बाबू शिवरतनसिंहवर्मा व केशव माधव देशपांडे तळेगांव दशसहस्रकर यांची भाषणें होऊन ही सूचना पसार झाली आणि पहिले दिवशीचा समारंभ आटोपला.

## सभेचा दिवस 2 रा.

विषय ५ वा– न्यायाचे व अंमलदारीचे अधिकार पृथक् करण्या विषयीं.

या सूचनेवर रा. रा शंकर गोविंद, बापूराव पेंडसे व बळीरामपंत पिंपळे यांची समयोचित भाषणें होऊन ही सूचना सर्वानुमतें पसार झाली. वरील वक्त्याच्या भाषणांत दिवाणी व मुलकी अधिकार एकाच अधिकाऱ्याकडे असल्यामुळें किती घोटाळे होतात याचें योग्य स्पष्टीकरण झालें.

विषय ६ वा–– सिव्हिल सर्व्हिस परीक्षा इंडियांत होण्या विषयीं

ही सूचना रा. रा. मोरो विश्वनाथ जोशी यांनीं केली. आदले दिवशीं प्रमाणें यांचें भाषण फार जोरदार व आवेषयुक्त झालें आणि श्रोत्यांचीं मनें त्या भाषणानें अगदीं हालवून दिलीं. स्टेट सेक्रेटरीचा ठराव फार अन्यायाचा, जुलूमाचा व नेटीवांचे हक्क बुडविणारा असा आहे. त्यांनीं सांगितलें कीं, पार्लमेंट सभेस अर्ज करून आपण चळवळ केलीच पाहिजे. कमिशनर, रेसिडेंट वगैरे आपल्या ह्मणण्यास प्रतिकूल असले तरी फिकीर नाहीं. आपण आपली मोहीम चालू ठेविलीच पाहिजे. पांच, सहा किंवा निदान पंचवीस वर्षांनीं तरी आपल्या श्रमाचें फळ आपणास जरूर मिळेल.

या सूचनेवर अनुमोदन देण्यास जहागिरदार मि. गुलाम अहमदखान हे उठले. यांचें भाषण बरें वठलें. हे ह्मणाले कीं विलायतचे लोक आपल्या चैनी साठीं नेटीव लोकांस मार्गे टाकीत आहेत. हा प्रश्न हिंदु, मुसलमान रजपुत, शीख वगैरे सर्व जातींस सारखाच लागूं आहे. विलायतच्या लोकांमुळें राज्यकारभाराच्या खर्चाचा बोजा भारी वाढला आहे तोही कमी होण्यास हाच मार्ग आहे.

विषय ७ वा– जमिनीच्या साऱ्या विषयीं

या विषयाची प्रस्तावना रा. रा. रंगनाथ नरसिंह मुधोळकर यांनीं केली. ते बोलले त्याचा भावार्थ असा कीं:—

वऱ्हाडांत धंदा काय तो शेतकीचा. पांढरपेशे लोक देखील शेतकरी आहेत. हा सर्वांच्या फायद्याचा आहे. यत्न करणें आपलें काम आहे. हक्क मागणें आपलें काम आहे. ते देणें सरकारचें काम. कदाचित नाहीं ह्मटलें तर नाउमेद होऊं नका. वरिष्ठ प्रतीच्या सरकारा पर्यंत जाण्याची उमेद धरा. ४१ वर्षां पूर्वीं हा प्रांत ब्रिटिश अंमला खाली आला आणि नंतर दहा वर्षांनीं जमिनीची मोजणी करून दरबंदी केली. त्या गोष्टीला आज ३० वर्षे झालीं ह्मणून पुन्हां नवीन मोजणी व नवी दरबंदी चालू आहे. मलकापूर तालुक्यांत नवीन सारा कोठें शेंकडा १००।८० असा वाढविला असून सरासरी मुळच्या साऱ्याच्या दिढीवर सारा बसविला आहे. खामगांव तालुक्यांत शेंकडा १००।६० अशी वाढ असून सरासरीची वाढ शेंकडा ४५ आहे. जळगांव तालुक्यांत आरंभाची दरबंदी फार मोठी होती ह्मणून तेथें सरासरीनें १०० रुपये साऱ्याच्या ऐवजी १२५ रुपये केला आहे. या प्रकरणांती:

( २ ) रा. रा. कृष्णाजी सदाशिव तांबे हे इंग्लंड आणि हिंदुस्थान ह्या दोन देशांत चालू असलेल्या राज्य पद्धतीची माहिती व तुलना ह्या विषयीं सहाव्या इयत्तेतील मुलांस शिकवून दाखवितील.

( ३ ) रा. रा. सदाशिव अनंत पेंढरकर ड्राइंग मास्तर आकोला हायस्कूल हे चित्रकला ह्या विषया संबंधानें भाषण

दुपारचे २ पासून ४ पर्यंत

( १ ) रा. रा. गंगाधर नारायण घाटे असिस्टंट मास्तर हायस्कूल अकोला यांचे निद्रा व तिची मीमांसा ह्या विषयावर भाषण होईल.

[ २ ] रा. रा. महादेव खंडो हेडमास्तर बार्शीटाकळी हे घन मुळाची उपपत्ति हा विषय सातव्या इयत्तेस शिकवून दाखवितील.

[ ३ ] रा. रा. गोपाळ नारायण से. अ. मा. देऊळगांवराजा हे पहिल्या सहा इयत्ता शिकविण्यास शिक्षकांनीं काय तयारी केली पाहिजे ह्या विषयावर भाषण करतील.

शुक्रवार ता० १६ माहे नोव्हेंबर

रोजीं ११ पासून १ पर्यंत.

( १ ) रा. रा. सदाशिव विनायक परांजपे हे युनायटेडस्टेटस् व मुंबई इलाखा व वऱ्हाड यांत चालू असलेल्या शिक्षण पद्धतींची माहिती व तुलना ह्या विषयावर निबंध वाचतील.

( २ ) सन १८९५ इ. साला करितां सेक्रेटरींनीं तयार केलेलें खर्चाचें अंदाज पत्रक पसार करणें.

( ३ ) पुढील साला करितां शिक्षक समाजाचे प्रेसिडेंट व सेक्रेटरी यांची निवड करणें.

दुपारचे २ पासून ४ पर्यंत

( १ ) रा. रा. गोपाळराव प्रभुणे हेड मास्तर इं. म. स्कूल देऊळगांव राजा हे अर्थशास्त्रा वरील एक धडा सहाव्या इयत्तेस शिकवून दाखवितील.

( २ ) रा. रा. सूर्यभान जानजी हेडमास्तर केळीवेळी हे ट्रेनिंग कॉलेजांत शिकलेल्या विद्यार्थ्यांच्या अडचणी व त्या दूर करण्याचे उपाय ह्या विषयावर निबंध वाचतील.

( ३ ) रा. रा. लक्ष्मण कृष्ण चिपळूनकर हेड मास्तर हायस्कूल अकोला हे मराठ्यांचा इतिहास ह्या विषयावर भाषण करतील.

शनिवार, तारीख १७ माहे नोव्हेंबर

प्रातःकाळीं ७ पासून ९ पर्यंत.

(१) आयत्या वेळेस शिक्षक लोकांकडून ज्या सूचना येतील त्यांचा विचार करणें.

( २ ) शिक्षक समाजाचे अध्यक्षांकडून समाजाचें विसर्जन.

दुपारचे २ पासून काम संपे पर्यंत.

( १ ) रा. रा. दत्तात्रय विष्णू भागवत वकील हे विद्युत् आणि तारायंत्र या विषयाची सप्रयोग माहिती देतील.

( २ ) शिक्षक समाजाचे सेक्रेटरी व इन्सपेक्टिंग मंडळीचे सेक्रेटरी हे समाजांत झालेल्या आप आपल्या कामाचे रिपोर्ट वाचतील.

[ ३ ] मेहेरबान डायरेक्टर साहेब यांचें भाषण व समाजाचें विसर्जन.

अकोला

ता० १०।११।०९४

Balwant V. Vaidya

हां से० शिक्षकसमाज.

रा. रा. बळवंतराव सोमण येथील कसरती मास्तर हे गुरुवारीं रात्रीं घोड्याच्या सर्कसचे खेळ दाखवितील व शुक्रवारीं संध्याकाळीं मुलाकडून ड्रील करून दाखवितील.

## नोटीस

खंडो अवरत राहणार असलगांव खेडा तालुके जळगांव इस नोटीस देणार रामू वल्द पिरताजी पाटील राहणार धानोरें तालुके जळगांव जिल्हा अकोलें नोटीशीनें असें कळवितों कीं तूं आमचे पासून कर्ज रुपये ( १०० ) दर शेंकडा २ दोनप्रमाणें व्याजाच्या करारानें तूं आपले पहिले नवऱ्या पासून फारकती घेण्या करितां काढले व हे रुपये तूं दुसरा घरठाव केल्यानंतर एक महिन्यानें देण्याचा करार केला होता. तू दुसरा घरठाव करून आज अजमासें सहा महिने होत आले तुजला आजी ह्या वेळेपर्यंत तीन चार वेळां रुपये मागितले परंतु अद्याप रुपये दिले नाहींत ह्मणून ही नोटीस देणें भाग पडले तर ही नोटीस पावले दिवसापासून आठ दिवसांत मुद्दल रुपये १०० व ह्यांचें आजपावेतों व्याज ह्या नोटीशीचा खर्च असें मिळून सर्व रुपये आणून देऊन निकाल करावा असें झालें नाहींतर सदरहू रुपये, व्याज व नोटिशीचा खर्च व अखेर निकाल होई पर्यंत सर्व खर्च तुजवर फिर्याद करून घेतला जाईल ह्मणून दिली नोटीस सही ता. ३-११-९४.

सही

रामु वल्द पिरताजी पाटील राहणार धानोरें द. खुद.

## नोटिस

रा. रा. पुंडू वल्द केशव पाटील रहाणार नागद तालुके बाळापूर जिल्हे अकोले यांस नोटीस देणार वर्नसिंग वल्द मानाजी पाटील रहाणार नागद तालुके बाळापूर जिल्हे अकोले नोटिशीनें असे कळवितो कीं आह्मीं तुमचे कर्ज देणें रुपये २५० दोनशे पन्नास याचा दस्तैवज तुह्मापाशी आहे. तुमचे देणें रुपये ( २५० ) याची तोड अम्ही रुपयें २२५ दोनशें पंचवीस रुपयावर केली. व एकदा रुपये २०० व दुसऱ्यांदा रुपये २५ असे मिळून रुपये २२५ तुम्हास दिले. व ठरल्या प्रमाणें आमचा दस्तैवज रुपये २५० चा व रुपये २२५ वर निकाल करून रुपये दिल्या बद्दल भरपावती तुम्हां जवळ आज एक वर्षभर मागीत आहों. तुम्ही पावती व दस्तैवज देत नाहीं. यावरून तुमचे मनांत खोटे पणा उघड दिसतो करितां तुम्हास ही नोटीस देऊन असें कळवितों कीं तुमचे आम्ही कांहीं एक देणें नाहीं. तुम्हा जवळ दस्तैवज २५० चा पोकळ आहे. पुढे मागें तुम्ही आम्हांवर सदरहू दस्तैवजा बद्दल फिर्याद वगैरे केल्यास त्याजबद्दलचे जबाबदार आम्ही नाहीं तुम्ही रुपये २२५ घेऊन पावती व दस्तैवज दिला नाहीं तर नोटीस पावताच पावती व दस्तैवज आमचा आम्हांस द्यावा व- तुम्ही विनाकारण आम्हांस ही नोटीस देणें भाग पाडले. यान करितां ह्या नोटीशीचा सर्व खर्च तुह्मी द्यावा म्हणून दिली नोटीस सही. तारीख ७ माहे नोव्हेंबर सन १८९४ इसवी

( सही )

सहीची निशाणी वखर— वर्नसिंग वल्द मानाजी पाटील रहाणार नागद यांची असे.

## NOTICE

Draft of rules made by the Akot Municipality in their special general meeting of the 20th October 1894 under section 116 (1) [e] of the Berar Municipal Law 1886 for the inspection and proper regulation of pounds is published for general information as required by section 150 (1) of the Law,

The draft will be taken into consideration on the 8th. December 1894 before which date, objections, if any will be received in writing.

1 Every pound situated within the limits of the Akot Municipality should be inspected once in every month by a person appointed or authorized by the Municipal Committee for the purpose. Such person shall sign the inspection register and compare the vouchers.

2. Every pound keeper shall follow the procedure laid down by the Cattle Trespass Act 1 of 1871 in respect to the sale of impounded animals.

3. The pound keeper's accounts shall be audited once in every month by a person appointed or authorized by the Municipal Committee for the purpose and such person shall certify the result of his andit to the Municipal Committee.

Akot D. 3rd, November 1894. — K. S. Tambe, Secretary Municipal Committee Akot.

## नोटीस

कोंडवाड्यांचे तपासणी करितां आणि चांगले व्यवस्थे करितां वऱ्हाड म्युनिसिपल कायदा कलम ११६ ( १ ) ( इ ) प्रमाणें अकोट म्युनिसिपल कमिटीनें तारीख २० माहे अक्टोबर सन १८९४ इ० रोजीं भरलेल्या स्पेशल जनरल सभेंत केलेले नियमांचा मसुदा सदरहू कायद्याचें कलम १५० अन्वयें प्रसिद्ध करण्यांत आला आहे.

सदरहू मसुदा तारीख ८।१२।९४ इ० रोजीं कमिटींत विचारा करितां घेतला जाईल तरी सदरहू नियमास कोणाची हरकत असल्यास लेखी कमिटीचे आफिसांत सदरहू तारखे पूर्वीं दाखल करावी.

१ अकोट म्युनिसिपाल हद्दींतील प्रत्येक कोंडवाडा महिन्यांतून एकदां कमिटीचे तपासणीचे कामा करितां नेमलेल्या किंवा अधिकार दिलेल्या इसमानें तपासावा. सदरहू इसमानें तपासणी रजिस्टरावर सही करावी आणि पावत्या रुजूं पहाव्या.

२ कोंडवाड्या वरील नोकरानें, कोंडवाड्यांत आलेल्या जनावरांचे विक्री संबंधी.

आक्ट १ सन १८७१

( Cattle Tresspass Act )

यांत सांगितलेले पद्धती प्रमाणें चालावें.

३ कोंडवाड्या वरील नोकरानें ठेविलेले हिशेब तपासण्या करितां नेमलेल्या किंवा अधिकार दिलेल्या इसमानें दरमहा तपासावे. व आपल्या तपासणीचा दाखला म्युनिसिपाल कमिटीस द्यावा.

K. S. Tambe
Secretary
Municipal Committee Akot

Akot 3rd. November 1894

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावे ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयी जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट नंबर ७ प्रमाणें

दि० कि० मु० नंबर १९/९४

वर्ग १५

विद्यमान डिपुटी कमिशनर साहेब जिल्हे इलिचपुर यांचे कोर्टांत.

नांव— गणु

बापाचे नांव—सखारामजी वाडेदकार कुणबी राहणार उमरी मानाबाद तालुके दर्यापुर जिल्हे इलिचपूर यांस मयत.

सखाराम बापाचें नांव भगाजी कुणबी राहणार उमरी ता. दर्यापुर जिल्हे एलिचपुर याचे कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार याणे अर्ज केला आहे त्य जकरिता सदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यात येत आहे कीं, त्याणी तारीख ५ माहे डिसेंबर सन १८९४ इसवी रोजीं सदरहू अर्जाची चौकशी होईल. त्या वेळीं या कोर्टात हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी. तारीख २६ माहे आक्टोबर सन १८९४ इसवी.

C. E. Biddulph
Offg. Deputy Commissioner,
Ellichpur District.

डि० जडज
इलिचपुर.


## घड्याळ.

कि. रुपयें ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे ( ह्मणजे चक्रांचे खालीं [illegible] हिरे बसाविलेले आहेत ) चावी देण्यास मोगरा, कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक विलायती कारखाने मुद्दाम युरोप मध्यें करविलेले. या वर आमचें नांव आहे. हें खिशांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षें दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशीक

## ह्या राजश्रीनें केव्हां तरी पळ काढला असावा.

एक गृहस्थास त्याच्या धर्मवेडा मुळें एका जुल्मी सरकारनें कारागृह दाखविला पुढें त्या कारागृहाच्या मजबूत दगडी भिंती पाहून त्याच्या मनाची खात्री झाली कीं आतां आपलें राहिलेलें आयुष्य ह्या एकांत व भयाण कारागृहांत घालविलें पाहिजे. जरी त्याला आतां पुढची गत चांगली नाहीं असें भासत होतें तरी त्याला दुःखांत सुख इतकेंच वाटत होतें कीं मला जुलमामुळें बळी व्हावें लागलें परंतु सद्वर्तनाचें उल्लंघन केल्यामुळें कांहीं नाहीं. जर त्याच्या स्वाधीनची गोष्ट असती तर ह्या संकटांतून तो सहज पार पडला असता.

असें असून त्या बिचाऱ्यास सतत सोळा वर्षें हाल काढीत राहावें लागलें. हीं वर्षें संपतात तों त्याच्या मनांत आलें कीं ह्या भिंतीवर पुढें आलेल्या दगडाच्या आधारानें वर चढावें व त्यानें खिडकीच्या वरून काय दिसतें ह्मणून वर डोकें केलें. आणि असें केल्यामुळें त्याला वाटलें कीं पुढें लोखंडाचे गज आहेत ते काढून टाकतां येतील व त्या चौकटीची आगळही लाविली नव्हती. त्याच्या मनांत घोळूं लागलें कीं काय मी पळ कां न काढावा? त्यानें खिडकी तर उघडली आणि सहा फुट उडी जमिनीवर मारली आणि त्या प्रदेशास शेवटचा राम राम ठोकला. जर त्यानें त्याच्या ठाम झालेल्या विचारास एकीकडे ठेवून बिचाराची दोरी जर सैल सोडली असती तर ह्या स्थळीं इतके दिवस कुंथत रहावें लागलें नसतें.

ह्या स्वधर्मार्थ प्राण अर्पण करणाऱ्या या बिचाऱ्याची दैवघटित गोष्ट साधक व बाधक आहे. त्याच्या मनाची धांव बंद केल्यामुळें साधक; त्याला ज्या कारणास्तव बंदींत टाकावयाचा होता तें नसल्यामुळें बाधक.

ही गोष्ट पत्र रूपानें जी सर्वांस आवडते त्या प्रमाणें खालीं थोडक्यांत व साध्या शब्दांत सांगतो. एक लेखक बाई ह्मणते कीं, आज सोळा वर्षें झालीं, पित्तक्षोभानें व अशक्तपणामुळें फारच गांजून गेले आहे. नेहमीं थकून जाऊन अगदीं हलक होऊन जाई. माझी अन्नावरची वासना उडाली, पुढें आणलेले ताटास हात लावीन [illegible]र शपथ. कित्येक दिवस माझ्यानें एक घास देखील खाववत नसे, कधीं कधीं मला मळमळ सुटे. पोटाचा नगारा होई आणि तोंडावाटें मोठा घट्ट बेडका येई.

मला फारच त्रासदायक खोकला होऊन बरगड्यांत फारच वेदना होत व दम बरोबर छाटत नसे. मी फारच हलक झाले आणि दुकानांत आंत बाहेर करण्याचा माझा तकवा अगदीं निघून गेला. सन १८९१ च्या दिसेंबरात माझ्या एका गिऱ्हाईकानें मदर सिनेलचा क्युरेटीव सीरप ( माता शिनेलचा रोगहारक पाका ) बद्दल बरेच गुणानुवाद गाईल्यामुळें मी तें औषध घेण्यास सुरूं केलें. मी थोडें येंव घेतल्या बरोबर मला बरेंच समाधान वाटलें आणि पुढें पंधरा दिवस औषध घेतलें नाहीं तरी मला बरें वाटत होतें. मला असा धीर आला ह्मणून मी अगदीं बरी होई तों पर्यंत ह्या औषधाचा उपयोग केला. आमचे चिरंजीव आरथरास एक वर्ष सतत जवरयावर जड झाल्या सारखें व वेदना होत होत्या आणि पोटाची दामटी होऊन खळगा पडल्या सारखें वाटे. त्याला हें औषध घेण्याची मी गळ घातली आणि त्याचा शेवट ह्मणाल तर माझ्या सारखाच झाला. मला पक्कें माहीत आहे कीं ह्या प्रदेशांतल्या बऱ्याच मंडळींनें दुसरे नाना उपाय करून थकल्यावर ह्या शिरपाचा ( पाकाचा ) उपयोग केला तेव्हां तात्काळ गूण आला. ह्या औषधाचा ( ह्मणजे ) माता सिनेलच्या सिरपाचा मला रामबाण गुण आला तो इतर पिडीतास ह्यामुळें यावा असें आपणास वाटत असेल तर हें पत्र आपण बेलाशक छापावें.

मी तुमची
( सही ) ( मिसेस ) एम वार्ड
१५४ इकसटन रोड
शडफर्ड. नोटिंगहाम
ता० १ ली माहे एप्रिल सन १८९२

मीसेस वर्ड बाई साहेब ह्या त्रासदायक व भयंकर रोगा पासून बऱ्या झाल्या ह्मणून आह्मी तीस अभिनंदन करतो. आपल्या आयुष्यांत सोळा वर्षांचा वांटा सतत शारीरिक व मानसिक वेदनेंत घालवावा म्हणजे फारच खराब समजावयाचें. कुबेराचे सोबती होणें फारच थोड्याच्या ललाटीं लिहिलेलें असतें. परंतु सुदृढता जसा सूर्य प्रकाश सर्वजगभर जिकडे तिकडे सारखा पसरतो तद्वत् पसरली पाहिजे. ही नोट राखावी हें ज्याला अवगत आहे तो तर त्याची काळजी घेईल व ती दूर झाल्यास आपल्या स्वाधीन करून घेईल.

ह्या बाईचा रोग पचनीय पिंडाचा म्हणजे अग्निमांद्य व अजीर्णाचा होता. हा रोग फारच धोक्याचा व दुःख देणारा आहे कारण कीं ह्या रोगाचा पगडा इतका बसतो कीं शरिरांतलीं सर्व अंगें ह्याच्या बळी पडतात व रक्ताभिसरणामुळें ह्या रोगाचें वीष सर्व शरिरांत पसरतें. ह्या रोगाचें मुख्य कारण निरनिराळ्या नांवानें होणारे परिणाम व चिन्हें हीं होत. ती जे औषध सांगते त्याच्या गुणाची ज्यास चांगली माहिती झाली आहे त्यास नवल वाटण्यास नको. मोठ मोठाले असाध्य रोग ह्या औषधास शरण येतात.

आमचे वीर जे आपल्या गुहेंत कसा तरी वेळ काढीत होते त्यास बाहेर निघून जाण्याची गुरु किल्ली माहित नव्हती.

जर ह्या ओळी अवलोकन करणारे दुःखाचे गुलाम झाले असतील तर त्यास तसें राहण्यास कांहीं कारण दिसत नाहीं.

तिच्या सचोटीच्या आटोक्यांत लिहिलेल्या पत्रावरून रोगाचें शमन कसें होईल ह्याचा रस्ता दाखवून देते. हें आमच्या पत्रव्यवहार करणाऱ्या गृहस्थाच्या लेखा वरून समजेल. H. D.

---

वऱ्हाड सार्वजनिक सभेच्या अध्यक्षतेखालीं अकोल्यास भरलेल्या प्रांतिक जाहिरसभेंत खालील ठराव सर्वानुमतें पसार झाले आहेतः—

( १ ) वऱ्हाड प्रांतांतील शेतकरी लोक दिवसानुदिवस जास्त जास्त कर्जबाजारी होत चालले आहेत त्या अर्थी या लोकांस माफक व्याजानें कर्ज देईल अशी एखादी ब्यांक ( पेढी ) प्रांतांत स्थापन करणें अत्यंत इष्ट आहे व हा हेतु साध्य होईल अशा तऱ्हेची एखादी योजना ( Scheme ) ( सन १८९३ सालीं मुंबई सरकारानें सुचविलें त्या नमुन्यावर ) सार्वजनिक सभेनें तयार करावी.

( २ ) वऱ्हाड प्रांत बहुतेकअंशा शेतीवर अवलंबून आहे म्हणून शेतीचा धंदा व तसेच दुसरे उद्योग धंदे चांगले चालले पाहिजेत, व त्यासाठीं लोकांस धंदेशिक्षण देण्याकरितां सरकारनें ही कांहीं योजना केली पाहिजे. तशी करण्याविषयीं सार्वजनिक सभेनें सरकारास अर्ज करावा.

( ३ ) या सभेचें असें मत आहे कीं, वऱ्हाडाकरितां जे कायदे नवीन केले जातात अथवा जे वऱ्हाडास लागू केले जातात, ते प्रांताच्या स्थितीस योग्य असे व्हावे यासाठीं व्हाइसराय साहेबांच्या कायदे कौंसिला पुढें विचाराकरितां ते आणले जावे व इंडिया कायदे कौन्सिल आक्टअन्वयें ते पसार होण्यांत यावे. या बाबतींत सार्वजनिक सभेनें सरकाराकडे अर्ज करावा.

( ४ ) या सभेचें असें मत आहे कीं सरकारी अधिकाऱ्यांच्या हातीं असलेली सत्ता फार मोठी आहे, तरी प्रांताचा राज्यकारभार चांगला चालावा व प्रजेच्या हितास बाध येऊं नये या साठीं वरिष्ठ दर्जाच्या जाग्यावर व विशेषें करून एक्स्ट्रा असिस्टन्ट कमिशनर, असिस्टन्ट कमिशनर असिस्टंन्ट पोलीस सुपरिंटेन्डन्टच्या जाग्यावर नेमणूक होण्यापूर्वी ज्या व्यक्तींची नेमणूक होणें आहे त्यांनीं उच्च प्रकारची विद्येची परीक्षा देणें अत्यावश्य आहे. व ती परीक्षा दिल्या शिवाय कोणाचीही त्या जाग्यावर नेमणूक होऊं नये.

( ५ ) या सभेचें असें मत आहे कीं न्यायाचें काम चांगल्या व योग्य रीतीनें बजावलें जावें या साठीं न्यायाचा अधिकार व अंमलबारीचे अधिकार हे एकाच आफिसराकडेस ठेवूं नयेत. हीं सुधारणा आणवेल तितकी लवकर अंमलांत आणण्या साठीं सरकारास अर्ज करावा; निदान दिवाणी व मुलकी अधिकार एकाच इसमाकडेस ठेवूं नयेत.

( ६ ) या सभेचें असें मत आहे कीं सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा एकसमयावच्छेदें करून विलायतेंत व हिंदुस्थानांत घेण्याच्या बाबतींत स्टेट सेक्रेटरी यांनीं जो निकाल नुकताच केला आहे तो अतिशय निरुत्साह व असमाधान उत्पन्न करण्या सारखा आहे; व शिवाय पार्लमेंट सभेच्या सन १८३३ सालच्या ठरावांत व महाराणी साहेबांच्या सन १८५८ च्या जाहीरनाम्यांत प्रजेस दिलेल्या वचनांशीं असंबद्ध आहे तरी अर्ज करून पार्लमेंट सभेस या सभेनें हें मत कळवावें.

( ७ ) वऱ्हाडांतील लोक बहुतांशीं जमिनीवर अवलंबून असल्यामुळें जमिनीवरील सरकारी सारा वाढविला गेला असता लोकांचे हितास फार बाध येईल. करितां जमिनीवर हल्लीं जो सरकारी सारा आहे त्यापेक्षां जास्त वाढला जाऊं नये असें या सभेचें मत आहे; आणि ज्या प्रमाणें मलकापूर, खामगांव व जळगांव तालुक्यांतील लोकांच्या संबंधानें वऱ्हाड सार्वजनिक सभेनें सरकारास अर्ज केला आहे त्याचप्रमाणें सर्व प्रांताच्या संबंधानेंही त्या सभेनें अर्ज करावा असें या सभेचें मत आहे.

(८) वऱ्हाडांत हल्लीं चालूं असलेला जंगल खात्याचा कायदा व त्या अन्वयें झालेले नियम यांचा परिणाम लोकांवर फार सक्त होत आहे व त्यापासून लोकांस फार त्रास पोचत आहे, व शिवाय हिंदुस्थान सरकारानें नुसताच जंगल खात्या संबंधानें जो ठराव प्रसिद्ध केला आहे व त्यांत जंगल खात्याचे जे उद्देश दर्शविले आहेत त्यांशीं ते असंबद्ध आहेत, या गोष्टी सरकारच्या नजरेस आणणें अवश्य आहे व या बाबतींत सार्वजनिक सभेनें सरकाराकडे अर्ज करावा असें या सभेचें मत आहे.

( ९ ) या सभेचें असें मत आहे कीं वणी जिल्ह्यांत सरकारानें लोकांस वैराण गांवें वसाहत करण्यासाठीं ज्या शर्तीवर इजाऱ्यानें दिलीं त्या शर्ती विरुद्ध हल्लीं सरकाराकडून वर्तन होत आहे, तरी या बाबतींत सार्वजनिक सभेनें सरकाराकडे अर्ज करावा

( १० ) या सभेचें असें मत आहे कीं वऱ्हाड शाळा खात्यानें ८, ९, १० व ११ ह्या इयत्तांतून मुलांस घेण्या संबंधानें वयाची इयत्ता ठरवून जें सक्युलर नुकतेंच काढलें आहे त्या योगें वऱ्हाडांतील लोकशिक्षणावर फार घातक परिणाम होतील, व पुष्कळ मुलांस हायस्कूल शिक्षणाचा लाभ होणार नाहीं; तरी या बाबतींत सार्वजनिक सभेनें सरकाराकडे अर्ज करावा.

---

सन १८९४ सालच्या शिक्षक समाजाचें कामाचें पत्रक

बुधवार तारीख १४ नोव्हेंबर

सकाळीं ११ पासून दुपारी १ पर्यंत

( १ ) मेहरबान डायरेक्टर साहेब बहादूर यांचे कडुन कामाची सुरवात.

( २ ) सेक्रेटरी यांनीं तयार केलेला मागील सालचा रिपोर्ट वाचला जाऊन समाजाचे पसंती साठीं ठेवणें.

( ३ ) प्रांतांतील शाळांतून आलेल्या चवथे व सहावे इयत्तेंतील विद्यार्थ्यांच्या मराठी व उर्दू पुस्त्या पहून त्यांतून उत्तम पुस्त्यांची निवड करण्याकरितां सबकमेटी नेमणें.

( ४ ) शिक्षक समाजाचे व्यवस्थापक सभासदांकडून आलेल्या सूचना वाचून दाखविणें व त्यापैकीं इन्स्पेक्टिंग अधिकाऱ्यांकडे पाठविण्या सारख्या सूचना ठरतील त्या त्यांजकडे पाठविणें.

दुपारचे २ पासून ४ पर्यंत.

( १ ) रा० रा० गणेश रामचंद्र दामले असिस्टंट मास्तर हायस्कूल आकोला हे कर्तव्य या विषयावर निबंध वाचतील.

( २ ) रा. रा. गोपाळ विनायक बापट हेडमास्तर म्यु. स्कूल उमरावती हे त्रैराशिकाची उपपत्ति हा विषय चवथ्या इयत्तेस शिकवून दाखवितील.

( ३ ) रा. रा. कृष्णाजी त्रिंबाजी हेडमास्तर ठाकरखेड हे "गेल्या १[illegible] वर्षांतील हिंदुस्थानांतील लोकस्थिति" या विषयावर निबंध वाचतील.

गुरुवार, तारीख १५ रोजीं

११ पासून १ पर्यंत.

( १ ) सबकमेटीनें पसंत केलेल्या पुस्त्या पाहून बक्षिसांचा निकाल करणें. व पुढील सालीं ह[illegible]मीं बक्षिसें ठेवण्याचे बाबतींत विचार क[illegible].

ल सरकारी लेखी वारणाचा सार्वजनिक सभेनें पूर्ण विचार करून आपलें मत पूर्वीच कळविलें आहे.

सर्व्हे— सुपरिनटेंडेंट यांचें सारा वाढविण्यास पहिलें कारण हें कीं पूर्वी धान्याचा भाव दर रुपयास ४० शेर होता तेथें आतां २० शेर आहे. तेव्हां शेतकऱ्यांस कां सर्व फायदा मिळावा? सरकाराला कां नको? आह्मी नाहीं ह्मणत नाहीं राज्यांश प्रत्येकानें कांहीं तरी नियमित दिला पाहिजे. सरकारचा मागण्याचा व आमच्या देण्याचा हक्क आहे. अशी दरिद्री व निष्कांचन होणार नाहीं अशा बेतानें राज्यांश घेतला जावा. राज्यांश भारी घेतला ह्मणजे आह्मी मरूं. आह्माला थारा रहाणार नाहीं आणि आम्ही नाहींसे झालें तर राज्य कोणावर करणार! हिंदुधर्म शास्त्रा प्रमाणें राज्यांश किती व कसा घ्यावा अशा विषयीं एक श्लोक आहे तो असा:—

> राजन्दुधुक्षसि यदि क्षितिधेनुमेतां तेनाद्य वत्समिव लोकममुं पुषाण। तस्मिंश्च सम्यगनिशं परिपोष्यमाणे। नानाफलैः फलति कल्पलतैव भूमिः॥

पृथ्वीरूप जी गाय तिच्या वत्सांचें म्हणजे लोकांचें रक्षण करून राजानें जो करभाग घ्यावयाचा तो असा कीं जेणें करून रयतेला कांहीं कुस राही व कांहीं बरकत येईल.

बरें, पूर्वी प्रमाणें हल्लीं भाव आहे कोठें! मलकापुरास शोध करितां आणि दिल्लीं आग्रा, मुंबई, मद्रास वगैरे ठिकाणचेही सरकारी छापील भाव पहातां भाव म्हणण्या सारखे वाढले नाहींत. कपाशीला १५०।२०० भाव होता तो हल्लीं नाहीं. आणि तिसरा हिस्सा कपाशीचा पेरा असतो. ज्वारी पूर्वी रुपयाला ६४ ६०।८० शेर होती. पण १८६० सालीं २२ शेर होती आणि हल्लीं २०।२३ शेरच आहे सरकारचे कागद पत्रच आम्ही सरकारास पहाण्यास विनंती करितों. पूर्वी पेक्षां दुप्पट फायदा होतो कोठें; सर्व्हे सुपरिनटेंडेंट यांनीं आपली चूक कबूल केली. त्यांच्या भावा विषयींच्या म्हणण्याला आम्ही बोळ लाविला. सरकारच्याच आकड्यावरून दुप्पट फायदा होतो हें म्हणणें खोटें ठरलें.

२ सर्व्हे झाल्या पासून जमीन तरी लागवडीस पुष्कळ कोठें आली आहे. थोडी वहितींत अधिक आली तर पूर्वी पेक्षा दीडपट लोकसंख्या अधिक वाढली आणि झपाट्यानें वाढतच आहे तेव्हां काय तजवीज सरकारानें केली आहे?

( ३ ) सारा वाढविण्याचें तिसरें कारण असें कीं हल्लीं लोकापाशी संपत्ति खूप वाढली आहे. त्याला प्रत्यन्तर लोकाजवळ गाड्या घोडे खूप झाले आहेत. हें सर्व खोटें नव्हे काय! लोकांचीं कर्जें पहा, हल्लीं लोक जमिनी गहाण टेवितात किती विकतात किती! बारा वर्षां पूर्वीं पेक्षां सध्या दीडपटीनें जमिनी गहाण ठविल्या जात आहेत. लोक शेती गहाण ठेवितात व विकतात तर लोक श्रीमंत कसे? भुसावळेकडे जुलूम होऊन धारा भयंकर आकारला आहे तेव्हां त्या भयंकर दरा प्रमाणें इकडे जुलूम करावा हा न्याय कोठला? रयत उठली, सरकारचें व सावकाराचें एकेनाशी झाली तेव्हां मव्हरनरच्या आज्ञेनें दर थोडे कमी झाले. साल वाईट असो किंवा नापीक होवो, शेती गहाण ठेवून सारा भरलाच पाहिजे. खुद्द लार्ड एलजिन यांनीं छबूल केलें कीं सारा पीकनापीक न पहातां वसूल केल्यानें व दरबंदी वाढल्यानें रयत बुडत चालली आहे. इंग्रज सरकार न्यायी व दयाळू आहे म्हणून आम्ही धारा न वाढविण्या विषयीं विनंती करितों.

( ४ ) बरें, राजाजवळ कांहीं खाण नाहीं. राज्यकारभारा साठीं प्रजेनें करभाग दिलाच पाहिजे. सध्या तशी राजाला जरूरीही नाहीं १०६,००,००० सर्व वसूल येतो आणि त्यांतून खर्च वजा जातां दरसाल १२।१६ लाख रुपये शिल्लक रहातात. वऱ्हाडची बचत रहाते तर मग सारा कां वाढवावा?

(५) निजाम सरकार वऱ्हाडचा सारा वाढविण्यास अनुमोदन खात्रीनें देणार नाहींत. पैठण, औरंगाबाद, मोमिनाबाद गुलबुर्गा वगैरे ठिकाणचे निजामदरबारेच कागदपत्र पहातां तिकडे दर एकरास १-१२ रु० दरबंदी आहे तथें वऱ्हाडांत २। रु० आगोदरच आकारणी होऊन चुकली आहे. सारा वाढविण्यास देखील बिलकूल माया उरली नाहीं. खरोखर, राज्यांश $\frac{1}{6}$, $\frac{1}{8}$ किंवा $\frac{1}{12}$ उत्पन्नाचा हिस्सा पूर्वीं घेत असत. आणि इंग्रज सरकार $\frac{1}{6}$ भागच घेण्यास इच्छिते. गेल्या दहा सालांत पीकपाण्याची स्थिति कोठें चांगली आहे! हल्लीं सरकार आपला राज्यांश शेंकडा १७।१८।१९ या पेक्षांही अधिक घेतें. असें असूनही मग सारा वाढविण्याचा जुलूम कां?

( ६ ) जमिनीच्या मालकांस आठ आणे मिल्तीचें देखील व्याज पडत नाहीं. पूर्वी ज्यांना जमिनी मिळाल्या त्यांचा फायदा झाला पण हल्लीं साऱ्याच्या १५।२० पटीनें शेतीच्या खरेदींत पैसा घालून त्यांस दरसाल ६ व्याज पडतां पडतां मारामार होते. रयतेचें दारिद्र्य बंद करा, बरकत लोकांना होऊं द्या, आणि फायदा होत गेला तर मग जास्ती सारा घ्या. लोक दारिद्री झाले, खाण्याला मोताद झाले तर राज्याला कालिमा येईल!

( ७ ) लोकसंख्या पूर्वी होती किती आणि किती तरी आतां वाढली! जमीन कोठून वाढणार? पूर्वी पेक्षां खाणारे वाढले. शेताचें उत्पन्न वाढविण्याची जरूरी आहे. भाव बदलत आहेत व जमीन निकस होत चालली आहे अशा स्थितीं मध्यें सारा जास्त करणें सरकारला लाजीम नाहीं.

मलकापूर, खामगांव, व जळगांव तालुक्या प्रमाणेंच सर्व वऱ्हाडा साठीं अर्ज झाला पाहिजे. प्रांतिक सरकारनें व हिंदुस्थान सरकारनें विरुद्ध निकाल केला तर विलायत सरकारकडे जाऊं ( टाळ्याचा गजर ). मलकापूरकर वगैरे लोक सध्यां जात्या मध्यें पडले आहेत व चरडून जात आहेत. आपण सुपांत आहों तर आपल्या वर ही पाळी येणार आहे. यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्र दोषः हें आप्त वाक्य लक्ष्यां ठेवा. प्रयत्ना अंतीं परमेश्वर! कांहींही होवो, आपण आपलें म्हणणें निकरानें सरकारापाशीं ठेविलें पाहिजे

पुढील हकीकत स्थलसंकोचास्तव पुढील अंकावर टाकणें भाग आहे.

---

# The Berar Samachar

MONDAY NOVEMBER, 12, 1894

The Provincial Conference of the last week is the greatest glory of the British administration in Berar. His Highness the Nizam will be pleased to know that a portion of his subjects have made rapid strides in the cause of progress and the public good. The people of the Hyderabad Assigned Districts highly appreciate the efficient management of the trust by the paramount power. The influences of the British rule in Berar are most salutary and benevolent. Forty years of the British administration have given the people a sort of political education. The three Ps viz the platform, the press, and the petition form the order of the day in Berar. Public mind is exasperated to the highest pitch on the great question of the increase in land—assessments. Under the auspices of the Berar Sarvajanik Sabha, people to the grand number of over than ten thousand met at Akola to deliberate on the vital problems that touch the welfare of the whole province. It was an event the like of which we did not witness before. The opinion of the Sarwajanik Sabha gathers an immense strength as it commands an increasing volume of assent of the people of the province. Not less than ten problems were on the agenda—paper. Two full sessions were given to them. But the questions of land—revenue, forestry, and the Berar. Age—circular of the educational department were the main topics. More than twenty speakers disfavoured the policy of the Government in these matters. The speeches detailed stern facts of long experience and brought home to the people the grievances in their true light. The deterioted and palsied state of the Government service in Berar was also advertised to in a signal manner and a general request to improve at least the higher branch of service will soon be conveyed to the Local Government. A direct reform of the highest usefulness was suggested by Mr. M. V. Joshi to correct the system of legislature of Berar. The sixth item of direct provincial concern was the complaint of the Izardars in Berar on the un-principled breach of contract by the Government in regard to concessions made to the Izar—villages. The questions of land—indebtedness, the separation of Judicial and executive works, and the Civil service simultaneous Examinations and the technical education were subjects common to the whole nation and were discussed in full spirit of fairness and moderation. People have learnt so many things that it will take years to unlearn them. We hope a permanent and lasting benefit will accrue to the great efforts of the Sarwajanik Sabha.

"In connection with the acceptance in Berar of the Bombay system for the organization of the land record agency and the maintenance of the of the village record, the proposals called for in paragraph 3 of the Resident's review of the report for 1892-93 have not yet been received and are awaited. The Director, in submitting his proposals, should be guided by the experience gained by a study of the system in force in the Central Provinces, to which the Government of India have drawn attention, and by his own experience and knowledge of the requirements of the Berar Administration. There is no reason why the organization of the agricultural staff should be deferred until the revision settlement is completed in any one district or until a revised Bombay system can be adopted. On the contrary it will be convenient if proposals are worked out at once in order that they may tentatively adopted as the several taluks come under the revision. The experience so gained will be very useful in the final determination of this question." Revenue Report.

---

## वऱ्हाड.

हवामान— थंडी चांगली पडूं लागून गेल्या अवकाळच्या पावसाच्या व्याधि क्रमशः दूर होत आहेत.

मि. म्यागिल्ल एक्स्ट्रा असि. कमिशनर व असि. पोलीस सुपरिनटेंडंट, शिकंदराबाद यांस तीन महिन्यांची हक्काची रजा चालूं महिन्यांत मिळून मि. क्राफर्ड पोलीस इनस्पेक्टर उमरावती यांस त्या रजेत शिकंदराबादेस असि. पोलीस सुपरि. नेमलें.

मि. वाल्श एक्स्ट्रा असि. कमि. यांस माजिस्ट्रेट वर्ग ५ चे अधिकार मिळाले.

रा. रा गोविंद राव अप्पा एक्स्ट्रा असि. कमि. हे तीन महिन्यांच्या हक्काच्या रजेवर असून गेल्या आठवड्यांत आकोल्यास मित्र मंडळीच्या भेटी साठीं येऊन नंतर उमरावतीकडे गेले.

लेफ्टे. मारिस असि. कमि. हे यंदाच्या व मागील परीक्षा मिळून हायरमध्यें व रा. रा. यशवंत मोरेश्वर व विटूजी नारायण हे उभयतां लोअर मध्यें पसार झाले.

रा. रा. शेषाचिलम तहशीलदार, दर्यापूर यांस चालूं महिन्यात तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली आणि त्यांच्या रजेत रा. रा. विनायक आपाजी नायब तहशीलदार यवतमाळ यांस दर्यापुरास तहशीलदार नेमून त्यांच्या नायब तहशीलदारीवर रा. रा. गोविंद रावजी नाझर यवतमाळ यांस नेमलें.

प्रांतिक जाहिरसभेचें काम आटोपल्यावर येत्या राष्ट्रीय सभेला मुखत्यार निवडण्या साठीं आकोला जिल्ह्याची सभा भरविली व एक नामावळी वाचण्यांत आली. पण सभेला प्रेसिडेंट कोण होते व सूचनेला अनुमोदन कोणी दिलें?

जळगांव तालुक्यांतील नारखेडकर देश. मुख रा० रा० जयवंतराव हे नदीच्या आनिकटवर पाणी घेतांना खाली पडून बुडून मेले. सभेच्या निमित्तानें बिचाऱ्यास मृत्यूनें येथें ओढून आणिलें!

आह्मास कळविण्यास दुःख वाटतें कीं उमरावतीचे जुने वकील रा. रा. सिद्धेश्वर नाना यांस देवाज्ञा झाली.

आकोल्याच्या जाहिरसभेमुळें रेल्वे कंपनीस १०-१५ हजारांचा फायदा झाला असावा.

---

गेल्या सहा वर्षांच्या मानानें १८९३ सालीं सरकारी दप्तरीं दाखल झालेल्या गुन्ह्याची संख्या पुष्कळ कमी आहे. १८८८ त १९६२९ गुन्हे घडल्या विषयीं सरकारांत खबरा दिल्या होत्या त्या ठिकाणीं १८९३ सालची संख्या १७६१६ आहे. गुन्ह्याचें प्रमाण उत्तरोत्तर कमी होत आहे हें एक सुचिन्ह आहे आणि ही सुस्थिती प्राप्त होण्यास कर्नल लेन यांचे हाता खालील पोलीस खात्याची उत्तम कामगिरी हें मुख्य कारण आहे. गुन्हे नेहमी जे लोक करितात अशा

लोकांवर पैरवी व देखरेख विशेष सक्तीनें ठेवण्यांत आली आणि त्यामुळें गुन्ह्यांची संख्या बरीच उतरली. बुलढाणा व इलिचपूर या जिल्ह्यांत शे दीडशे गुन्हे वाढले तथापि इतर जिल्ह्यात पुष्कळ कमी झाले आणि सर्वांत वणी जिल्ह्याचा बंदोबस्त विशेष नांवाजण्या सारखा होता. १८९३ त धान्याची महर्गता नव्हती असें नाहीं आणि पीक पाण्याच्या कमतरतेनें गुन्ह्यांचें प्रमाण वाढेल असें वाटलें होतें. परंतु जी गोष्ट निदर्शनास आली ती चांगली समाधानकारक आहे.

फौजदारींत कोणी फिर्याद केली तर ती पुढें चालविण्यास पुरेसा पुरावा किंवा सबळ कारण नाहीं असा शेरा देऊन फिर्यादी रद्द करण्याचा १८९२ साली माजिस्ट्रेटांनीं तडाखा चालविला होता परंतु त्याच वर्षी जुडिशिअल कमिशनर यांनीं अशा व्यवस्थे विषयीं खेद प्रदर्शित करून विशेष बारकाईनें व चौकसपणानें देखरेख ठेविली होती ह्मणून ११८६ फिर्यादी अगोदरच्या वर्षी काढून टाकण्यांत आल्या होत्या त्या ठिकाणीं २४८८ फिर्यादींची वासलाद १८९३ त लावण्यांत आली. मि. हेअर साहेब यांनीं अशा दुर्व्यवस्थेबद्दल पुष्कळ प्रकरणांची फेर तपासणी केली त्यांत रा० रा० देवराव जयकृष्ण माजिस्ट्रेट तेल्हारा यांच्या कामाला बराच दोष लावण्यांत आला. माजी डेपुटी कमि० क्याप्टन मारिस यांची गणनाही या वर्गांत आहे.

---

राव साहेब देवराव विनायक स्वागत मंडळीचे अध्यक्ष हे जमलेल्या पाहुण्यास उद्देशून बोलले कीं:—

सभ्य गृहस्थहो, वऱ्हाड सार्वजनिक सभेच्या आज्ञे वरून आज हा समारंभ येथें भरविण्याचें ठरविलें. सभेच्या आज्ञे वरून आमंत्रण करण्यांत आलें आणि सर्व मंडळी येथें जमली या बद्दल सभेच्या तर्फे मोठ्या प्रेमानें व आदरपूर्वक मी सर्वजणांचे आभार मानतों. सभेच्या निमंत्रणाला मान देऊन, खानगी कामें एकीकडे ठेऊन व पावसामुळें आलेल्या अनेक अडचणीस न जुमानतां आपण पुष्कळजण सभेस आला या बद्दल व्यवस्थापक मंडळी आपली फार आभारी आहे. आपल्या योग्यते प्रमाणें व्यवस्था घडली नाहीं ह्मणून दुःख वाटतें. घरच्या प्रमाणें सोयी करून देण्याचा विचार होता पण पर्जन्य वृष्टी मुळें कर्तव्य गोष्टी करितां आल्या नाहींत. पाऊस चार पांच दिवस खुलल्या मुळें कांहीं काळजी राहिली नव्हती पण आज परमेश्वराच्या अवकृपेनें पाऊस येऊं लागल्यामुळें नीट सोयी झाल्या नाहींत तथापि आपण त्याबद्दल दुःख मानणार नाहीं. लोकांच्या हिताकरितां आपण प्रवास पतकरला आहे तेव्हां प्रवासांतील गैरसोयी मनांत आणू नये असा नियम आहे. आपणही त्या मतांत न आणाल अशी उमेद आहे. परंतु आमची अनादरबुद्धी व हेळसांड यामुळें ही हेळना झाली असें मात्र आपण कृपा करून समजूं नये..

वऱ्हाडांत सार्वजनिक सभेची स्थापना होऊन आठ वर्षें होत आलीं. या वेळांत सभेच्या हातून कोणकोणतीं कामें झालीं आहेत हे दुसरे वक्ते निवेदन करितील च. या काळांत पुष्कळ महत्वाच्या गोष्टी घडल्या आहेत समेशी सर्व लोकांचा प्रत्यक्ष परिचय आजच घडला असें नाहीं तथापि सभेच्या स्थापनेचा पहिला समारंभ झाला तो लहान मोठ्या गांवास कळण्या सारखा नव्हता. सर्व वऱ्हाडचा असा हा पहिलाच समारंभ असून असा प्रसंग आकोल्यास घडला या विषयीं आह्मी आकोलेकर स्वतांस फार धन्य मानतों. सार्वजनिक सभेनें जीं कामें केलीं तीं सरकारास मानवलीं तर आहेतच. सभेचें करणें सरकारच्या पसंतीस पडत आलें आहे (टाळ्यांचा गजर) आज पर्यंत सभेला सरकारनें मोठ्या प्रेमानें वागविलें. सभेचा वादविवाद व सभेचें ह्मणणें यांचा उत्तम विचार करण्यांत आला. इंग्रज सरकारची राज्यपद्धती च चमत्कारिक आहे. लोकांना काय पाहिजे हें सरकारला सांगावें लागतें आणि नंतर सरकार कृपावंत होऊन लोकांचें ह्मणणें कबूल करितें. राज्यकर्त्यांस लोकांचीं सुखःदुखें सांगण्याची ही संस्था आहे. सभेला सरकार चांगले किंवा वाईट ह्मणतें याचा प्रत्यय सरकारच्या वागणुकीनेंच येतो. सभेच्या गोष्टी सरकारला मान्य आहेत ह्मणूनच सरकार नेहमीं सभेचा विचार घेत असतें. मे. ग्लोडन व कर्नल मेकंझी साहेब हैदराबादेस रेसिडेंट होऊन गेले तेव्हां त्यांनीं जाते वेळीं सभेची पानसुपारी प्रेमानें व आनंदानें ग्रहण केली आणि सभेला उत्तेजनपर उपदेश केला. हा उपदेश ज्यांना केला त्यांनीं तो सदैव लक्षपांत ठेविला आहे. सरकारला सुखदुःखें सांगितलीं तर सरकार ऐकतें अशी पूर्ण खात्री झाली आहे. रयतेस व सरकारास ही सभा फार उपयोगी आहे. रयतेच्या मागण्या सभा करिते ह्मणून रयतेला उपयोगी आणि सरकारला उपयोगी कारण कीं मे० ग्लोडन व कर्नल मेकंझी यांस महत्वाच्या प्रश्ना संबंधानें लोकमत सभेच्या द्वारें कळतें. (टाळ्यांचा गजर.) सार्वजनिक सभेंत जे विचार व वादविवाद होतात ते प्रांतिक सरकारास फार आवडले आहेत. आहेत. उदाहरणार्थ, (१) मलकापूर, खामगांव व जळगांव या तीन तालुक्यात सारा वाढविण्या विषयीं सभेचें मत विचारण्यांत आलें तेव्हां गुदस्ता कित्येकांनीं मोठ्या प्रयासानें एक मोठा अर्ज तयार केला आणि मोठ्या आनंदाची गोष्ट कीं या अर्जाचा सरकारनें बहुमान केला. कलकत्याचे बडे लाट साहेबांनीं देखील सभेचा योग्य व उत्तम अर्ज पाहून आपला आनंद प्रदर्शीत केला आहे. (२) वऱ्हाड साठीं मुलकी कायदा करण्याची बाटाघाट चालू होती त्यावेळीं कमिशनर, डेपुटी कमिशनर ज्युडिशिअल कमिशनर इत्यादि मोठमोठ्या हुद्यांच्या अधिकाऱ्यांच्या कौंसिलांत सार्वजनिक सभेचे दोन गृहस्थ मागून घेतले होते सर्वांनीं मिळून विचार केला आणि अती महत्वाच्या गोष्टी निकालास लागल्या. खरोखरच, सार्वजनिक सभा रयत व सरकार या मध्यें मध्यस्त आहे. लक्षात ठेवा कीं सरकारनें आपला बहुमान केला तरी आपल्या मागण्या देईलच असा भरंवसा नाहीं. देणें काम सरकारचें आहे. मागणें आपलें काम आहे. जे मागणें तें पूर्णपणें कालदेशवर्तमान पाहून मागितलें पाहिजे. मागण्याचें काम सतत चालविलें पाहिजे. तीन तालुक्यांचा विचार तोच बाकीच्या १८ तालुक्यांचा विचार खरा आणि सार्वजनिक सभेचें काम आपल्यास न बोलावतां झालें असतें. पण सर्व लोकांचें मत सरकारला कळविणें विशेष चांगलें असें फार अंशीं वाटलें म्हणून ही सभा भरविली. आपण एक गोष्ट लक्षांत ठेवा कीं उद्योग करा, नाउमेद होऊं नका. आणि अखेरच्या मजले पर्यंत आपणास लढलें पाहिजे. हे दिवस शेताच्या धंद्याचे असे असूनही पाऊसाच्या भुरभुरीला न मानतां आपण आला, आणि आमच्या गैरव्यवस्थेच्या दोषाकडे दुर्लक्ष केलें याबद्दल मी आपला आभार मानतों. आणि सभेचें काम चालविण्या साठीं अध्यक्षाना विनंती करितों. (टाळ्या)

नंतर अध्यक्ष रा० रा० पांडुरंग गोविंद यांनीं सभेच्या कामास आरंभ केला तेव्हां ते बोलले कीं:—

सभ्य गृहस्थहो, आज हा आनंदाचा दिवस प्राप्त झाला आहे असा पूर्वीच्या राज्यांत प्राप्त झाला असता काय! ब्रिटिश सरकार न्यायी म्हणून हा सुदिन प्राप्त झाला. खात्रीनें पूर्वीच्या राज्यामध्यें हा प्रसंग आला नसतां. पूर्वी प्रमाणें हलीं जुलूम नाहीं, बंडावा नाहीं व लूट नाहीं. सगळ्यास सारखा न्याय मिळतो. नियमित सारा द्यावा आणि आपलें म्हणणें सरकाराला समजून देण्याची पूर्ण मोकळीक आहे. नाहीं तर पूर्वी तालुकादारा विरुद्ध कांहीं म्हणणें म्हणजे केवढें संकट! सुराज्य कृत त्रेता इत्यादि युगामध्यें असेल पण इंग्रजा सारखें राज्य अलिकडे कधींच नव्हतें. तेव्हां आपल्या चक्रवर्तिनी महाराणी व्हिक्टोरिआचा त्रिवार जयघोष केलाच पाहिजे.

वऱ्हाडांत पूर्वी शेतकी शिवाय दुसरा धंदा नव्हता. शेतीवर उदरनिर्वाह चालत असे. पृथ्वी मनुष्या साठींच आहे. आपल्या सुखासाठीं आरंभीं लोकांनीं राजा नेमून घेतला आणि राज्यकारभारा साठीं खर्चाची योग्य रक्कम राजा प्रजे पासून घेऊं लागला. मागल्या राज्या मध्यें हलीं ज्या क्षेत्राचा सारा ९ रुपये घेतात तेथें पन्नास घेत असत पूर्वींच्या पद्धती पैसा काढण्याच्या होत्या. जमिनी पडीत होत्या, जंगल मोठें, चोरटे पुष्कळ. नागपूरचे भोसले व निजाम यांच्या फौजेची फार गर्दी होत असें. पेंढाऱ्याच्या लुटा लुटी चालूच होत्या. आणि सर्व लोक निष्कांचन होते. पूर्वींचे लोक आजला असते तर त्यांस हा समारंभ पाहून फार आनंद झाला असता. हलीं श्रीमंतास व गरीबांस कायदा एक. पूर्वी श्रीमंतास ३६० रुपयाला खून माफ होत असे. आतां सरसकट खुनी मनुष्य तोफेच्या तोंडी अथवा सुळावर दिला जातो. इंग्रजी राज्याचे फायदे बहुत बहुत आहेत.

(१) सरकारानें बंदोबस्त उत्तम केला. चोर नाहीं, लूट नाहीं, कांहीं नाहीं. सर्वत्र शांतता, स्वस्थता व अबादानी झाली. (२) ठरीव साऱ्यापेक्षां जास्त सारा घेऊं नये असा ठराव झाला. त्या मुळें शेतीचा धंदा सुयंत्र व सुखावह झाला. (३) जंगल तोडल्यामुळें दुष्ट जनावरांची भिती नाहीं. (४) जमिनीवर रयतेचें स्वामित्व नव्हतें. जमिनी मिराशी किंवा इनामी होत्या. मोंगलाईंत कांहीं हक्क नव्हते. आतां जमिनीचें स्वामित्व वंशपरंपरेनें रयतेस मिळालें आहे. (५) न्यायाचीं कोर्टें स्थापित झालीं. कोणाची मिळकत कोणाला जबरीनें घेतां येत नाहीं. गरीबाला व श्रीमंताला कायदा एक. फारसा जुलूम करण्यास फावत नाहीं. एक कोर्ट नाहीं तर अपीलकोर्टें आहेतच. यामुळें लोकांच्या वित्तजीवित संरक्षणाला साधनें बहुत आहेत. (६) माल इकडून तिकडून पाठविण्याचीं साधनें बहुत वाढलीं. प्रवासापासून व रेलवेनें स्थलान्तर नाहींसें वाटूं लागल्यामुळें लोकांची बुद्धि वाढली, व ज्ञान विकसित झालें (७) रोगाची पीडा होऊं नये म्हणून हास्पिटलें काढलीं. आणि लोकांच्या कल्याणाकरितां कालेजातून शिकलेल्या लोकांनीं औषधाचीं दुकानें घातलीं आहेत. [८] लोकांच्या राहण्याची स्थिती बदलली. स्वच्छतेच्या रीति वगैरे शिकविण्यात आल्या. मुनासिपालिटी, व लोकलबोर्ड वगैरे स्थापून पुष्कळ सुधारणेच्या गोष्टी इंग्रजानीं केल्या.

एकंदरीत रावसाहेब देवराव यांनीं सांगितल्या प्रमाणें इंग्रजी राज्यपद्धत अगदीं निराळी आहे. प्रजासत्तात्मक राज्याचें तत्वच असें कीं प्रजेला सुख देईल तो राजा. प्रजेच्या सुखाच्या मोष्टी राजाला कळल्या पाहिजेत. इंग्लंडात बड्या लोकांची व सार्वजनिक लोकांची अशा दोन सभा आहेत. सार्वजनिक सभेतले विचार मोठ्या सभेकडे जातात आणि निकाल सर्वांना सुखावह होतो आपल्या प्रजेला अन्याय होऊं नये, दुःख होऊं नये, व दुःखाचें निवारण करावें हा सर्वत्र नियम आहे. सर्वानुमतें जें पाहिजे तें देववेल तितकें दिलें जातें. आपणास काय केलें पाहिजे? मागणें करा आणि तें करितांना काय पाहिजे तें स्पष्ट बोलका. हें दास्यविण्याचे प्रकार आहेत. एका मनुष्याचें ह्मणणें कोणी मान्य करीत नाहीं. एका गांवाकडे लक्ष्य देत नाहींत. सर्व प्रांतातले लोक एकत्र झाले आणि त्यांनीं सरकारची खात्री केली ह्मणजे सरकार लोकांच्या म्हणण्याचा विचार करितें. रोग पक्का झाल्यावर औषध देईन असं वैद्यानें सांगितलें तर रोगाची वाढ पाहून औषध वैद्या कडून घेतलेंच पाहिजे. तसेंच सरकारनें टाळा टाळ केली तरी वारंवार मागण्या करून मागावयाचें असेल तें मागून घेतलेंच पाहिजे. मागणी करण्याचें द्वार म्हणून ही सार्वजनिक सभा आहे. सात आठ वर्षे झालीं त्या वेळांत पुष्काळ नाहीं तथापि दोनचार कामाचे चांगले विचार झाले आहेत. सभेचे विचार सरकारनें प्रेमानें मान्य केले. आणि सभेचा तिरस्कार केला नाहीं किंवा तिला धक्काही कधीं दिला नाहीं. सभेचे मुख्य काम म्हणजे सर्वांचें समान दुःख असेल तें सरकारास कळवावें. सरकारच्या आज्ञेचा अर्थ लोकांना कळवून जुलमाच्या वाटा बंद कराव्या आणि दोन्ही बाजूनें शांतता करावी. मुनासिपाल व बोर्ड लॉ हे करिते वेळीं सार्वजनिक सभेच्या सभासदांशीं मसलत करून नंतर कायदे करण्यांत आले. अशा प्रकारें सरकार व रयत यांच्या दरम्यान प्रेम ठेवण्याला सभा हें उत्तम साधन आहे. नंतर सभेपुढे येणाऱ्या विषयांचें महत्व दाखवून अध्यक्षांनीं लोकांला एकत्र जमण्याचे फायदे कळविले.

---

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

## ह्या राजश्रीनें केव्हां तरी पळ काढला असावा.

एक गृहस्थास त्याच्या धर्मवेडा मुळें एका जुल्मी सरकारनें कारागृह दाखविल्या पुढें त्या कारागृहाच्या मजबूत दगडी भिंती पाहून त्याच्या मनाची खात्री झाली कीं आतां आपलें राहिलेलें आयुष्य ह्या एकांत व भयाण कारागृहांत घालविलें पाहिजे. जरी त्याला आतां पुढची गत चांगली नाहीं असें भासत होतें तरी त्याला दुःखांत सुख इतकेंच वाटत होतें कीं मला जुलमामुळें बळी व्हावें लागेल परंतु सद्वर्तनाचें उल्लंघन केल्यामुळें कांहीं नाहीं. जर त्याच्या स्वाधीनची गोष्ट असती तर ह्या संकटांतून तो सहज पार पडला असता.

असें असून त्या बिचाऱ्यास सतत सोळा वर्षें हाल काढीत राहावें लागलें. हीं वर्षें संपतात तों त्याच्या मनांत आलें कीं ह्या भिंतीवर पुढें आलेल्या दगडाच्या आधारानें वर चढावें व त्यानें खिडकीच्या वरून काय दिसतें ह्मणून वर डोकें केलें. आणि असें केल्यामुळें त्याला वाटलें कीं पुढें लोखंडाचे गज आहेत ते काढून टाकतां येतील व त्या चौकटीची आगळही लाविली नव्हती. त्याच्या मनांत घोळूं लागले कीं काय मी पळ कां न काढावा? त्यानें खिडकी तर उघडली आणि सहा फुट उडी जमिनीवर मारली आणि त्या प्रदेशास शेवटचा राम राम ठोकला. जर त्यानें त्याच्या ठाम झालेल्या विचारास एकीकडे ठेवून विचाराची दोरी जर सैल सोडली असती तर ह्या स्थळीं इतके दिवस कुंथत रहावें लागलें नसतें.

ह्या स्वधर्मार्थ प्राण अर्पण करणाऱ्या या बिचाऱ्याची दैवघटित गोष्ट साधक व बाधक आहे. त्याच्या मनाची धांव बंद केल्यामुळें साधक; त्याला ज्या कारणास्तव बंदींत टाकावयाचा होता तें नसल्यामुळें बाधक.

ही गोष्ट पत्र रूपानें जी सर्वांस आवडते त्या प्रमाणें खालीं थोडक्यांत व साध्या शब्दांत सांगतो. एक लेखक बाई ह्मणते कीं, आज सोळा वर्षें झालीं, चित्तक्षोभानें व अशक्तपणामुळें फारच गांजून गेले आहे. नेहमीं थकून जाऊन अगदीं हलक होऊन जाई. माझी अन्नावरची वासना उडाली, पुढें आणलेले ताटास हात लावीन तर शपथ. कित्येक दिवस माझ्यानें एक घास देखील खाववत नसे, कधीं कधीं मला मळमळ सुटे. पोटाचा नगारा होई आणि तोंडावाटें मोठा वट्ट वेडका येई.

मला फारच त्रासदायक खोकला होऊन घरगड्यांत फारच वेदना होत व दम बरोबर छाटत नसे. मी फारच हलक झाले आणि दुकानांत आंत बाहेर करण्याचा माझा तकवा अगदीं निघून गेला. सन १८९१ च्या दिसेंबरात माझ्या एका गिऱ्हाईकानें मदर सिजेलच्या क्युरेटीव सीरपा ( माता शिजेलचा रोगहारक पाका ) बद्दल बरेच गुणानुवाद गाईल्यामुळें मी तें औषध घेण्यास सुरूं केलें. मी थोडे घेत घेतल्या बरोबर मला बरेंच समाधान वाटलें आणि पुढें पंधरा दिवस औषध घेतलें नाहीं तरी मला बरें वाटत होतें. मला असा धीर आला ह्मणून मी अगदीं बरी होईं तों पर्यंत ह्या औषधाचा उपयोग केला. आमचे चिरंजीव आरथरास एक वर्ष सतत जेवल्यावर जड झाल्या सारखें व वेदना होत होत्या आणि पोटाची दामटी होऊन खळगा पडल्या सारखें वाटे. त्याला हें औषध घेण्याची मी गळ घातली आणि त्याचा शेवट ह्मणाल तर माझ्या सारखाच झाला. मला पक्कें माहीत आहे कीं ह्या प्रदेशांतल्या बऱ्याच मंडळींनें दुसरे नाना उपाय करून थकल्यावर ह्या शिरपाचा ( पाकाचा ) उपयोग केला तेव्हां तात्काळ गूण आला. ह्या औषधाचा ( ह्मणजे ) माता सिजेलच्या सिरपाचा मला रामबाण गुण आला तो इतर पिडीतास ह्यामुळें यावा असें आपणास वाटत असेल तर हें पत्र आपण बेलाशक छापावें.

मी तुमची
( सही ) ( मिसेस ) एम वार्ड
१९४ इकसटन रोड
शडफर्ड. नोटिंगहाम
ता० १ ली माहे एप्रिल सन १८९२

मीसीस वर्ड बाई साहेब ह्या त्रासदायक व भयंकर रोगा पासून बऱ्या झाल्या ह्मणून आह्मी तीस अभिनंदन करतो. आपल्या आयुष्यांत सोळा वर्षांचा वांटा सतत शारीरिक व मानसिक वेदनेंत घालवावा म्हणजे फारच खरात्र समजावयाचें. कुबेराचे सोबती होणें फारच थोड्याच्या ललाटीं लिहिलेलें असतें. परंतु सुदृढता जसा सूर्य प्रकाश सर्वजगभर जिकडे तिकडे सारखा पसरतो तद्वत् पसरली पाहिजे. ही गोष्ट राखावी हें ज्याला अवगत आहे तो तर त्याची काळजी घेईल व ता दूर झाल्यास आपल्या स्वाधीन करून घेईल.

ह्या बाईचा रोग पचनींय पिंडाचा म्हणजे अग्निमांद्य व अजीर्णाचा होता. हा रोग फारच धोक्याचा व दुःख देणारा आहे कारण कीं ह्या रोगाचा पगडा इतका बसतो कीं शरिरांतलीं सर्व अंगें ह्याच्या बळी पडतात व रक्ताभिसरण मुळें ह्या रोगाचें वीष सर्व शरिरांत पसरतें. ह्या रोगाचें मुख्य कारण निरनिराळ्या नांवानें होणारे परिणाम व चिन्हें हीं होत. ती जे औषध सांगते त्याच्या गुणाची ज्यास चांगली माहिती झाली आहे त्यास नवल वाटण्यास नको. मोठ मोठाले असाध्य रोग ह्या औषधास शरण येतात.

आमचे वीर जे आपल्या गुहेंत कसा तरी वेळ काढीत होते त्यास बाहेर निघून जाण्याची गुरु किल्ली माहित नव्हती.

जर ह्या ओळी अवलोकन करणारे दुःखाचे गुलाम झाले असतील तर त्यास तसें राहण्यास कांहीं कारण दिसत नाहीं.

तिच्या सचोटीच्या आटोक्यांत लिहिलेल्या पत्रावरून रोगाचें शमन कसें होईल ह्याचा रस्ता दाखवून देते. हें आमच्या पत्रव्यवहार करणाऱ्या गृहस्थाच्या लेखा वरून समजेल. H. D.

---

वऱ्हाड सार्वजनिक सभेच्या अध्यक्षतेखालीं अकोल्यास भरलेल्या प्रांतिक जाहिरसभेंत खालील ठराव सर्वानु मतें पसार झाले आहेतः—

( १ ) वऱ्हाड प्रांतांतील शेतकरी लोक दिवसानुदिवस जास्त जास्त कर्जबाजारी होत चालले आहेत त्या अर्थी या लोकांस माफक व्याजानें कर्ज देईल अशी एखादी ब्यांक ( पेढी ) प्रांतांत स्थापन करणें अत्यंत इष्ट आहे व हा हेतु साध्य होईल अशा तऱ्हेची एखादी योजना ( Scheme ) ( सन १८९३ सालीं मुंबई सरकारानें सुचाविलें त्या नमुन्यावर ) सार्वजनिक सभेनें तयार करावी.

( २ ) वऱ्हाड प्रांत बहुतेकअंशी शेतीवर अवलंबून आहे म्हणून शेतीचा धंदा व तसेच दुसरे उद्योग धंदे चांगले चालले पाहिजेत, व त्यासाठीं लोकांस धंदेशिक्षण देण्याकरितां सरकारनें ही कांहीं योजना केली पाहिजे. तशी करण्याविषयीं सार्वजनिक सभेनें सरकारास अर्ज करावा.

( ३ ) या सभेचें असें मत आहे कीं, वऱ्हाडाकरितां जे कायदे नवीन केले जातात अथवा जे वऱ्हाडास लागू केले जातात, ते प्रांताच्या स्थितीस योग्य असे व्हावे यासाठीं व्हाइसराय साहेबांच्या कायदे कौंसिला पुढें विचाराकरितां ते आणले जावे व इंडिया कायदे कौन्सिल आक्टअन्वयें ते पसार होण्यांत यावे. या बाबतींत सार्वजनिक सभेनें सरकाराकडे अर्ज करावा.

( ४ ) या सभेचें असें मत आहे कीं सरकारी अधिकाऱ्यांच्या हातीं असलेली सत्ता फार मोठी आहे, तरी प्रांताचा राज्यकारभार चांगला चालावा व प्रजेच्या हितास बाध येऊं नये या साठीं वरिष्ठ दर्जाच्या जागयावर व विशेषें करून एक्स्ट्रा असिस्टन्ट कमिशनर, असिस्टन्ट कमिशनर असिस्टंन्ट पोलीस सुपरिंटेन्डन्टच्या जाग्यावर नेमणूक होण्यापूर्वी ज्या व्यक्तींची नेमणूक होणें आहे त्यांनीं उच्च प्रकारची विद्येची परीक्षा देणें अत्यावश्य आहे. व ती परीक्षा दिल्या शिवाय कोणाचीही त्या जाग्यावर नेमणूक होऊं नये.

( ५ ) या सभेचें असें मत आहे कीं न्यायाचें काम चांगल्या व योग्य रीतीनें बजावले जावें या साठीं न्यायाचा अधिकार व अमलबावणीचे अधिकार हे एकाच आफिसराकडेस ठेवूं नयेत. ही सुधारणा आणवेल तितकी लवकर अमलात आणण्या साठीं सरकारास अर्ज करावा; निदान दिवाणी व मुलकी अधिकार एकाच इसमाकडेस ठेवू नयेत.

( ६ ) या सभेचें असें मत आहे कीं सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा एकसमयावच्छेदें करून विलायतेंत व हिंदुस्थानांत घेण्याच्या बाबतींत स्टेट सेक्रेटरी यांनीं जो निकाल नुकताच केला आहे तो अतिशय निरुत्साह व असमाधान उत्पन्न करण्या सारखा आहे; व शिवाय पार्लमेंट सभेच्या सन १८३३ सालच्या ठरावांत व महाराणी साहेबांच्या सन १८५८ च्या जाहीरनाम्यांत प्रजेस दिलेल्या वचनांशीं असंबद्ध आहे तरी अर्ज करून पार्लमेंट सभेस या सभेनें हें मत कळवावें.

( ७ ) वऱ्हाडांतील लोक बहुतांशीं जमिनीवर अवलंबून असल्यामुळें जमिनी वरील सरकारी सारा वाढविल्या गेला असता लोकांचे हितास फार बाध येईल. करितां जमिनीवर हल्लीं जो सरकारी सारा आहे त्यापेक्षां जास्त वाढला जाऊं नये असें या सभेचें मत आहे; आणि ज्या प्रमाणें मलकापूर, खामगांव व जळगांव तालुक्यांतील लोकांच्या संबंधानें वऱ्हाड सार्वजनिक सभेनें सरकारास अर्ज केला आहे त्याचप्रमाणें सर्व प्रांताच्या संबंधानेंही त्या सभेनें अर्ज करावा असें या सभेचें मत आहे.

(८) वऱ्हाडांत हल्लीं चालूं असलेला जंगल खात्याचा कायदा व त्या अन्वयें झालेले नियम यांचा परिणाम लोकांवर फार सक्त होत आहे व त्यापासून लोकांस फार त्रास पोचत आहे, व शिवाय हिंदुस्थान सरकारानें नुसताच जंगल खात्या संबधानें जो ठराव प्रसिद्ध केला आहे व त्यांत जंगल खात्याचे जे उद्देश दर्शाविले आहेत त्यांशीं ते असंबद्ध आहेत, या गोष्टी सरकारच्या नजरेस आणणें अवश्य आहे व या बाबतींत सार्वजनिक सभेनें सरकाराकडे अर्ज करावा असें या सभेचें मत आहे.

( ९ ) या सभेचें असें मत आहे कीं वणी जिल्ह्यांत सरकारानें लोकांस वैराण गांवें वसाहत करण्यासाठीं ज्या शर्तीवर इजाऱ्यानें दिलीं त्या शर्तीं विरुद्ध हल्लीं सरकाराकडून वर्तन होत आहे, तरी या बाबतींत सार्वजनिक सभेनें सरकाराकडे अर्ज करावा

( १० ) या सभेचें असें मत आहे कीं वऱ्हाड शाळा खात्यानें ८, ९, १० व ११ व्या इयत्तांतून मुलांस घेण्या संबंधानें वयाची इयत्ता ठरवून जें सक्युलर नुकतेंच काढलें आहे त्या योगें वऱ्हाडांतील लोकशिक्षणावर फार घातक परिणाम होतील, व पुष्कळ मुलास हायस्कूल शिक्षणाचा लाभ होणार नाहीं; तरी या बाबतींत सार्वजनिक सभेनें सरकाराकडे अर्ज करावा.

---

सन १८९४ सालच्या शिक्षक समाजाचें कामाचें पत्रक
बुधवार तारीख १४ नोव्हेंबर
सकाळीं ११ पासून दुपारी १ पर्यंत

( १ ) मेहरबान डायरेक्टर साहेब बहादूर यांचे कडुन कामाची सुरवात.

( २ ) सेक्रेटरी यांनीं तयार केलेला मागील सालचा रिपोर्ट वाचला जाऊन समाजाचे पसंती साठीं ठेवणें.

( ३ ) प्रांतांतील शाळांतुन आलेल्या चवथे व सहावे इयत्तेंतील विद्यार्थ्यांच्या मराठी व उर्दू पुस्त्या पाहून त्यांतून उत्तम पुस्त्यांची निवड करण्याकरितां सबकमेटी नेमणें.

( ४ ) शिक्षक समाजाचे व्यवस्थापक सभासदांकडून आलेल्या सूचना वाचून दाखविणें व त्यांपैकीं इन्स्पेक्टिंग अधिकाऱ्यांकडे पाठविण्या सारख्या सूचना ठरतील त्या त्यांजकडे पाठविणें.

दुपारचे २ पासून ४ पर्यंत.

( १ ) रा० रा० गणेश रामचंद्र दामले असिस्टंट मास्तर हायस्कूल आकोला हे कर्तव्य या विषयावर निबंध वाचतील.

( २ ) रा. रा. गोपाळ विनायक बापट हेडमास्तर म्यु. स्कूल उमरावती हे त्रैराशिकाची उपपत्ति हा विषय चवथ्या इयत्तेस शिकवून दाखवितील.

( ३ ) रा. रा. कृष्णाजी देवाजी हेडमास्तर टाकरखेड हे " गेल्या १०० वर्षांतील हिंदुस्थानांतील लोकस्थिति " या विषयावर निबंध वाचतील.

गुरुवार, तारीख [illegible]

११ [illegible] कारणें.

( १ जमाबंदी सन १२७३ फसलीस त्या पाहून ह्या बहुतेक सर्व जमीन वहित पुढील सा

बतींत विच

(२) रा. रा. कृष्णाजी सदाशिव तांबे हे इंग्लंड आणि हिंदुस्थान ह्या दोन देशांत चालू असलेल्या राज्य पद्धतीची माहिती व तुलना ह्या विषयीं सहाव्या इयत्तेंतील मुलांस शिकवून दाखवितील.

(३) रा. रा. सदाशिव अनंत पेंढरकर ड्राइंग मास्तर आकोला हायस्कूल हे चित्रकला ह्या विषया संबंधानें भाषण

दुपारचे २ पासून ४ पर्यंत

(१) रा. रा. गंगाधर नारायण घाटे असिस्टंट मास्तर हायस्कूल अकोला यांचें निद्रा व तिची मीमांसा ह्या विषयावर भाषण होईल.

[२] रा. रा. महादेव खंडो हेडमास्तर बार्शीटाकळी हे घन मुळाची उपपत्ति हा विषय सातव्या इयत्तेस शिकवून दाखवितील.

[३] रा. रा. गोपाळ नारायण से. अ. मा. देऊळगांवराजा हे पहिल्या सहा इयत्ता शिकविण्यास शिक्षकांनें काय तयारी केली पाहिजे ह्या विषयावर भाषण करतील.

शुक्रवार ता० १६ माहे नोवेंबर

रोजीं ११ पासून १ पर्यंत.

(१) रा. रा. सदाशिव विनायक परांजपे हे युनायटेडस्टेटस् व मुंबई इलाखा व वऱ्हाड यांत चालू असलेल्या शिक्षण पद्धती ची माहिती व तुलना ह्या विषयावर निबंध वाचतील.

(२) सन १८९९ इ. साला करितां सेक्रेटरींनीं तयार केलेलें खर्चाचें अंदाज पत्रक पसार करणें.

(३) पुढील साला करितां शिक्षक समाजाचे प्रेसिडेंट व सेक्रेटरी यांची निवड करणें.

दुपारचे २ पासून ४ पर्यंत

(१) रा. रा. गोपाळराव प्रभुणे हेड मास्तर इं. म. स्कूल देऊळगांव राजा हे अर्थशास्त्रा वरील एक धडा सहाव्या इयत्तेस शिकवून दाखवितील.

(२) रा. रा. सूर्यभान जानजी हेडमास्तर केळीवेळी हे ट्रेनिंग कॉलेजांत शिकलेल्या विद्यार्थ्यांच्या अडचणी व त्या दूर करण्याचे उपाय ह्या विषयावर निबंध वाचतील.

(३) रा. रा. लक्ष्मण कृष्ण चिपळूनकर हेड मास्तर हायस्कूल अकोला हे मराठ्यांचा इतिहास ह्या विषयावर भाषण करतील.

शनिवार, तारीख १७ माहे नोवेंबर

प्रातःकाळीं ७ पासून ९ पयत.

(१) आयत्या वेळेस शिक्षक लोकांकडून ज्या सूचना येतील त्यांचा विचार करणें.

(२) शिक्षक समजाचे अध्यक्षांकडून समाजाचें विसर्जन.

दुपारचे २ पासून काम संपे पर्यंत.

(१) रा. रा. दत्तात्रय विष्णू भागवत वकील हे विद्युत् आणि तारायंत्र या विषयाची सप्रयोग माहिती देतील.

(२) शिक्षक समाजाचे सेक्रेटरी व इन्स्पेक्टिंग मंडळीचे सेक्रेटरी हे समाजांत मागे दे... कामाचे रिपोर्ट अभ्यास सतत ...

करीत होते. परंतु ... साहेब यांचें चालले. कधीं कधीं रा...

V. Vaidya

...कसमाज.

रा. रा. ... बळवंतराव सोमण येथील कसरती मास्तर हे गुरुवारीं रात्रीं घोड्याच्या सर्कसचे खेळ दाखवितील व शुक्रवारीं संध्याकाळीं मुलाकडून ड्रिल करून दाखवितील.

## नोटीस

खडी अवरत राहणार असळगांव खेडा तालुके जळगांव इस नोटीस देणार रामू वलद पिरताजी पाटील राहणार घानोरें तालुके जळगांव जिल्हा अकोले नोटीशीनें असें कळवितों कीं तूं आमचे पासून कर्ज रुपये (१००) वर सेंकडा २ दोनप्रमाणें व्याजाच्या करारानें तूं आपले पहिले नवऱ्या पासून फारकती घेण्या करितां काढले व हे रुपये तूं दुसरा घरठाव केल्यानंतर एक महिन्यानें देण्याचा करार केला होता. तू दुसरा घरठाव करून आज अनमासें सहा महिने होत आले तुजला आह्मी ह्या वेळेपर्यंत तीन चार वेळां रुपये मागितले परंतु अद्याप रुपये दिले नाहींत ह्मणून ही नोटीस देणें भाग पडले तर ही नोटीस पावले दिवसापासून आठ दिवसांत मुद्दल रुपये १०० व ह्याचें आजपर्यंतचें व्याज ह्या नोटीशीचा खर्च असें मिळून सर्व रुपये आणून देऊन निकाल करावा असें झालें नाहींतर सदरहू रुपये, व्याज व नोटीशीचा खर्च व अखेर निकाल होई पर्यंत सर्व खर्च तुजवर फिर्याद करून घेतला जाईल ह्मणून दिली नोटीस सही ता. ३-११-९४.

सही

रामु वलद पिरताजी पाटील राहणार घानोरें द. खुद.

## नोटीस

रा. रा. पुंडू वलद केशव पाटील रहाणार नागद तालुके बाळापूर जिल्हे अकोले यांस नोटीस देणार वनसिंग वलद मानाजी पाटील रहाणार नागद तालुके बाळापूर जिल्हे अकोले नोटीशीनें असें कळवितो कीं आह्मीं तुमचे कर्ज देणें रुपये २९० दोनशे पन्नास याचा दस्तैवज तुह्मापाशी आहे. तुमचे देणें रुपये (२९०) याची तोड आह्मी रुपये २२९ दोनशे पंचवीस रुपयावर केली. व एकदा रुपये २०० व दुसऱ्यांदा रुपये २९ असे मिळून रुपये २२९ तुम्हास दिले. व ठरल्या प्रमाणें आमचा दस्तैवज रुपये २९० चा व रुपये २२९ वर निकाल करून रुपये दिल्या बद्दल भरपावती तुम्हां जवळ आज एक वर्षभर मागीत आहों. तुम्ही पावती व दस्तैवज देत नाहीं. यावरून तुमचे मनांत खोटे पणा उघड दिसतो करितां तुम्हास ही नोटीस देऊन असें कळवितों कीं तुमचे आम्ही कांहीं एक देणें नाहीं. तुम्हा जवळ दस्तैवज २९० चा पोकळ आहे. पुढें मागें तुम्ही आम्हांवर सदर्हू दस्तैवजा बद्दल फिर्याद वगैरे केल्यास त्याबद्दल जबाबदार आम्ही नाहीं तुम्ही रुपये २२९ घेऊन पावती व दस्तैवज दिला नाहीं तर नोटीस पावताच पावती व दस्तैवज आमचा आम्हांस द्यावा व- तुम्ही विनाकारण आम्हांस ही नोटीस देणें भाग पाडले. याज करितां ह्या नोटीशीचा सर्व खर्च तुह्मी द्यावा म्हणून दिली नोटीस सही. तारीख ७ माहे नोवेंबर सन १८९४ इसवी.

(सही)

सहीची निशाणी वखर– वनसिंग वलद मानाजी पाटील रहाणार नागद यांची असे.

## NOTICE

Draft of rules made by the Akot Municipality in their special general meeting of the 20th October 1894 under section 116 (1) [e] of the Berar Municipal Law 1886 for the inspection and proper regulation of pounds is published for general information as required by section 150 (1) of the Law,

The draft will be taken into consideration on the 8th. December 1894 before which date, objections, if any will be received in writing.

1 Every pound situated within the limits of the Akot Municipality should be inspected once in every month by a person appointed or authorized by the Municipal Committee for the purpose. Such person shall sign the inspection register and compare the vouchers.

2. Every pound keeper shall follow the procedure laid down by the Cattle Trespass Act I of 1871 in respect to the sale of impounded animals.

3. The pound keeper's accounts shall be audited once in every month by a person appointed or authorized by the Municipal Committee for the purpose and such person shall certify the result of his audit to the Municipal Committee.

Akot D. 3rd, November 1894. K. S. Tambe Secretary Municipal Committee Akot.

## नोटीस

कोंडवाड्याचे तपासणी करितां आणि चांगले व्यवस्थे करितां वऱ्हाड म्युनिसिपल कायदा कलम ११६ (१) (इ) प्रमाणें अकोट म्युनिसिपल कमिटीनें तारीख २० माहे अक्टोबर सन १८९४ इ० रोजीं भरलेल्या स्पेशल जनरल सभेंत केलेले नियमांचा मसुदा सदर्हू कायद्याचें कलम १९० अन्वये प्रसिद्ध करण्यांत आला आहे.

सदर्हू मसुदा तारीख ८।१२।९४ इ० रोजीं कमिटींत विचारा करितां घेतला जाईल तरी सदर्हू नियमास कोणाची हरकत असल्यास लेखी कमिटीचे आफिसांत सदर्हू तारखे पूर्वी दाखल करावी.

१ अकोट म्युनिसिपाल हद्दींतील प्रत्येक कोंडवाडा महिन्यांतून एकदां कमिटीचे तपासणीचे कामा करितां नेमलेल्या किंवा अधिकार दिलेल्या इसमानें तपासावा. सदर्हू इसमानें तपासणी रजिस्टरावर सही करावी आणि पावत्या रुजूं पहाव्या.

२ कोंडवाड्या वरील नोकरानें, कोंडवाड्यांत आलेल्या जनावरांचे विक्री संबंधी. आक्ट १ सन १८७१ (Cattle Tresspass Act) यांत सांगितलेले पद्धती प्रमाणें चालावें.

३ कोंडवाड्या वरील नोकरानें ठेविलेले हिशेब तपासण्या करितां नेमलेल्या किंवा अधिकार दिलेल्या इसमानें दरमहा तपासावे.

व आपल्या तपासणीचा दाखला म्युनिसिपाल कमिटीस द्यावा.

Akot 3rd. November 1894 K. S. Tambe Secretary Municipal Committee Akot

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकेट मिळावे ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट नंबर ७ प्रमाणें

दि० कि० मु० नंबर १९/९४

वर्ग १९

विद्यमान डिप्युटी कमिशनर साहेब जिल्हे इलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव— गणु

बापाचे नांव–सखारामजी बाडोदकार कुणबी राहणार उमरी, मोनाबाद तालुके दर्यापुर जिल्हे इलिचपूर यांस मयत.

सखाराम बापाचें नांव भगाजी कुणबी राहणार उमरी ता. दर्यापुर जिल्हे इलिचपूर याचे कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकेट मिळावे ह्मणून सदर्हू अर्जदार याणें अर्ज केला आहे त्याजकरितां सदर्हू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्याणी तारीख ९ माहे डिसेंबर सन १८९४ इसवी रोजीं सदर्हू अर्जाची चौकशी होईल. त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी. तारीख २६ माहे आक्टोबर सन १८९४ इसवी.

C. E. Biddulph
Offg. Deputy Commissioner.
Ellichpur District.

डि० जड्ज
इलिचपूर.


घड्याळ.

किं. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरसें, उघडण्या तोंडाचें, व ६ ज्युएलचें (ह्मणजे चकाचे खालीं वर हिरे बसविलेले आहेत) चावी देण्यास मोगरा. कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक चिकारी कामें मुद्दाम युरोप मध्यें करविलेले. या वर आमचें नांव आहे. हें खिशांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षें दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. ... कांच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वा... च काम पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता–
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशीक

सालभरेर " " १८८
किरकोळ अंकास ............... ८४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.... ८।८६
दुसरे खेपेस ........ ८१

Six monthly ......... 3 ,, 8 as.
Single copy........................... 4 as.

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Advertisement
Below 10 lines...2 Rs.
per line over 10...4 as
Repetition per line 3 as

VOL XXVIII AKOLA MONDAY 19NOVEMBER 1894 NO. 45

वर्ष २८ आकोला सोमवार तारीख १९ माहे नोवेंबर सन १८९४ इ० अंक ४५


### चार तास होऊन गेले आतां आशा सोडा.

अरे देवा! मी तीन चार तास व्यर्थ घालविले ते जर परत आणतां आले असते तर किती मजा झाली असती. पहा! एका क्षणांत मनुष्यावर किती संकटें येऊन पडतात!!

मिस्तर जेम्स काटीस आणि मिस्तर सी. एस बेनेट हे दोघेजण पुष्कळ वर्षें अगदीं जिवलग मित्र होते. ते स्थान फ्रानासिस्को शहरांत राहत असत. गेल्या उन्हाळ्यांत पहिल्याच वेळेस एकमेकांच्या उखाळ्या पाखाळ्या काढून बरेच भांडले. सुविचार मनांत आले व पुन्हां त्यांची गट्टी जमली परंतु एकदां घडी बिघडली ती बिघडली. विचार देवीनें आपल्या स्मरणवहींत टिपून ठेविलें होतें. तें एकमेकांपासून अलग राहण्याबद्दल खबरदारी घेत होते. ह्या दृयांची गांठ एका रस्त्यांत पडली. पुन्हां भांडण सुरू झालें. काटीसच्या मुखांतून फारच कठोर व काळजाला झोंबण्या सारखे शद्ब निघाले आणि त्यानें रागाच्या सपाट्यांत पिस्तुल काढली व बेनेटवर झाडून त्यास लागलीच राम ह्मणावयास लावलें. पुढें ही तो स्वनिंदेनें व दुःखानें जाळला गेल्यामुळें वरच्या सारख्याच लाखोंच्या वाहत असे.

हें पहा असें वागणें किती निरर्थक, कुचकामाचें व दांभिक आहे बरें!

परंतु काटीस ह्मणत असे कीं एका क्षणांत मनुष्यावर कोणतीं संकटें येतील ह्याचा नेम नाहीं. असें आपणास क्षणभर खरें वाटतें परतु ह्या पेक्षां दुसरा अगदीं खोल विचार आहे तो कोणाच्या ध्यानांत येतो! ह्या संकटाचें खरें स्वरूप समजलें नाहीं तर कांहीं चिंता नाहीं. तर ह्याच मुद्यावर दुसऱ्या एका गोष्टीचा विचार करूं.

एक सुज्ञ बाई ह्मणते कीं सन १८६० साली अक्टोबर महिन्यांत मला असा ज्वर जडला होता कीं त्यांतून मी वाचेन असें मला वाटत नव्हतें. माझ्या शरिरांत सर्व ठिकाणीं वेदना होऊं लागल्या व खोकल्यानें मला इतकें जर्जर करून टाकलें कीं माझ्या शरिराचा भेंदा बेंदा होतो कीं काय असें मला वाटलें. मी बिछान्यांत पडून राही परंतु रात्रंदिवस झोंप ह्मणाल तर देवाचें नांव! माझ्यानें उठून बसवत नसल्यामुळें मला चमच्यानें अन्नरस माझ्या तोंडांत घालीत असत. माझी छाती इतकी धडधडत असे कीं ती उशीवर तुह्मांस साफ पाहिलें असता दिसून येईल.

आणि वेदना इतक्या जालीम होत होत्या कीं जसे कोणी मला भोंसकत आहे. मी अशी पंगु होऊन अंथरुणाशीं खिळून राहिले व मला दम बरोबर घेतां येईना. वैद्य बोवा आह्मास सतत एक महिनाभर औषधोपचार करीत होते. परंतु दिवसानुदिवस क्षीण होत चाललें. कधीं कधीं रात्रीं माझी अशी गाळण होऊन जाई कीं सकाळपर्यंत मी जगेन किंवा नाहीं ह्याची मला शंका वाटत असे. त्यांनीं आपल्या दुसऱ्या वैद्याची सल्ला मसलत घेऊन असें ठरविलें कीं हा रोग बरा होणें कठीण आहे. मला तकवा आणण्यास थोडीशीं दारू पाजीत असत. माझे यजमान व मुलगे नेहमीं माझ्या जवळ असत. कोणत्याही औषधापासून मला काडी इतका गुण ह्मणून आला नाहीं. मी आतां यमसदनीं जाणार असें मला वाटूं लागलें.

अशा वेळीं प्लिपथ जवळच्या मोठ्या गांवांतील मिसीस किर्लींग माझी मैत्रीण होती ती धांवून आली व मला मदर सिजेल्चा क्युरेटिव सिरप (ह्मणजे माता सिजेल्चा रोगहारक पाक) घेण्यास गळ घातली. मी लागलीच एक बाटली पैदा करवून औषध घेण्यास सुरू केलें. थोड्याच दिवसांनीं मला अन्न घेतां येऊन पचविण्याची शक्ती आली आणि वाईट लक्षणें कमी होत चाललीं. ह्यावरून असें दिसून येतें कीं ज्या उपाधीनें हिच्या शरिरांत आपला पूर्ण अमल बसवून इतक्या शिखरास पोंचविला होता कीं तिच्या आयुष्याची दोरी तुटण्याची वेळ जवळ येऊन ठेपली. आपल्याला उपाधि समजो व न समजो, परिणाम असाच व्हावयाचा. काटीसनें जो अपराध केला होता त्याचें मुख्य कारण त्याचें एकदम रागावणें व त्या भरांत धिःकार व सूड घेण्याच्या विचारास उत्तेजन देणें व मग असल्या दुष्ट हेतूस स्वाधीन होऊन अशा प्रकारचे खून करण्यास तयार होणें हें होय. ह्याचप्रमाणें ह्या बाईच्या रागाची उपाधि झटली असतां अग्निमांद्य व अजीर्ण होय. कीं जी अखेरीस बेकाम होऊन निवास धक्का बसविण्यास कारणीभूत झाली ह्याचें सार म्हणाल तर एकच. अरिष्टाची टेहळणी प्रारंभीच करावी व पुढें वाढूं देऊं नये म्हणजे तें अरिष्ट आपल्या आटोक्यांत सहज ठेवतां येतें.

ह्या औषधीच्या सहा बाटल्यांचा फन्ना केल्यावर माझी तब्येत पूर्ण ताळ्यावर आली आणि तीस वर्षापूर्वी पेक्षां मला आतां हजार हिशानें बरें वाटत आहे. माझ्या दोन मुली पण अजीर्णा पासून त्रासल्या होत्या. त्या ह्या औषधानेंच बऱ्या झाल्या. मला कोणी विचारतील त्यास मी मोठ्या आनंदानें सांगेन.

(सही) मिसीस लुई ज्याकसन
बिलडर्स आर्मस हॉटेल
बिजरोड, ह्यामरस्मिथ, लंडन
तारीख १४ माहे जानेवारी
सन १८६२

वर लिहिलेल्या ओळी ज्या पत्राचें सार आहे त्यांत मिसीस जानसन बाई असें प्रदर्शित करते कीं सन १८६० च्या आक्टोबरांत जें दुखणें लागलें होतें त्याच्या वीस वर्षां पूर्वीं तिचे पित्ताशय व पक्वाशय बिघडले होते. तिच्या तोंडाची रुची बिघडून गेली होती. आणि थोडे जरी खाल्लें तथापि तिच्या पोटांत कळा मारीत. तिला थकल्यासारखें व गळून गेल्यासारखें आणि उदास झाल्यासारखें वाटे आणि पोट अगदीं खोल गेल्यासारखें वाटल्यामुळें तिला फारच वाईट वाटे. तिच्या छातींत, बरगड्यांत तीव्र वेदना होत, छातीं धडधड होई, घेरी येई व वारंवार रस्त्यांत पडे व तिला घरीं कोणी तरी उचलून आणीत.

F. L.


## जाहिरात,

हे पाक पौष्टीक पहा, व त्वरित गुणपण-तो मजेदार-किंमत थोडी, व फायदा जास्त- हे सेवन करून अनुभव घ्या. ह्या पासून धातुवृद्धि होऊन मर्दुमी वाढते, व शक्ति स्फूर्ति व स्मरणशक्ति फार मिळेल. आणि श्रम पडून मेंदु बिघडतो तो मस्तक मेंदु तरतरीत होईल. हात पाय व कंबर व सर्व सांधे दुखतात तो वायु व बाळंत वायु व सर्दी हे सर्व दूर होतील. सर्व स्त्रियांस व हटकून बाळंतीनीस व तिचे रोगावर खाण्यास गुण देणार योग्य-सौभाग्यसूंट. हे सर्व आमचे दवाखान्यांत विक्रीस तयार आहेत. ज्यांना लागेल त्यांनीं रोख पैसे पाठवून अगर व्ह्याल्युपेबल पार्सलनें मागवावें. खाण्याचे रीतीचा खर्डा या सोबत देऊं. दर खालीं लिहिले प्रमाणें.

त्वरा करा! पाटास खा!! गेला हिवाळा येणार नाहीं!!! वाचा पहा— सालमिश्री पाक दर १ शेरास किंमत रु० ३; बदाम पाक दर शेरास २।८; गोखरू पाक शेरास रु० ५ पांच; कोहळे पाक शेरास रु० ४; सौभाग्य सुंट उत्तम शेरास रु० २. प्रत दुसरी—सालमिश्री व बदाम पाक दर शेरास रुपये २.

पत्ता व सही.
शिवचरणगीर रामगीर वैद्य कुरणखेडकर
दवाखाना अकोला वऱ्हाड.


गेल्या ४ था तारखेस भरलेल्या प्रांतिक जाहिर सभेंत जमिनीच्या साऱ्या विषयीं विचार चालू असतांना रा. रा. रामराव गोपाळ देशपांडे आडगांवकर यांनीं चांगलें मुद्देसूत संभाषण केलें त्याचा भावार्थ येणें प्रमाणें:—

गृहस्थहो, मी फसकी देऊन पंतोजीचे शाळेंत शिकलों आहे करितां माझे बोलण्यानें तुमचें माझे हातून महत्कार्य होईल असें नाहीं, किंबहुना विद्वान सभासदांना तर माझे बोलणें रुचणारही नाहीं हे मी खात्रीनें जाणतों तरी पण त्याची भीति न बाळगता जमिनीची पूर्वस्थिति—सध्याची स्थिति- शेतकरी लोक हल्लीं कोणते स्थितींत आहेत तें सांगून "सारा कां न वाढवावा" त्याचीं कारणें व उपाय थोडक्यांत सागतोंः—

वऱ्हाडचे भाग दोन. १ पाया घाट व २ बाला घाट, हल्लीं ज्यास मेळघाट ह्मणतात तो व त्याचे दक्षिणेचे बाजूस जो जमीन तीस पाया घांट ह्मणतात. मेळघाटचे तळाशी लागून जी जमीन आहे त्यास कडास पट्टी ह्मणतात. त्या कडास पट्टी पासून अजमास ४१५ कोसांत रब्बी होत नाहीं. व ७।८ कोसांवरील जमिनींत होते.

वऱ्हाडची जमीन पूर्वीं ज्यास्त पिकत असे त्या मुळें ह्या प्रांताची पिका विषयीं चहूंकडे रूपाती आहे, व त्या मुळेंच ह्या भागा संबंधानें "वऱ्हाड सोन्याचा कराड" असें ह्मणण्याचा प्रघात आहे. परंतु तें सर्व लयास जाऊन अगदीं उलट झालें आहे. पूर्वीं जमीन ज्यास्त पिकत असे व आतांशा वऱ्हाडची जमीन कमी कां पिकूं लागली ह्याचीं कारणें थोडक्यांत देतों.

प्रथम जमिनीचे किती भेद आहेत ते सांगतों—

१ आखर — ही जमीन काळी व पांढरीचें मिश्रण असणारी; व कांहीं आखरे फक्त पांढरीचीच असतात.

२ मळी—नदी कराडची जमीन आखर, मळी दरवर्षीं नांगरावी लागते.

३ काळी—दोन तीन वर्षांनीं नांगरावी लागते.

४ तेल चिकणी

५ चोपन

६ खारवा—ज्या जमिनीत गवत सुद्धां होत नाहीं तशी सुद्धां वहीत केली ती.

७ कडास—पाहाड मेळघाटास लागून आहे ती. ह्यांतही वर प्रमाणें भेद आहेत. व दगडाळ असते.

८ पाहाडी जमीन मेळघाटांतील—पाहाडी ह्यांत दगड, बटें ह्मणजे सपाट नाहीं ती—गवत जास्त होतें. जमीन हलकी.

टीप.

१ आखर, मळी, चोपन ह्यास लागवड जास्त पाहिजे.

वऱ्हाडची जमीन पूर्वीं ज्यास्त पिकत असे ह्याचीं कारणें—

१ पूर्वीं जमीनीवर उपजिवीका करणारे लोक व शेती वहित करणारे लोक थोडे होते व पडीत जमीन पुष्कळ होती ह्यामुळें पड जमीन वहीत करण्यास मिळत असे व त्यामुळें पूर्ण पीक देत असे.

२ सर्व जमीन वहीत झाली नव्हती. गुरांच्या संख्येच्या मानानें गुरें चारण्यास जमीन पुष्कळ होती त्यामुळें गुरें बाळगण्याचें साधन कमी नव्हतें ह्मणून जनावरें पुष्कळ बाळगली जात होती.

३ वऱ्हाडचे जमीनीस तिला खत पाहिजे तितकें मिळाल्यास उत्तम पिकते; हें साधन पूर्वीं होतें.

कम पिकाचीं कारणें.

१ सर्वे जमाबंदी सन १२७३ फसलीस झाली तेव्हा बहुतेक सर्व जमीन वहीत झाली.

तीस वर्षे सारखी जमीन वहीत झाली आहे त्यामुळें तिचे अंगीं निकसपणा आला व हल्लीं ती वृद्ध दशेस पोहोंचली ह्या मुळें तिचे दशेचे मानानें तिचें पीक कमी झालें.

२ दहा वीस वर्षे जमीन पड राहिल्यास, व त्या जमिनींत गुरें चरल्यास तीस अनायासें खत मिळतें यामुळें ती पुन्हा जोरास येते; अशी जमीन वहीत झाल्यास ती ९–१० वर्षे उत्तम पिकते व पुढें तिचे एक सारख्या वहितीनें कमी कमी पिकूं लागते.

३ सर्वे झाल्या दिवसांपासून जमीनींत माल कमी होतो. नाविकी होवो, जमीन पड पडो, वाहून जावो-सारा भरणें तो भरलाच पाहिजे असें असल्यानीं जमीन मुद्दाम होऊन पड पाडण्यास साधन राहिलें नाहीं. कदाचित ज्याचे जवळ जमीन जास्त आहे तो कदाचित् वर प्रमाणें करूं शकेल पंतु ज्याचे जवळ जमीन कमी आहे त्याच्या असें करणें कधींही साधणार नाहीं.

४. गांवचे जनावरांचें संख्येचें मान पाहून गुरें चारण्यास जमीन ठेविली गेली नाहीं त्या मुळें गुरें बाळगण्याचें साधन कमी झालें, ह्मणून खत दुर्मिळ झालें त्या सरसें पूर्ण पीक मिळणें दुःसह झालें.

विचार करून पहा, आज आपलेवर बादशाहिणी व्हिक्टोरिया आई राज्य करीत आहे तिचे सत्तेखालीं आपण आहों त्या योगानें आपणास एवढा समूह मिळवून विचार करण्यास फावत आहे व तिचे सत्तेखालीं आल्या पासून ती कनवाळू मनाची आई अतिप्रेमानें आपलें सर्व प्रकारें संरक्षण करीत आहे. ह्या अनुभवावरून जसें हें न्यायी, दयाळू राज्य आपणावर आहे तसें पूर्वीं कधीं नव्हतें त्या अर्थी आपल्याला ज्या काहीं मागण्या करण्याच्या आहेत त्या अशाच साम्राज्य खालीं मागण्यास मोठा उल्हास वाटतो.

रेलवे, तारायंत्रें, वगैरे झाल्यानें पुष्कळ प्रकारें आमच्या सोई झाल्या हें निर्विवाद आहे. परंतु आमचे देशांत रेलवे सुरू झाल्यानें परदेशातील किंबहुना द्विपांतरांतील माल आमचे देशांत येऊं लागला त्यायोगानें आमचे देशांतील निरनिराळ्या तऱ्हेचे बहुतेक व्यापार, धंदे बंद पडले व ते लोक शेतकीचें अवलंबन करूं लागलः ह्या पैकीं थोडक्यांत थोडीं उदाहरणें देतों—

१ वऱ्हाडच्या लोकांना पुरेसें कापड वऱ्हाडचे वीणकरी लोकांकडून मिळत असे परंतु आतां यांत्रिक कळेनें बनलेलें सफाईदार व स्वच्छ कापड मिळूं लागलें ह्यामुळें विणकरी लोकांचे धंदे बंद पडले.

२ तेल हल्लीं यांत्रिक कळेचे द्वारें मिळूं लागलें त्यामुळें तेली लोकांचे घाणे बंद पडून देशी व्यापार बुडले.

३ हत्यारे करणारे लोकांचे उपजिवीकेवर हत्यारें बंद झाल्यामुळें त्यांचे धंदे बंद पडले.

४ जरी हत्यारें मोकळीं असतीं तरी पण यांत्रिक कला आम्हांस अवगत नसल्यानें हत्यारें करणारे लोकांचा पाय मागेंच पडला असतां हें निर्विवाद आहे.

५ अशा प्रकारें पुष्कळ गोष्टी आहेत त्या सांगून मी वेळ घेऊं इच्छित नाहीं. मात्र इतकें खरें कीं बहुतेक व्यापार बंद झाले.

एकंदरींत ह्यावरून हें उघड सिद्ध होतें कीं देशी धंदे पडले व ते धंदे करणारे लोक हल्लीं शेतीवर अवलंबून राहूं लागले.

---

# वऱ्हाडसमाचार

मिती कार्तिक वद्य ७ शके १८१६

गेल्या अंकीं प्रसिद्ध झाल्या प्रमाणें चालूं वर्षीच्या शिक्षक समाजाच्या बैठकीस तारीख १४ बुधवारीं अकरा पासून प्रारंभ झाला. सुमारें दीडशें शिक्षक सभेसाठीं आले होते. प्रथमतः मे. डायरेक्टर साहेब यांनीं समाजांतील सभासदांच्या भेटीचा लाभ झाल्या बद्दल आनंद प्रदर्शित करून थोडक्यांत सांगितलें कीं वऱ्हाड प्रांतांत शाळाखातें स्थापन झाल्याच्या मुदतीच्या मानानें हल्लीं जी या खात्याची स्थिती विद्येच्या संबधानें दृष्टीस पडत आहे ती फार चांगली आहे. एजुकेशन कमिशनच्या रिपोर्टांतील सूचने प्रमाणें या प्रांतांत १८८३ सालीं हा शिक्षकसमाज स्थापित झाला. आणि त्या योगें ज्या सुधारणा झाल्या त्या चांगल्या असून फायदाही बराच होत आहे असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. यंदाच्या समाजा पुढें कांहीं सूचना करणें त्यांना इष्ट वाटलें त्या त्यांनीं केल्या नंतर राव साहेब सिताराम विश्वनाथ पटवर्धन बी. ए. यांचें सयुक्तिक भाषण संपून समाजाच्या कामास सुरुवात झाली या समाजाचे दोन भाग आहेत. पाहिला शिक्षकांचा व दुसरा इन्स्पेक्टिंग आफिसरांचा [ परीक्षकांचा ]. या उभय समाजाचीं कामें वेगवेगळीं व वेगवेगळ्या ठिकाणीं चालतात सूचीपत्रका बरहुकूम समाजाच्या कामास सुरुवात झाली. शिक्षकसमाजाच्या प्रोग्रामांत लिहिल्या प्रमाणें सर्व कामें वेळचे वेळीं चालून गेल्या शनिवारीं सकाळीं साडेदहा वाजतां संपूर्ण होऊन शिक्षकसमाजाचे अध्यक्ष रा. रा हरी रामचंद्र रोहिणखेडकर बी. ए. यांनीं थोडक्यांत झालेल्या कामाचें दिग्दर्शन करून मे. डायरेक्टर साहेबांच्या कांहीं सूचना बद्दल आपला अभिप्राय सांगितला आणि या सूचनांचा खल चांगला होण्या साठीं एक वर्षाची मुदत घेतली. अखेरीस समाजांतील मंडळीचे आभार मानतेवेळीं येथील कसरती मास्तर रा. रा. बळवंत गणेश सोवण यांच्या सरकसच्या खेळा विषयीं मोठी स्तुती करून समाजा तर्फे त्यांचे आभार मानले.

शनिवारीं समाजाच्या कामाचा रिपोर्ट वाचल्या नंतर राव साहेब सिताराम विश्वनाथ पटवर्धन बी. ए. डायरेक्टर यांचें समाप्तीचें भाषण फार मोठें, मार्मिक व विचारांनीं ओतप्रोत असें झालें. समयस्फूर्ती, दीर्घ अनुभव व वाक्‌कौशल्य यांनीं त्यांच्या भाषणाचा ओघ सारखा दीड तासभर चालला होता. विषय बहुत होते तरी विचारसरणी सोपी, भाषा साधी व दृष्टांत अनुभवांतले असें असल्या मुळें ते ते विषय सर्वजणांस स्पष्ट समजले व त्यांच्या मनास करमणूक होऊन पुष्कळ बोधही झाला. या संभाषणावरून शाळाखात्यांतील वडामोडींची चांगली कल्पना येईल. या व्याख्यानाचा भावार्थ लिहिण्याच्या पद्धतीनें आह्मी खालीं देण्याचा विचार केला आहे—

राव साहेब म्हणाले कीं:—

मित्र हो, शिक्षक व इन्स्पेक्टर यांच्या समाजांत ३-४ दिवस झालेल्या कामांचा रिपोर्ट आपण ऐकलाच. त्याचप्रमाणें पुष्कळांचीं लेक्चरें झालीं तींही आपण पाहिलीं. मुख्यत्वें करून रा. भागवत व परांजपे यांचे मी विशेष आभार मानितों. हे खात्याबाहेरचे लोक असून त्यांनीं मोठ्या परिश्रमानें अवघड विषय चांगले समजावून दिले. तसेंच रा. बापट साहेब (गव्हर्मेंट टेलिग्राफ सुप्रिंटेंडेंट) यांनीं विजेचे प्रयोग करून दाखविण्यांत पुष्कळ श्रम घेतले ह्या बद्दल मी त्यांचा फार आभारी आहे ज्या शिक्षकांनीं लेक्चरें दिलीं त्याचा मी आभारी आहे. त्यांचा उद्योग, त्यांचा उद्देश, त्यांचे परिश्रम यांचा सर्वांगीं कित्ता घ्यावा. पण लक्षांत ठेवा कीं असें करितांना प्रमाद जितके न घडतील तितकें बरें ! उदाहरणार्थ– ज्या मुलांना त्रैराशिक येत नाहीं त्यांनां उमरावतीचे मास्तर यांनीं उपपत्ति काय शिकवावी ! परिश्रमाचें चीज होईल असें केलें पाहिजे. त्या मास्तरांना समयसूचकता पाहिजे होती. येथें टीका केली तर पुष्कळांना वाईट वाटेल ह्मणून मी बोलत नाहीं. परिश्रम करावे ह्मणजे फायदे होतातच. समाजाच्या झालेल्या कामाचा गोषवारा करून मला जबाब देणें आहे ह्मणजे मग पत्रकाप्रमाणें काम तडीस गेलें असें होईल.

इन्स्पेक्टर कडील सूचनाविषयीं विचार येणें प्रमाणें–

(१) १० रुपयांपासून लोअरक्लास स्कूलावरील शिक्षकांचे पगार व्यक्ति विषयक असावेत, शाळांवर अवलंबून असूं नयेत. ही सूचना कशी अंमलांत येईल याची मला शंका आहे. शिक्षकांचे पगार शाळेची योग्यता, शिक्षकांची ऐपत, ह्यांवर अवलंबून आहेत. ८-१०-१२-१५-२०-२५-३०-३५ अशा पगाराच्या ग्रेडसच्या शाळा आहेत. दहा रुपयांचा मास्तर ३५ रुपयांच्या शाळेवर काम करण्यास तयार आहे ह्मणेल तर त्याची लायकी पटल्याशिवाय मी ती गोष्ट कबूल करणार नाही.

(२) ६-८ रुपये पगारवाल्या मास्तरांस एक महिना पावेतों रजा देण्यास आणि त्यांच्या जागीं तूर्तच्या नेमणूका व ६ रुपया वरील कायमच्या नेमणुका करण्यास जिल्ह्याचे डे० ए० इनस्पेक्टर यांस अधिकार द्यावा. हे अधिकार बोर्डाकडे असल्यामुळें जिल्हा इनस्पेक्टर याचा पत्रव्यवहार फार वाढतो. तो कमी करण्या करितां ही सूचना झालेली आहे ही गोष्ट आह्मांस पसंत आहे. येथें डिस्ट्रिक्ट बोर्डानें अधिकार चालवितात ते सर्व मुंबई इलाख्यांत जिल्हा इनस्पेक्टराकडे दिलेले आहेत व असे अधिकार तेथें योग्य रीतीनें अंमलांत येत आहेत. या करितां ही सूचना मला मान्य आहे सबब याचा योग्य विचार होण्याकरिता डिस्ट्रिक्ट बोर्डाकडे पाठविली जाईल.

( ३ ) सरकारी शाळांना कसरत व तालीम या साठीं द्रव्यद्वारा उत्तेजन बोनस खालीं देतां येईल आणि कसरत व ड्रील ( शाळेतील कवाईत ) हे चालू विषयांत घातल्यानें आपला उद्देश तडीस जाईल.

( ४ ) गोळ्याच्या चौकटा, अक्षरांच्या गंजिफा, तसेंच भूगोलाच्या व्याख्यांचे स्पष्टीकरण करण्याचे नकाशे वगैरे समजूत वाढण्याचीं साधनें अवश्य दिलीं पाहिजेत आणि पैशाच्या सवडी प्रमाणें ही व्यवस्था होत जाईल.

( ५ ) मद्रास एज्युकेशनल जर्नल विषयींची सूचना फार उत्तम आहे. ह्या पुस्तकांत शिक्षण संबधानें सूचना नेहमी दिलेल्या असतात. हें पुस्तक मिडलक्लास स्कुलांस जरूर द्यावें असा माझा हेतु आहे.

( ६ ) मुलींच्या शाळेसाठीं स्वतंत्र क्रमिक पुस्तकें असावीं या सूचनेचा झोंक मी समजलों नाहीं हल्लीं मुलींच्या शाळेंत मुंबई इलाख्यांत चालूं असलेलीं बाळबोध पुस्तकें शिकविलीं जात आहेत व मुलांच्या शाळेंत वऱ्हाडचीं तीन पुस्तकें चालू आहेत. या शिवाय आजच निराळ्या पुस्तकांची मोठीशी आवश्यकता आहे असें वाटत नाहीं. तरी शाळा खात्यांतील किंवा खात्याबाहेरील कोणी गृहस्थानें अधिक योग्य अशीं स्वतंत्र क्रमिक पुस्तकें मुलींच्या शाळांसाठीं तयार केल्यांस त्यांचा योग्य विचार होईल. माझें स्वताचें असें मत आहे कीं लेखन वाचन व हिशेब या संबधाचे ज्ञानाची आवश्यकता मुलांस व मुलींस सारखीच आहे. तेव्हां पहिल्या चार इयत्तां पावेतों मुलांचे व मुलींचे शाळांत सारखाच शिक्षणक्रम असावा. पण याहून ज्यांचें भिन्न मत असेल त्यांणीं या संबधानें अधिक तपशीलवार कारणें व उपाय कळविल्याबाचून याचा उलगडा करितां येणार नाहीं.

( ७ ) मुलींचे शाळेंत स्लेटपेनसिली व पुस्तकें फुकट मिळावीं अशी सुचना झाल्याचे आह्मास नवल वाटतें. शाळेंत येणाऱ्या मुली बहुधा खात्यापित्या लोकांच्याच असतात. त्यांस स्लेटी पुस्तकें देण्याचें मोठें संकट त्यास पडू नये. मुलींस अध्ययनाचे उत्तेजनार्थ खाऊ किंवा कांहीं निवडक उपयोगी वस्तू किंवा पुस्तकें इनाम देणें अयोग्य नाहीं. सवेल तेथें अशा प्रकारचीं इनामें द्यावीं.

( ८ ) वाईट हवापाण्याच्या गांवात असणाऱ्या मास्तरांच्या वरच्यावर बदल्या होत जाव्या या सूचनेने संबंधानें तजवीज जारी आहे. मास्तरांस आपापल्या जिल्ह्यांत व सोय बनेल त्या प्रमाणें त्यांच्या सोयीस अनुसरून नवीन व जुन्या मास्तरांच्या नेमणुका व्हाव्या या तत्वास अनुकूलच माझें मत आहे. आणि होईल त्या प्रमाणें त्यास अनुसरण्याचा माझा इरादा आहे व आपल्या सर्वांच्या देखत जिल्हा इन्स्पेक्टर यांसही माझें हेंच सांगणें आहे.

( ९ ) हल्लीं असलेले फीचे दर कमी व्हावे अशा बद्दल एक सूचना आहे. परंतु हल्लीं चालू दरात कमी होण्या बद्दल कांहीं योग्य कारणें सूचना करणारांनीं दर्शविलीं नाहींत. अशीं समर्पक खात्री लायक कारणें जनेरेस आल्या वांचून आठ नऊ वर्षे चालूं असलेल्या दरांचा पुन्हां विचार होण्या बद्दल सुरुवात करण्यास अडचण आहे. शिवाय ही उत्पन्नाची एक बाब आहे आणि सांप्रत या फीचें उत्पन्न कमी करण्यास डिस्ट्रिक्ट बोर्डाची संमती आहे किंवा नाहीं. हें पहिल्यानें पाहिलें पाहिजे.

( १० ) या खात्यांतील पहिल्या तीन क्रमिक पुस्तकांत कांहीं कमजास्त करून सुधारणा व्हावी अशी सूचना आहे. या खात्यांतील अथवा खात्याबाहेरील गृहस्थांना यांत सुधारणा करून दाखविल्यास सरकारांतून योग्य उत्तेजन मिळ:

ण्या विषयीं यत्न करीन.

(११) हल्लीं इंग्रजी– मराठी व इंग्रजी–हिंदुस्थानी शाळांत ज्या पगारी विद्यार्थ्यांच्या नेमणूका आहेत त्यांची पुन्हां व्यवस्था करून सापेक्षार वाटेल त्या प्रमाणें कांहीं शाळांत कमी व ज्यास्ती पगारी विद्यार्थ्यांच्या जागा कराव्यात अशी सूचना आहे. आम्हांस असें वाटतें कीं आहे या व्यवस्थेंत तूर्तच कमज्यास्त करण्याची कांहीं जरूर दिसत नाहीं. ज्या शाळांत जितक्या नेमणूकी मंजूर आहेत त्यांत कमी केल्यानें कमी केलेल्या जागा दुसरी कडे वाढविण्यास कदाचित जरूर नाहीं असें सरकारास वाटून असलेल्या जागा कमी होऊन दुसरीकडे वाढविल्या न जाण्याची भिती आहे.

(१२) या सालीं वार्षिक बहीवाटी प्रमाणें पुष्कळ व चांगल्या पुस्त्या प्रायमरी शाळांतून आल्या असून गैरसमजुतीनें त्यांस त्या नियमांस अनुसरून नसल्यामुळे त्याबद्दल कोणासही बक्षीस न मिळालेलें पाहून आम्हास दिलगिरी वाटते. या पुस्त्या पैकीं उत्तमांस वर्षा प्रमाणें बक्षिस मिळण्यास कांहीं सवड निवाली असती तर बरें झालें असतें.

याप्रमाणें इनस्पेक्टींग आफिसरांच्या कमिटी कडून झालेल्या सूचनांचा वर प्रमाणें विचार झाला. आतां शिक्षक समाजा कडून झालेल्या सूचनांचा विचार करणें आहे. या सूचना पैकीं कांहीं सूचना वस्तुतः आमचेकडे येण्याची जरूरच नव्हती. त्यांच्या त्यांनीं च त्याबद्दल व्यवस्था करण्याची आहे. पण ज्या विचाराई सूचना दिसतात त्या पैकीं पहिली अशी आहे कीं:—

(१३) तोंडचे हिशोब खालच्या इयत्तेतील मुलांस शिकविण्याचें जड जातें करितां त्या इयत्तेंतून हें शिक्षण काढून टाकावें. पण अशी सूचना अनुभविक शिक्षकाकडून येणें हें अयोग्य दिसतें. वस्तुतः प्रत्येक वर्गास पहिले इयत्ते पासूनही तोंडचे हिशोब शिकविणें चतुर मास्तरांस सहज करितां येईल. आणि ज्यांस दहा पर्यंतच फाडे किंवा शंभर पर्यंत आंख पुरें झाले आहेत त्यांसही तेवढ्याच्याच साह्यानें शेंकडों तऱ्हेनें लहान सहान तोंडचे हिशोब शिकविता येतील. मात्र शिक्षकानें पद्धतवार पायरी पायरीनें व चातुर्यानें व थोडे श्रम घेऊन तें केलें पाहिजे आणि अशा प्रकारें हिशोब शिकाविण्याची पद्धत मुंबई इलाख्याचे उजळणीचे पुस्तकांत स्पष्ट करून दाखविली आहे आणि तीस अनुसरण्याचें शिक्षकाचें कर्तव्य आहे. आणि मला अशी उमेद आहे कीं शिस्तवार यत्न झाल्यास तोंडचे हिशोब लहान मुलांस शिकविण्यास कठीण जातें अशी तक्रार राहणार नाहीं.

(१४) दुसरे दिवशीं शिकविण्याचा धडा खुद्द शिक्षकानें पूर्व दिवशीं तयार करून नंतर विद्यार्थ्यांस शिकवावा असा या खात्यांत नियम ठराविण्यात आला आहे. ही तयारी पूर्वदिवशीं करणें ह्मणजे काय व ती कशी करावी असा प्रश्न विचारण्यांत आला. इतक्यांत सोप्या हुकूमाचा खुलासा होण्या बद्दल प्रश्न यावा हें पाहून आह्मास आश्चर्य वाटतें. जें शिकविण्याचें त्याचें पूर्वावलोकन पाठ देण्या पूर्वीं करणें अवश्य आहे हें समंजस शिक्षकांस समजतच आहे. आतां पूर्वावलोकन ह्मणजे काय याचा अर्थ वस्तुतः सांगण्याची अवश्यकता पडेल असें मला वाटलें नव्हतें पण ज्या अर्थीं कांहीं शिक्षकांस अद्यापि तें समजत नाहीं त्या अर्थीं त्यांस इतकेंच सांगणें आहे कीं जो धडा शिकवावयाचा त्यांत कठीण शब्द किंवा वाक्ये असतील त्यांचा योग्य ठिकाणीं आधार पाहून पक्का करावा. ऐतिहासिक संबंध असल्यास त्यांसही आधार पाहून ठेवावेत. व्याकरण दृष्टीनें त्यांत कांहीं मार्मिकस्थळें असल्यास त्यांचें टीपण करावें. आणि इतर कांहीं माहिती देणें जरूर आहे असें वाटल्यास त्याचाही विचार करून ठेवावा. हाच नियम गणित, इतिहास, भुगोलादिक धड्या विषयी लागू समजावा. अशा तऱ्हेच्या पूर्वालोकनें तयारी केली म्हणजे शिक्षकांस तें धडा शिकविण्याचें काम सर्वांशीं योग्य तऱ्हेनें करितां येतें. धडा शिकवीत असतां कोशादि पुस्तकें पाहण्याची जरूर लागत नाहीं व धड्याच्या आरंभा पासून शेवट पर्यंत मध्यें रसभंग होत नाहीं.

१५ हल्लीं मराठी शाळांत शेंकडा पांच विद्यार्थी फुकट घेतले जातात आणि हिंदुस्थानी शाळांत दहा घेण्याची परवानगी आहे परंतु दहांच्या ठिकाणीं शेंकडा पंधरा घ्यावेत अशी कांहीं हिंदुस्थानी मास्तरांची सूचना आहे या मास्तरांनीं हिंदुस्थानी डेपुटी इनस्पेक्टर मार्फत त्यांच्या म्हणण्यास जी काय अनुकूल प्रमाणें असतील तीं आह्मांस कळवावी ह्मणजे त्यांचा योग्य विचार होईल.

१६ ज्या प्रमाणें हायस्कुलांतील मराठी विद्यार्थ्यांस टाईप छापाचे प्रश्नाचे कागद मिळतात तसे हिंदुस्थानी मुलांस मिळत नसल्यामुळें प्रश्न समजण्यास व त्यांची उत्तरें देण्यास त्यांस कठीण जातें. हिंदु-मराठी विद्यार्थ्यांस जसे प्रश्नाचे कागद मिळतात त्याच रितीचे हिंदुस्थानी मुलांसही मिळणें हें अगदी योग्य आहे परंतु दिलगीरीची गोष्ट कीं मराठी प्रश्नाचे कागद रेसिडेन्सी प्रेसांतून छापून येतात तेथें हिंदुस्थानी कागद छापण्यास उर्दू टाईप नसल्यामुळें ही अडचण होत आहे परंतु पुढील वर्षा पासून ती दूर करण्या विषयी यत्न करण्यांत येईल.

(१७) शिक्षक समाजाचे प्रेसिडेंट यांनीं समाज संबधांत झालेल्या कामकाजाच्या गोषवाऱ्या संबंधानें केलेल्या संभाषणाच्या अखेरीस समाजापासून एकी वाढेत असें म्हटलेलें आहे. हें म्हणणें आम्हास संमत आहे त्यांत आमचा असा निवेश आहे कीं असे समाज वारंवार होण्यांत परस्परांचे विचारांची अदलाबदल होते आणि अशामुळें एकमेकांचे मनोगत परस्परांस पूर्णपणें समजतात.

येणेंप्रमाणें समाज व इनस्पेक्टिंग आफिसरांची कमिटी यांजकडून झालेल्या सूचना बद्दल आह्मी स्वमत कळविलें.

(पुढें चालेल)

## The Berar Samachar

MONDAY NOVEMBER, 19, 1894

The Educational Conference held its annual sessions at Akola last week. It began its work on the 14th. current under the auspices of the Director Rao Saheb Sitaram W. Patvardhan B. A. who opened the meeting formally by a short speech in which he congratulated himself and the higher grade teachers who chiefly composed the meeting upon the opportunity the gathering afforded to strengthen the departmental ties that necessarily existed between all the parts of the Educational machinery of the province and which ties it was always desirable to keep in mutual good understanding in order to secure a smooth working of all the united parts. Rao Saheb Patwardhan suggested certain Educational subjects for the discussion and consideration of Teachers' *Samaj* and the Inspecting officers beyond their usual programme settled between themselves. This being the first year of the change in the personnel of the Directorship, the Conference was an occasion for novel expectations. But as expectations ever fall short of realizations the initiatory speech of the Director did not far leave the stereotyped formula in vogue. However Rao Saheb Sitaram Vishwanath Patwardhan's opening address was short, sweet and to the point. But we were taken by surprise when he delivered on the closing day a long and solid lecture on the different problems before him. The old monotony wos broken and his stirring though not eloquent, delivery made a good impression upon his audience. He spoke freely his mind in his every day way of talk. His thoughts suggested *extempore* expressions, and his expressions were not so formulated as to convey fully his thoughts. Fluency of tongue, modulation of voice and elegance of expressions were the qualities wanting in his speech but these defects were amply compensated by the speaker's out—spoken frankness of mind, sure and firm convictions, practical long experience chequered with individual examples by direct specification. His sincerity and firmness of mind make him less politic than welcome to the hearts of his listeners. The moral tone of plain and truthful speaking was vivid in his address and it rather reached in view of worldly—wise men, the border—land of virtuous faults in his character. We hope—earnestly wish people to follow in his wake. The faultless philosophy of inaction does certainly less good than the less refined but act active and open mind. Language is it not made to conceal thoughts as it has been often employed to do and the present head of the Educational department if he errs, deos so rather in the opposite direction.

We regarded his speech as a whole to be an honest, earnest, out—spoken appeal to the departmental officers as well as to the public to help the cause education.

## वऱ्हाड.

मे. इलिपट साहेब यांची प्रकृति अतिशय नादुरुस्त होती परंतु आतां बरी असून ते समुद्र किनाऱ्याच्या हवेसाठीं मुंबईस गेले.

अकोल्याचे तालीम मास्तर रा. रा. बळवंत गणेश सोमण यांनीं शिक्षक समाजाच्या करमणुकी साठीं घोड्याची सरकस व उत्तम कसरत ही दाखविली. प्रथम प्रयत्नाला इतकें यश आलें हें त्यास भूषणास्पद होय. मेहरबान डायरेक्टर, दांडेकर व सुळे यांनीं या कामाबद्दल उत्तेजनार्थ कांहीं बक्षीसही दिलें. राजश्री बळवंतराव यांच्या श्रमाचें व कर्तबगारीचें मोल लक्षांत घेऊन मे. डायरेक्टर त्यांची खात्यांत बढती करितील असे आह्मी इच्छितों. कारण कीं योग्य कामाला योग्य बक्षीस हें त्यांचें मूळ तत्व आहे.

वऱ्हाडांत तीन आसिस्टंट कमिशनर नवीन सिमल्याहून धाडण्यांत आले आहेत त्यांचीं नांवें येणे प्रमाणें:—

लेफ्टेनंट स्पौडन
क्याप्टन आयव्हर्स
मि. हार्व्हिन्.

या तिघांपैकीं क्याप्टन आयव्हर्स यांची नेमणूक आकोल्यास झाल्या अन्वयें त्यांनीं आपलें कामाचा चार्ज घेतला.

मि. हेअर डेपुटी कमिशनर यांची स्वारी तारीख २० पासून दवऱ्यावर निघून तारीख १८ दिसेंबरच्या सुमारास परत सदर स्टेशनला येईल.

कर्नल स्पान्स्की कमिशनर यांची स्वारी उद्ईक आकोट तालुक्यांत जाईल.

येथील लोकप्रिय स्टेशन मास्तर रा. रा. विष्णु वासुदेव खरे हे कांहीं दिवसांच्या रजेवर कोंकणांत गेले होते ते गेल्या १७ वे तारखेपासून आपल्या कामीं रुजूं झाले.

## नोटीस

ह्या जाहिरातीनें अकोलें म्युनिसिपाल हद्दीतील सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं सदर्हू हद्दींतील रहाणारे किंवा कोणताही धंदा, कलेचें काम, उद्योग, किंवा उद्योग करीत असलेले, मेहेरबान डेप्युटि कमिशनर साहेब यांचे आफिसांतील नोकर खेरीज करून बाकी सर्व लोकांस वरील सन १८९४-९५ सालच्या टाऊनफंड कराच्या आकारणीच्या याद्या तयार जाहल्या आहेत. त्या म्युनिसिपाल आफिसांत आफिसचे वेळेंत सकाळीं ११ वाजल्या पासून संध्याकाळीं ५ वाजे पर्यंत पाहण्याला ठेविल्या आहेत. तरी कळविण्यांत येतें कीं, सर्व लोकांनीं आपापल्यावर किती कर बसविला गेला आहे हें पाहून सदर्हू कराबद्दल तक्रार असेल तर ती नोटोशीचे तारखेपासून एक महिन्याचे आंत करावी. सदर्हू कर तारीख १ ली जान्युअरी १८९५ रोजीं एक हप्त्यानें दिला पाहिजे.

अकोला
ता. १७।११।९४.

D. G. Patvardhan.
सेक्रेटरी
म्युनेसिपाल कमेटी
अकोला.

### NOTICE

It is hereby published for general information of the people living in the Akola Municipality that assessment lists of the Town Fund tax for the year 1894-95 due by all persons residing or practising any profession or art or carrying on any trade or calling, except by the staff of the Deputy Commissioner's office, are complete and ready for inspection in the Municipal office during office hours (from 11 A. M. to 5 P. M.). The persons concerned are requested to see what tax has been imposed upon them, and take objections to the same if any within one month from the date of this notice. The tax is payable in one instalment on the 1st, of January 1895.

Dated Akola 17th. November 1894

D. G. Patvardhan
Secretary
Municipal Committoe Akola.

## वर्तमानसार,

अमेरिकेच्या कापसाचा भाव हल्लीं अगदींच बसून गेला आहे.

चीन व जपानची लढाई— या लढाईची विझवाविझवी करण्यासाठीं चीननें इंग्लंडला मध्यस्ती घातलें असून पुन्हां इंग्लंडनें "शांतिरस्तु पुष्टिरस्तु" चें बोलणें सर्व राजांकडे चालविलें आहे. असें ह्मणतात. इकडे फंगवहग प्रांत जपानी लोकांनीं आपल्या स्वाधीन घेतला आहे. व किनचाऊ प्रांत स्वाधीन घेतल्याची बातमी आहे. पोर्टआर्थर बंदरचा कबजा जपानीयांनीं घेतला ह्मणून जी बातमी उठली होती ती विश्वसनीय नाहीं तसेंच किन्लीचतमिंग या भागाचा कबजा चीन लोकांनीं पुन्हां परत मिळविला अशी जी बातमी पसरली होती; तीही खोटी ठरली.

ठरल्या प्रमाणें व्हाईसरायांचा प्रवास सुरू झाला असून जागजागीं मानपान घेत स्वारी चालली आहे. हिंदुस्थानच्या सरहद्दीकडे या वेळची मोहीम असून लष्करी बंदोबस्तही जारीनें होत आहे. या वरून तत्प्रांतीय लोकांवर आपल्या लष्करी ऐश्वर्याची छाप बसाविण्याचा विचार असावा असा पुष्कळांचा समज झाला आहे.

व्हाइसरायांस लाहोरच्या दरबारच्या वेळीं नजर करण्यासाठीं साटीनच्या रुमालावर जरीकाम केलेलें एक मानपत्र, बाई जरबाई कुंवरजी डाक्टर या पारशी बाईनें तयार केलें. त्यांत व्हाइसरायांची तसबीर असून, अपकारी, आयात जकात, वगैरेच्या बोजांतून हिंदुस्थानास मुक्त करण्याचा इंग्रजींत एक अर्जही आहे. काम सर्वोत्कृष्ट झालें आहे!

म्यांचेस्टरच्या मंडळीनें गेल्या बुधवारीं असा ठराव केला आहे कीं, म्यांचेस्टर येथें कापसाचा व्यापार करणारी एक मंडळी काढावी, व म्यांचेस्टराहून थेट परस्पर हिंदुस्थानांत कापड पाठविण्यांत यावें.

शेंकडा ७ टक्के व्याजाच्या एक कोटी रुपयांच्या नोटा, चीननें इंग्लंडांत काढल्या होत्या. त्या पेक्षां मागणीदारांची संख्या जास्त झाली आहे. सोन्याचा सूर हल्लीं तिकडेच आहे!

लौकरच फ्रेंच व मादागास्करची प्रजा यांच्यांत लढाई होईल अशीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत.

डेलीन्यूज पत्र ह्मणतें, कीं "संस्थानिकांना विलायतेच्या मोठमोठ्या लोकांनीं आपल्या मुली द्याव्या ह्मणजे हिंदुस्थानचें राज्य आपल्या हातून जाण्याची भीति नाहीं. इतकी स्थिति कां आली!

हिंदीमहासागरांत बाली नांवाचें बंदर डच लोकांचे स्वाधीन आहे. तेथील प्रजा आपल्यांस हिंदू म्हणविते. त्यांनीं डच लोकांवर बंडावा करून, त्यांस तेथून हांकून लावण्याची व्यवस्था केली आहे.

हायकोर्टाचा ठराव:— कोणताही खटला सेशनकमिट करणें असेल, तर म्याजिस्ट्रेटनें त्यासंबंधीची सर्व माहिती हायकोर्टास अगाऊ कळविण्यांत यावी असा ठराव अमदाबाद, सुरत, भरूच, नासिक, विजापूर सातारा व धारवाड या जिल्ह्यांत कायमचा लागू केला असून, एक वर्ष पर्यंत अदमासाकरितां तो पुणें जिल्ह्यांसही लागू करण्यांत आला आहे. स. वि.

वजिरिस्थानची सरहद्द कायम करण्या करितां गेलेल्या इंग्रज कामदारांच्या छावणीवर वजिरी लोकांनीं एक मोठा हल्ला केला, पण त्यांचे बरेच लोक मारून त्यांस हाकून लावलें.

जांडोला येथील इंग्रजी छावणीवर हल्ला करण्या करितां ३,००० वजिरीलोक एकवट झाले आहेत व त्याकरितां जांडोलच्या छावणींत इंग्रजी फौजेचा जास्त भरणा झाला होता.

सुमारें ३,००० वजिरी लोकांनीं ता० २ रोजीं पहाटेस ५॥ वाजतां इंग्रजी छावणीवर एकाएकी हल्ला केला. त्यांच्या हल्याचा आगाऊ सुगावा असल्यामुळें इंग्रजी छावणींत ही सर्व तयारी होती.

हे वजिरी लोक एकदम चाल करून येतांच मोठी निकराची लढाई सुरू झाली. त्यांच्यांत कांहीं तरवारवाले व कांहीं बंदुकवाले असे होते.

ते चालून येतांच प्रथम इंग्रजी छावणींतल्या गुरखा फौजेशीं त्यांचा सामना सुरू झाला. सुमारें अर्धा तासपर्यंत अगदीं आंगाशीं आंग भिडून मोठी निकराची लढाई झाली.

वजिरी लोकांचा जरी फार मोठा भरणा होता तरी इंग्रजी फौजेनें फार बहादुरी केली व त्यांत गुरखा लोकांनीं तर फारच चांगलें काम केलें.

सुमारें ६। वाजतां चांगलें दिसूं लागल्यावर वजिरी लोकांनीं पळ काढला व इंग्रजी छावणींतील कांहीं तोफा, स्वार व पायदळ यांणीं त्यांचा पाठलाग चालविला. सुमारें १० मैल लांबपर्यंत त्यांचा पाठलाग करण्याचें चालू होतें व त्या पाठलाग करण्यांत वजिरी लोकांच्या जमावाची अगदीं अव्यवस्था करून टाकली. अ० द०

## नोटीस

रा. रा. गणु वल्लद ज्यानजी कुटे राहणार खातखेडें ता० मलकापुर यांस नोटीस देणार तोताराम वल्लद भोनजी पाटील राहणार पुन्हई ता. मलकापुर नोटीसिने कळवितो कीं. तु आमचे बायकोस म्हणजे आपले बहीणीस माहेरपणा करिता सोन्याचांदीचे दागिने रुपये ( ३१८८ ) चे तीच्या अंगांवर घालून तु तीजला आपले ताब्यात घेऊन तीजला घेऊन गेलास व कबुली प्रमाणें तीजला लागलेच महिना भरात माझे घरी आणुन सर्व दागीन्या सुद्धा पोचती करणेची त्यास आजपावेतो तसें केले नाहींस ह्यास आज अदमासे २ दोन वर्षे होऊन गेली तर तुजला असे ह्या नोटीशिने कळविले जाते कीं नोटीस पावल्या पासून आठ दिवसात दागीन्या सुद्धा माझे बायकोस माझे घरी आणुन पोचती करावी असे जाहाले नाहींतर तुजवर दागीन्या बद्दल व बायको बद्दल फिर्याद करून दागीन्या सुद्धा बायको ताब्यात घेण्या बद्दल तजवीज केली जाईल. म्हणून दिली नोटीस सही तारीख ८ माहे नोव्हेंबर सन १८९४ इ०

[ सही ]

तोताराम वल्लद भोनजी पाटील रहाणार पुन्हई तालुके मलकापूर दस्तुर खुद्द.

## नोटीस

मुक्तो मर्द तोताराम पाटील रहाणार खातखेडे तालुके मलकापूर ईस नोटीस देणार तोताराम वल्लद भोनजी पाटील रहाणार पुन्हई तालुके मलकापूर नोटशीनें असें कळवितो कीं तू माझी पाटाची बायको असून आज अदमासें दोन वर्षे होऊन गेली. तू माहेरपणास दिपवाळी करितां आपले माहेरी तुझा भाऊ गणु वल्लद जानजी कुटे रहाणार खातखेडे याजबरोबर गेलीस व जाते वेळीं तुझे भावानें व तू आपल्या अंगावर दागिनें घेऊन गेलीस ते तपशीलवार लिहिले प्रमाणें—

| किंमत रुपये | सोन्याचे दागिनें | तोळे |
|---|---|---|
| २६ | नथ सोन्याची तोळा एक | १ |
| ५२ | बाळ्या जोड तोळे दोन | २ |
| ७८ | पुतळ्या तीन तोळे | ३ |
| १९८८ | गरसरी मासे नवाची. | |
| १७५८८ | | |

| किंमत रुपये | चांदीचे दागिनें | तोळे |
|---|---|---|
| ९० | गुंडवाळ्या जोड वजन तोळे | ९० |
| ४० | कोपरवाळ्या जोड वजन तो० | ४० |
| १६ | पाटल्या जोड एक वजन तो० | १६ |
| १६ | गोल जोड एक वजन तोळे | १६ |
| ११ | गोफ चांदीचा वजन तोळे | ११ |
| १० | आरशी व मुद्या किं० रुपये | १० |
| १८३ | | |

किंमत एकंदर रुपये ३१८८.

हे सदरील दागिनें तू व तुझा भाऊ असें मिळून घेऊन गेला. त्या नंतर तू मजकडे येण्याच तर तू आली नाहींस. दोन वेळा माणसें तुजला घेण्या करितां पाठविले त्यांस तू व तुझा भाऊ यांणी असें सांगितलें कीं समक्ष तुह्मी या आणि घेऊन जा. त्याप्रमाणें मी मज बरोबर नारायण येडू पाटील वडाळीकर व विठोबा वल्लद हरासिंग पाटील पिंपळखुठे असें मिळून आलो. त्यावेळीं तू व तुझा भाऊ यांनीं असें सांगितलें कीं मी पुरुषामध्यें नाहीं. नंतर त्यावेळीं तुझे व तुझ्या भावाच्या सांगण्या प्रमाणें वडाळीस नारायण येडू पाटील यांच्या घरी तुझी खात्री मी पुरुषांमध्यें आहे अशी पक्की खात्री करून दिली त्यावेळीं तू व तुझा भाऊ दिवस निघाल्यावर तुजला मजबरोबर पाठवून देतो असे कबूल केलें व उजेड पडण्याच्या अगोदरच तू न कळतां पळून गेलीस याज करितां तुजला असें कळवितों की नोटीस पावल्या पासून आठ दिवसात सदरील दागिन्या सुद्धां तू मजपाशी यावेस तुजला सर्व प्रकारानें वागविण्यास मी तयार आहे. व वागवीन याजबद्दल चार जात भाई पंचाची खात्री रितीवार करून देण्यासही तयार आहे. व आज पर्यंत दोन वर्षाची खावटी रीतशीर देण्यास तयार आहो. तर तू नोटिशीत कळविल्याप्रमाणें मजपाशी यावेस असें झालें नाहीं तर तुजला दागिन्या सुद्धां ताब्यांत घेण्याबद्दल काम चालवून ताब्यांत घेतली जाईल. ह्मणुन नोटीस दिली सही तारीख ८ माहे नोव्हेंबर सन १८९४ इ०

( सही )

तोताराम वल्लद भोनजी पाटील रहाणार पुन्हई तालुके मलकापूर द० खु०

## नोटीस

रा. रा. कृष्णाजी व० गजमल भुसारी राहणार काकडे तालुके व जिल्हे एलिचपूर यास. नोटीस देणार तुळसी मर्द कृष्णाजी हल्लीं वस्ती सुरजी तालुके दर्यापूर जिल्हा एलिचपूर नोटीशीनें असें कळविते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून आज अजमासें ९ वर्षे झालीं मी शहाणी झाली या पांच वर्षांत मी एक वर्ष तुजपाशीं होते या वेळांत पुरुषापासून बायकोस दुनियेदारीचे व इतर सुख जें मिळण्याचें तें तुजपासून मिळत नाहीं असें पक्के आढळून आल्यामुळें मी आपल्या बहिणीचे येथें चार वर्षे आहे ह्या वेळांत तूं संसार करिशील ह्मणून वाट पाहिली परंतु तसें होण्याचें कांहीं एक दिसत नाहीं, करितां तुजला असें कळवितें कीं नोटीस पावल्यापासून ८ दिवसांत तूं संसार करणार याची चार जात भाई पंचा समोर खात्री करून द्यावी व याच प्रमाणें माझे अन्नवस्त्राची व माझे जीवास कांहीं तुजपासून इजा होणार नाहीं याज बद्दल खात्री करून द्यावी ह्मणजे मी तुज पाशीं येऊन सर्व तऱ्हेनें राहण्यास तयार आहे. व आज चार वर्षांचे खावटीचे दोनशें २०० रुपये देऊन मजला घेऊन जावें असे झालें नाहीं तर मी खावटीचे रुपयाबद्दल सरकारांत काम चालवीन व नोटीशीचे खर्ची सद्ध अखेर निकाल होईपर्यंत जे रुपये लागतील ते भरून घेतले जातील. व तू संसार न केल्यास निरुपयाचे गोष्टीबद्दल तुशी होच सोडचिठी समजुन मी दुसरा घरठाव करिन मग कोणतेही प्रकारचा नवऱ्याचा हक्क मजवर नाहीं ह्मणून दिली नोटीस सही ता. १०-११-९४.

(सही) निशाणी हातची बांगडी तुळसी मर्द कृष्णाजी राहणार सुरजी.


## घड्याळ.

कि. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे ( ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसविलेले आहेत ) चावी देण्यास मागरा. कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक विलारी काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेले. या वर आमचें नांव आहे. हें खिश्यांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षे दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—

गोविंद महादेव पोळ

वाच मेकर

नाशीक


☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साळअखेर " ७ " १॥८
किरकोळ अंकास ............... ०४

Six monthly ........ 3 " 8 as.
Single copy.......................... 4 as.

नोटिशीबद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस.... ०।०६
दुसरे खेपेस ....... ०१

Advertisement
Below 10 lines...2 Rs.
per line over 10...4 as
Repetition per line 3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXVIII AKOLA MONDAY 26 NOVEMBER 1894 NO. 46
वर्ष २८ आकोला सोमवार तारीख २६ माहे नोवेंबर सन १८९४ इ० अंक ४६

चार तास होऊन गेले आतां
आशा सोडा.

अरे देवा! मी तीन चार तास व्यर्थ वालविले ते जर परत आणतां आले असते तर किती मजा झाली असती. पहा! एका क्षणांत मनुष्यावर किती संकटें येऊन पडतात!!

मिस्तर जेम्स कार्टीस आणि मिस्तर सी. एस बेनेट हे दोघेजण पुष्कळ वर्षे अगदीं जिवलग मित्र होते. ते स्वान फ्रानासिस्को शहरांत राहत असत. गेल्या उन्हाळ्यांत पहिल्याच वेळेस एकमेकांच्या उखाळ्या पाखाळ्या काढून बरेच भांडले. सुविचार मनांत आले व पुन्हां त्यांची गट्टी जमली परंतु एकदां घडी बिघडली ती बिघडली. विचार दैवीनें आपल्या स्मरणवहींत टिपून ठेविलें होतें. ते एकमेकांपासून अलग राहण्याबद्दल खबरदारी घेत होते. ह्या दृयांची गांठ एका रस्त्यांत पडली. पुन्हां भांडण सुरू झालें. कार्टीसच्या मुखांतून फारच कठोर व काळजाला झोंबण्या सारखे शब्द निघाले आणि त्यानें रागाच्या सपाट्यांत पिस्तुल काढली व बेनेटवर झाडून त्यास लागलीच राम ह्मणावयास लावलें. पुढें ही तो स्वनिंदेनें व दुःखानें नाडला गेल्यामुळें बऱ्याच सारख्याच लाखोल्या वाहत असे.

हें पहा असें वागणें किती निरर्थक, कुचकामांचें व दांभिक आहे बरें!

परंतु कार्टीस ह्मणत असे कीं एका क्षणांत मनुष्यावर कोणतीं संकटें येतील ह्याचा नेम नाहीं. असें आपणास क्षणभर खरें वाटतें परतु ह्या पेक्षां दुसरा अगदीं खोल विचार आहे तो कोणाच्या ध्यानांत येतो! ह्या संकटाचें खरें स्वरूप समजलें नाहीं तर कांहीं चिंता नाहीं. तर ह्याच मुद्यावर दुसऱ्या एका गोष्टीचा विचार करूं.

एक सुज्ञ बाई ह्मणते कीं सन १८६० साली अक्टोबर महिन्यांत मला असा ज्वर लडला होता कीं त्यांतून मी वाचेन असें मला वाटत नव्हतें. माझ्या शरिरांत सर्व ठिकाणीं वेदना होऊं लागल्या व खोकल्यानें मला इतकें जर्जर करून टाकलें कीं माझ्या शरिराचा मेंदा बेंदा होतो कीं काय असें मला वाटलें. मी बिछान्यांत पडून राही परंतु रात्रंदिवस झोप ह्मणाल तर देवाचें नांव! मायानें उठून बसवत नसल्यामुळें मला चमच्यानें अन्नरस माझ्या तोंडांत घालीत असत. माझी छाती इतकी धडधडत असे कीं ती उशीवर तुह्मांस साफ पाहिलें असतां दिसून येईल.

आणि वेदना इतक्या जाळीम होत होत्या कीं जसे कोणी मला भोंसकत आहे. मी अशी पंगु होऊन अंथरुणाशीं खिळून राहिले व मला दम बरोबर घेतां येईना. वैद्य बोवा आह्मास सतत एक महिनाभर औषधोपचार करीत होते. परंतु दिवसानुदिवस क्षीण होत चालले. कधीं कधीं रात्रौ माझी अशी गाळण होऊन जाई कीं सकाळपर्यंत मी जगेन किंवा नाहीं ह्याची मला शंका वाटत असे. त्यांनीं आपल्या दुसऱ्या वैद्याची सल्ला मसलत घेऊन असें ठरविलें कीं हा रोग बरा होणें कठीण आहे. मला तकवा आणण्यास थोडीशीं दारू पाजीत असत. माझे यजमान व मुलगी नेहमीं माझ्या जवळ असत. कोणत्याही औषधापासून मला कांही इतका गुण ह्मणून आला नाहीं. मी आतां यमसदनीं जाणार असें मला वाटूं लागलें.

अशा वेळीं प्लिपथ नवळच्या मोटली गांवांतील मिसीस किलींग माझी मैत्रीण होती ती धांवून आली व मला मदर सिजेलचं क्युरेटिव सिरप (ह्मणजे माता सिजेलचा रोगहारक पाक ) घेण्यास गळ घातली. मी लागलीच एक बाटली पैदा करवून औषध घेण्यास सुरू केलें. थोड्याच दिवसांनीं मला अन्न घेतां येऊन पचविण्याची शक्ती आली आणि वाईट लक्षणें कमी होत चालली. ह्यावरून असें दिसून येतें कीं ज्या उपाधीनें हिच्या शरिरांत आपला पूर्ण अमल बसवून इतक्या शिखरास पोंचविला होता कीं तिच्या आयुष्याची दोरी तुटण्याची वेळ जवळ येऊन ठेपली. आपण्याला उपाधि समजो व न समजो, परिणाम असाच व्हावयाचा. कार्टीसनें जो अपराध केला होता त्याचें मुख्य कारण त्याचें एकदम रागावणें व त्या भरांत विःकार व सूड घेण्याच्या विगरास उत्तेजन देणें व मग असल्या दुष्ट हेतूस स्वाधीन होऊन अशा प्रकारचे खून करण्यास तयार होणें हें होय. ह्याचप्रमाणें ह्या बाईच्या रागाची उपाधि ह्मटली असतां अग्निमांद्य व अजीर्ण होय. कीं जी अखेरीस बेफाम होऊन जिवास धका बसविण्यास कारणीभूत झाली ह्याचें सार म्हणाल तर एकच. अरिष्टाची टेहळणी प्रारंभींच करावी व पुढें वाढूं देऊं नये म्हणजे तें अरिष्ट आपल्या आटोक्यांत सहज ठेवतां येतें.

ह्या औषवीच्या सहा बाटल्यांचा फन्ना केल्यावर माझी तब्येत पूर्ण ताळ्यावर आली आणि तीस वर्षांपूर्वीं पेक्षां मला आतां हजार हिशानें बरें वाटत आहे. माझ्या दोन मुली पण अजीर्णा पासून त्रासल्या होत्या. त्या ह्या औषधानेंच बऱ्या झाल्या. मला कोणी विचारतील त्यास मी मोठ्या आनंदानें सांगेन.

( सही ) मिसीस लुई ज्याकसन
बिलडर्स आर्मस होटेल
बिजरोड, ह्यामरस्मिथ, लंडन
तारीख १४ माहे जानेवारी
सन १८६२

वर लिहिलेल्या ओळीं ज्या पत्राचें सार आहे त्यांत मिसीस जानसन बाई असें प्रदर्शित करते कीं सन १८६० च्या आक्टोबरांत जें दुखणें लागलें होतें त्याच्या वीस वर्षां पूर्वीं तिचे पित्ताशय व पक्वाशय बिघडले होते. तिच्या तोंडाची रुची बिघडून गेली होती. आणि थोडे जरी खाल्लें तथापि तिच्या पोटांत कळा मारीत. तिला थकल्यासारखें व गळून गेल्यासारखें आणि उदास झाल्यासारखें वाटे आणि पाट अगदीं खोल गेल्यासारखें वाटल्यामुळें तिला फारच वाईट वाटे. तिच्या छातींत, बरगड्यांत तीव्र वेदना होत, छातीं धडधड होई, घेरी येई व वारंवार रस्त्यांत पडे व तिला घरीं कोणी तरी उचलून आणीत.

F. L.

वऱ्हाडसमाचार

मिती कार्तिक वद्य १४ शके १८१६

## रावसाहेब पटवर्धन यांचें भाषण

( मागील अंकावरून समाप्त )

समाजास आरंभ होण्याचे वेळेस मी जें भाषण केलें त्यांत खालीं लिहिलेल्या सात मुद्यांवर शिक्षक समाज व इनस्पेक्टींग आफिसर्स यांनीं विचार करून आपले अभिप्राय कळवावे असें सुचविलें होतें:—

(१) सांप्रतचा शिक्षणक्रम
(२) इयत्ता
(३) परिक्षा पद्धति
(४) स्त्रीशिक्षण
(५) नीतिशिक्षण
(६) शारिरशिक्षण
आणि (७) औद्योगिक शाळा

पहिल्या तीन मुद्याविषयीं समाजाकडून किंवा इनस्पेक्टिंग आफिसरांकडून त्यांचा अभिप्राय कांहीं एक कळला नाहीं आणि बाकीच्या चार मुद्यासंबंधानें त्या प्रकारचीं शिक्षणें देणें अवश्य आहे असें सर्वांस संमत आहे. ज्या अर्थीं पहिल्या तीन मुद्यासंबंधानें शिक्षक समाज व इनस्पेक्टींग आफिसर्स यांनीं कांहीं उल्लेख केलेला नाहीं त्या अर्थीं त्या संबंधाच्या हल्लींच्या स्थितींत कांहीं फेरफार होण्याची जरूरी नाहीं असा त्यांचा अभिप्राय आहे असें मी समजतों. परंतु या प्रसंगीं या तीन मुद्याच्या संबंधानें जे माझे विचार आहेत ते मी थोडक्यांत दर्शवितों.

मला या प्रांतीं आल्यास जरी फार दिवस झाले नाहींत तरी मागील सात महिन्यांत या प्रांतांतील लहान मोठ्या मिळून सुमारें १२५।१५० शाळा पाहिल्या आहेत. त्यांच्या स्थितीवरून मला वाटतें कीं शिक्षणक्रमांत अद्यापि पुष्कळ सुधारणा होणें अवश्य आहे. मोठी अक्षर सुरेख, वळणशुद्ध लिहिण्याची योग्य पद्धति अजून अनुसरण्यांत आली नाहीं. पुष्कळ विद्यार्थ्यांचें अक्षर त्यांच्या इयत्तेच्या मानानें चांगलें नाहीं. यापुढें शिक्षकांनीं चांगलें लक्ष दिलें पाहिजे वाचन पाहतां बरेच दोष दिसतात. स्वर असावा तसा नाहीं. आणि स्वर असावा तसा नसून हेल काढून कर्णांस अप्रिय अशा स्वरानें बहुतेक विद्यार्थी वाचतात. जरी या प्रांतांतील भाषणाच्या वळणामुळें विद्यार्थ्यांस अशा प्रकारच्या वाचनाबद्दल सर्वथैव दोष देतां येत नाहीं तरी शिक्षकांनीं हाच दोष दूर करण्या करितां योग्य मेहनत घेतल्यास उत्तरोत्तर यांत सुधारणा होईल अशी उमेद बाळगतों. तोंडचे हिशोब शिकविण्याची अवश्यकता अद्यापि शिक्षकांच्या अंतःकरणावर ठसलेली नाहीं असें दिसतें. आणि हा विषय मुलांस साध्य होणें कठीण अशा समजुतीनें किंवा भ्रांतीनें करावे तितके परिश्रम शिक्षकांनीं केले नाहींत पण अशा प्रकारचें दुर्लक्ष्य यापुढें होऊं देतां कामा नये. वस्तुतः अगदीं लहानपणा पासूनच मुलांचीं मनें या विषयाकडे लावल्यानें त्यांचे बुद्धीस चलन मिळतें व त्यांच्या वाढत्या वया अनुरूप त्यांच्या विचारशक्ती फैलावल्या पाहिजेत.

सांप्रतचे प्राथमिक शिक्षणांत मुख्य विषय ह्मटले ह्मणजे लेखन, वाचन व हिशोब हे आहेत. जसे भोजनांत वरण भात व भाकरी. भूगोल, इतिहास, वगैरे विषय भोजनांतील चटणी, भाजी, कोशिम्बीर यांच्या स्थानीं ह्मणजे मुख्य विषयांस चटक देणारे पदार्थ समजावयाचे. मुख्य तीन विषयांच्या शिक्षणांत जेव्हां कंटाळा किंवा त्रास वाटतो त्या वेळेस भूगोल इतिहासादि शिक्षण रूपानें विषयान्तर करून रंजनही त्या पासून करून घ्यावें. शिक्षणांत बुद्धिविकास, विचारशक्ति, व अवलोकन हीं जेणेंकरून वाढतील असा शिक्षणाचा उद्देश शिक्षकानें डोळ्या समोरून ढळूं देऊं नये नुसत्या पाठांतरापासून तादृश हित नाहीं. तो केवळ भार समजावयाचा. कान, डोळे, हात वगैरे इंद्रियें व अवयव यांच्या शक्तीस चलन दिलें पाहिजे. बुद्धीचा ओघ न खुंटता पुढें चालू राहतो. असें पाहण्यांत येते कीं खेड्यापाड्यांतील मुलांचें चार पांच बुकापर्यंत अध्ययन झालें ह्मणजे त्यांस शेती वगैरे त्यांचा पिढीजादा धंदा करण्यास लाज वाटते हा दोष माझ्यामतें हल्लींच्या शिक्षण पद्धतीकडे येतो. कारण त्याच्या अध्ययना पासून त्यांचा विचार व अवलोकन यांचा विकास झालेला नसतो. वस्तुतः प्राप्त झालेल्या अल्पस्वल्प ज्ञानाचा उपयोग आपली गृहस्थिती वगैरे समजावून घेणें व तिची सुधारणा करणें या कामाकडे त्यांस करितां येत नाहीं. तर शिक्षणाचा उपयोग अशा कामाकडे लाविता येईल अशा प्रकारची त्याला पद्धति लागली पाहिजे. जीं मुलें लहाणपणीं बुद्धिवान, तरतरित व होत करूं दिसतात तींच थोडीं वयांत आलीं ह्मणजे तीं मंद दिसूं लागतात असें खुद्द माझ्या अवलोकनांत अनेक प्रसंगीं आलें आहे. व आपल्याही आलें

असेल. याला कारण सांप्रतची शिक्षण पद्धति. कारण विचार शक्तीस योग्य वाव मिळत नाहीं. विचारा वाचून नुसती पाठशक्ति वाढविल्यानें बुद्धि सामर्थ्य मंदावतें. बीजरूपानें असणाऱ्या बुद्धीस अंकूर फुटून त्याचा वृक्ष वाढला नाहीं व सफल झाला नाहीं तर शिक्षणाचा काय उपयोग! शिक्षण व्हावें तसें होण्यास शिक्षक मोठा चतुर, व कळकळीचा असला पाहिजे. त्यानें आपल्या विद्यार्थ्यांस प्रेमानें आपलेंसें करून घेतलें पाहिजे. कोणताही विषय शिकवितेवेळीं अनेक साधनांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रितीनें उपयोग करून तें त्यांस समजावून द्यावयाचें त्याचें प्रतिबिम्ब त्याच्या मनावर ठसविलें पाहिजे. आणि कोणतीही शिकविलेली गोष्ट त्यांस समजली ह्मणजे त्यांच्या मनांत सहज आनंद व आश्चर्य उद्भवतात आणि असें झालें ह्मणजे त्या विषयास अनुसरून त्यांस जिज्ञासा उत्पन्न झाल्यानें ते शिक्षकांस प्रश्न विचारूं लागतात. अशा प्रसंगीं त्यांच्या जिज्ञासेस प्रतिबंध न करितां त्यांच्या प्रश्नांचीं फार काळजीनें व कुशलतेनें उत्तरें देऊन समाधान करून त्याची जिज्ञासा तृप्त करावी. या प्रमाणें केल्यास त्याच्या बुद्धीस चलन दिलें असें होतें. परंतु बुद्धि बरोबर इतर अवयवांस ही चलन देणें जरूर आहे. उदाहरणार्थ, चित्रकलेनें त्याचे हातास व नजरेस शिक्षण मिळतें. वर्णोच्चारादि स्पष्ट करविल्यानें त्याच्या जीव्हेस आणि तंतुवाद्य ध्वनीनें त्याच्या कानास चलन मिळतें. अशा प्रकारें बुद्धीस व इतर इंद्रियांस चलन देऊन त्याचा स्वाभाविक कल कोणत्या विषयाकडे आहे हें पाहून त्याचा पुढील शिक्षणक्रम तदनुसार ठेवावा.

हल्लींच्या इयत्तांत कोणकोणते फेरफार केले पाहिजेत अशा विषयीं मी आपल्या समाजाचा अभिप्राय विचारला होता. या माझ्या सूचनेवर आपला विचार कळला असता ह्मणजे मला तदनुसार व्यवस्था करण्यास ठीक पडलें असतें. साधारणपणें कोणत्याही इयत्तेचा अभ्यासक्रम इतका असावा कीं त्या इयत्तेंतल्या विद्यार्थ्यांस चांगल्या शिक्षकास एका वर्षांच्या अवधींत सर्व विषय नीट शिकविता यावेत. एका वर्षांत योग्य रितीनें शिकविले न जातील इतके ज्यास्ती विषय नकोत. तसेंच मुलांच्या व मुलींच्या इयत्ता निराळ्या पाहिजेत असें कांहीं जण ह्मणतात पण तो विचार शेवटील चार इयत्ता संबंधानें मला संमत नाहीं. साधारण लेखन, वाचन व हिशोब मुला मुलींस सारखेच आवश्यक आहेत. मुलींस कांहीं निराळें शिकवावयाचें ह्मणजे इतकेंच कीं त्यांच्या इयत्तांच्या अभ्यासांतून शिवण काम, रांगोळी घालणें, नक्षी काढणें वगैरे हस्तकौशल्याच्या व संसारांतल्या गोष्टी शिकविल्या जाव्यात. पण इयत्तेचा अभ्यास संभाळून नंतर या विविध कला शिकवाव्यात ह्मणजे मुलींच्या मनाची रमणूक होऊन त्यांस अभ्यास व उद्योग करण्याची चांगली संवय लागेल. या इयत्ता संबंधानें दुसरा एक उपप्रश्न असा आहे कीं हिंदुस्थानी मुलास मराठी शिकण्याची आवश्यकता आहे कीं काय. आमच्या मतें या प्रांतीं मराठी शिकण्याची जरूरी आहे. मूळ सरकारी दप्तर मराठींत चालतें. तेव्हां मराठी लिहितां वाचतां येत नाहीं असें केवळ ह्मणून सरकार दरबारांत निभाव लागेल असें नाहीं. मुसलमान लोकांस इतर लोकांप्रमाणें सरकारी चाकरीच्या जागा पाहिजेत तर त्यांना मराठी लिहिणें वाचणें शिकलें पाहिजे. तसें ते शिकले नाहींत तर त्यांस नोकरी चाकरी चांगली व इतर लोकांच्या बरोबरीनें मिळणार नाहीं.

आमची तिसरी सूचना परीक्षेच्या चालूं पद्धती संबंधानें होती. परीक्षेच्या शिस्तीवर सब शिक्षण क्रमाचें धोरण अवलंबून असतें. जर्मन लोक या विषयीं असें ह्मणतात कीं जसे परीक्षक तशी शाळा. ही त्या लोकांची ह्मण खरोखर अगदीं यथार्थ व बिनचूक आहे. ज्या धोरणाचे व तऱ्हेचे प्रश्न परीक्षक घालतात त्याच नमुन्यावर मास्तर लोक विद्यार्थ्यांस शिकवीत असतात. मुलांस अधीक चांगला अभ्यास करण्यास व शिक्षकास पूर्वी पेक्षां विशेष चांगलें शिकविण्यास ज्या परीक्षेच्या योगानें योग्य उत्तेजन मिळेल ती मी चांगली परीक्षा समजतों. परीक्षेचे प्रश्न फार सोपे नसावेत व फार कठीण ही नसावेत आणि ते प्रश्न इयत्तेच्या विषयांच्या बाहेर नसावेत. अशा तजवीजेनें परीक्षा घेतली ह्मणजे त्या परीक्षेंत शेंकडा एक तृतियांश मुलें पसार झालीं तरी आमच्या मतें पुष्कळ आहेत. चांगल्या परीक्षेंत इतकी देखील मुलें जेव्हां पसार होत नाहीत तेव्हां फक्त दोन कल्पना करितां येतील मास्तर लोक खेळले असावेत आणि त्यामुळें मुलांचे अभ्यास नीट व संपूर्ण झाले नसावेत. किंवा परीक्षक वाईट असले पाहिजेत. मास्तरांनीं विषय कसे काय शिकविले आणि विद्यार्थ्यांची त्या त्या विषयांत कितपत प्रवेश झाला आहे हें चांगले परीक्षक नेहमी ताडीत असतात. आणि त्यांच्या परीक्षेचा कल विद्यार्थ्यांस अभ्यासाची गोडी लागेल असा असतो व तशा परीक्षणानें शिक्षकांस अधीक हुरूप व उमेद येते. या प्रांतीं चांगल्या शाळेची कल्पना फार मोठी आहे. शेंकडा ६० विद्यार्थी पास झाले तर त्या शाळेला चांगली ह्मणून जाणवतात. आमचें प्रमाण पुष्कळ कमी ह्मणजे शेंकडा ३० आहे. आह्मास कबूल आहे कीं परीक्षकांनीं लांबलचक इयत्तेच्या बाहेरचे, किंवा क्लिष्ट प्रश्न घातले ह्मणजे शिक्षकांच्या कामाचें चीज होत नाहीं. आणि मुलांस अभ्यास करण्यास उत्तेजन येत नाहीं. पंचवीस तीस मुलें पाठवून दोन दोन मुलें पास झालीं तर चांगल्या इमानी शिक्षकांचा व होत करू व अभ्यासी मुलांचा किती हिरमोड होत असेल बरें! परंतु माझ्या अनुभवाप्रमाणें परीक्षकांना दोष देण्यापेक्षां शाळेच्या कामाकडे दोष देणें कित्येक वेळां बरोबर असतें. हायस्कूलची वार्षिक परीक्षा घेतल्या नंतर आमच्या लक्षांत आलें कीं कांहीं विषयांत शेंकडा एक दोन विद्यार्थी पसार झाले आहेत! अशा कामाची चूक दोन रितीनें दाखवितां येईल. शिक्षकांची आपापल्या कामांत हयगय झाली पाहिजे किंवा परीक्षा कठीण असावी. दोष कोणाचाही असला तरी एकंदरीनें गोष्ट वाईटच. ताटांतलें वाटींत काय किंवा वाटींतलें ताटांत काय. पण त्याचा सारांश एकच दिसतो. खऱ्या व योग्य मापानें शिक्षकांच्या कामाची मोजणी होणें इष्ट आहे आणि हें काम फार जबाबदारीचें आहे. प्रत्येकानें आपल्या बुद्धी प्रमाणें प्रामाणिकपणानें वागावें व कर्तव्य बजवावें ह्मणजे सर्व गोष्टी सुयंत्र होतात.

सांप्रतच्या स्त्रीशिक्षणा संबंधानें समाजाचा विचार घेण्याचा मनांतून फार होतें. ही आमची समाजाला चौथी सूचना होती रा. रा. गणेश रामचंद्र दामले यांनीं 'कर्तव्य' या विषयावर लिहिलेला जो निबंध आपल्या पुढें वाचण्यांत आला तो फार सुरस होता. फार परिश्रम घेऊन तो लिहिला होता. त्यांत स्त्रीशिक्षणाचें महत्त्व उत्तम प्रकारें व खुलावटीनें स्पष्ट करून दाखविलें आहे स्त्रीशिक्षणाची योग्यता आपणा सर्वांस माहित आहेच आणि त्याच्या आवश्यकते विषयीं दोन विचार कोठेंच आढळणार नाहींत. स्त्रिया चांगल्या शिकल्या सवरल्या शिवाय आपला देश उर्जित दशेस येणार नाहीं. घर सुखी व आनंदी असण्यास प्रधान कारण प्रत्येक कुटुंबांतील स्त्रिया असतात. शिकलेली आई ज्या घरीं असेल तें घर चांगलें सुधारेल. मुलांचें बालपण चांगल्या गोष्टी शिकण्यांत जाऊन गृहशिक्षण भावी सर्व कल्याणाचा व आनंदाचा पाया घालतें. मी आपल्या स्वतांच्या अनुभवावरून सांगतो कीं गृहिणी चांगली शिकलेली असली ह्मणजे घरच्या व्यवस्थेकडे व खर्चावेंचा कडे कांहीं बघावें लागत नाहीं. सर्व काम बिनबोभाट चालून आपणास संसाराची काळजी वहावी लागत नाहीं. स्वयंपाक करण्यांत व घरच्या हर एक गोष्टींत शिकलेली बायको चांगली मदत करिते, आणि सर्व संसार नीटनेटका चांगल्या रंगारूपास आणिते. असे नानाविध फायदे स्त्रीशिक्षणापासून आहेत ते येथें सांगण्यापेक्षां आपणास अनुभवानें व कल्पनेनें त्यांचें शतपट मोल कळून येईल. चोळी, आंगडी, कशिदा वगैरे कामें करितांना. स्त्रियांस पडली व तिनें अशाच उपयुक्त गोष्टींचा व्यसंग लावून घेतला तर मनाला किती आल्हाद व उल्हास वाटतो! अशा कोटींतल्या स्त्रिया उभय कुळाला शोभवितात आणि त्यांच्या योगें घराण्याचें नांव लौकिकाला चढतें. आतां हें खरें कीं स्त्रीशिक्षणाचें काम खर्चाचें आहे. हा खर्चाचा बोजा संभाळण्या इतकें हें खातें पैसेवाले नाहीं. पैसा नसला ह्मणजे सर्वच अडचणीस प्रारंभ होतो. पैशाचे सामर्थ्य पाहून त्या भांडवलाच्या अंदाजानें या शिक्षणाचा प्रसार आह्मास क्रमशः व धिराधीनें केला पाहिजे. मुलांच्या शाळा प्रमाणें गांवोगांव मुलींच्या शाळा पाहिजेत. आणि निदान पक्षीं पन्नास साठ रुपये शाळेमागें लागतील तेव्हां एवढा खर्च संभाळणें संध्या साध्य नाहीं. तथापि जीं साधनें अनुकूळ आहेत तेवढ्यामध्येंच साधेल तितका कार्य भाग साधून घेतला पाहिजे. ज्या ज्या गांवीं मुलांच्याच शाळा आहेत तेथें मुलींही येऊं द्याव्या आणि अशा प्रकारें स्त्रीशिक्षणास प्रत्येक शिक्षकानें मदत करावी. मुंबईकडे मुलांच्या शाळांतून मुलांच्या बरोबरीनें किंबहुना अधिक मुली शिकतात असा आमचा अनुभव आहे तेव्हां या दिशेनें जो कोणी प्रयत्न करील व स्त्रीशिक्षणास उत्तेजन देईल त्यांस कामाच्या मातबरी प्रमाणें आम्ही योग्य बक्षीस देऊं आणि हें अभिवचन आह्मी मोठ्या आनंदानें या समाजद्वारें सर्व शिक्षकवर्गास कळवितों.

नीतिशिक्षणासंबंधानें पुष्कळांचे पुष्कळ विचार आहेत. पण आम्ही त्या सर्वांचे सार इतकेंच घेतो कीं जो चांगल्या रितीनें वागतो तो नीतिमान. पुराणें ऐका, कथा ऐका, अमुकच शास्त्रें पठणकरा म्हणजे नीतिवंतच व्हाल असें आमचे मत नाहीं. कोणास नीतिमान व्हा म्हटल्यानें ते तसे होतात असें विरळा! अक्षरें वळविण्यासाठीं जसें रानड्यांचे किंवा आंतुरकरांचें कित्ते मुलांपुढें आपण ठेवितों त्याप्रमाणें आईबापांनीं व इतर वडिलधाऱ्या लोकांनीं मुलांपुढें सुनीतीचें नमुने मांडले पाहिजेत. साधारण क्षुल्लक गोष्टी ध्या शिक्षकानें आंगरखा मोकळा टाकला तर मुलें तसें करूं लागतात. तेव्हां मुलांच्या पालन कर्त्यांनीं व शिक्षकांनीं आपल्या सुनीतीच्या कित्यानें मुलास चांगलें वळण लावून दिलें पाहिजे. सुनिती किंवा साधुपणा कोठें शोधावा लागत नाहीं. चांगल्या गोष्टी जो करितो तोच आमच्या मतें उत्तम मनुष्य आपलें कर्तव्य आपण ओळखावें आणि परिश्रमानें त्या कर्तव्यात अंतर हूं देऊं नये ह्मणजे त्याच चांगल्या वागणुकीचे मुलास स्वाभाविक कित्ते व नमुने मिळतात आणि आमच्या एवढा प्रयत्न पुष्कळ झाला.

शारीर शिक्षणा संबंधानें आमच्या दृष्टीस अनास्था व निष्काळजीपणा दिसून पडतो. तालीम मास्तरांची कमरता आहे, तालिमीचें सामानसुमान पुरेसें नसतें, आणि विद्यार्थ्यांच्या मनाचा कल कसरतीकडे नसतो. अशा कारणानें या बाबतींत अद्याप चांगलेंसें यश नाहीं. निदान हायस्कूलांत व ट्रेनिंग कालेजांत १५०।२५० मुलें शिकतात. तेथें एक स्वतंत्र शिक्षकाची नेमणूक असावी. शिवाय मुलांवर थोडी बहुत सक्तीही केली पाहिजे. खरोखर सक्ती ही केली पाहिजे. खरोखर सक्ती असल्या शिवाय काम चांगलें उठत नाहीं. मनुष्य स्वभावच असा आहे कीं थोडीशी सक्ती व मनाला कांचणी असल्या शिवाय आपण कोणत्याच कामांत योग्य परिश्रम घेणार नाहीं. हल्लीं एकेक फिरता तालीम मास्तर असतो. एकट्याच्यानें काम चांगलेंसें होणार नाहीं. निदान प्रत्येक तालुक्यामागें एक एक शिक्षक असावा. जर शरीर उत्तम नाहीं तर विद्या चांगली व्हावयाची नाहीं. उत्तम शरीर तर उत्तम मन आणि त्याच्या योगानें उत्तम काम ही गोष्ट आपण लक्षांत ठेवा.

धंदे शिक्षणा संबंधानें आमची शेवटली सूचना होती. बहुतेक सर्वत्र धंदेशिक्षणाचा लोपच झालेला आढळतो. परंतु आह्मास कळविण्यास संतोष वाटतो कीं राव बहादूर जठार यांची सूचना मंजूर होऊन आली आहे आणि तदनुसार अशी शाळा लवकरच करणार आहों. आपल्या देशांत धंद्यांची कमतरता आहे हेंच आपल्या देशास निकृष्ट दशेस येण्यास मूळ कारण आहे. शिवाय हल्लींच्या शिक्षण क्रमानें धंदे शिक्षणाविषयीं नावड उत्पन्न केली आहे. शिक्षणाची खरी किंमत फार थोडेजण ओळखतात कांहीं गोष्टी अशा देखील पाहण्यांत आल्या आहेत कीं कांहीं मुलें घरचीं खाऊन पिऊन सुखी, व त्यांच्या घरचा, पिढी जादा धंदा शेतकीचा; परंतु तींच मुलें पांचवी सहावी इयत्तेपर्यंत शिकलीं ह्मणजे शेती वाडीचा कंटाळा करितात इतकेंच नाहीं तर त्यांना त्यांचे कुणबाऊ शेतकामावरील आईबाप देखील शोभत नाहींत असें वाटतात. देशमुख व देशपांडे यांच्या घराण्यांतील मुलांच्या या

चनलेल्या भयंकर समजुती पाहून हल्लींच्या विद्यादानाविषयीं आमचें मन फार साशंक व चिंताक्रांत होतें. शिवाय लोकांची वेडी समजूत असते कीं लोहाराचें किंवा सुताराचें काम शिकलें ह्मणजे त्या ब्राह्मणाला लोहार किंवा सुतारच बनलें पाहिजे. वस्तुतः तसा कांहीं प्रकार नाहीं. आपल्या हात पायादि अवयवांच्या ज्या नाना शक्ती आहेत त्यांना चलन देऊन काम करण्याचें वळण लाऊन घेतलें पाहिजे. श्रम व उद्योग करण्याची शरीराला संवय पाहिजे आणि अशा संवयीनेंच आपणाला कांहीं उद्योगधंदा येऊंलागेल. हजारो विद्यार्थी म्याट्रीक्युलेशन वगैरे परीक्षा देतात आणि सर्वांची भिस्त नोकरी चाकरीवर असते. मोठ्या पराकाष्ठेनें शेंकडा ४।५ जणांस मिन्नतवारीनें, वशिल्यानें, व काका मामा आजा वगैरे नात्याच्या संबंधानें सरकारी चाकऱ्या मिळतात परंतु बाकींच्या सर्वजणांची निराशा होते. तेव्हां आपल्यास निर्वाहाची कांहीं तरी खटपट करणें जरूर आहे आणि सध्या इतर व्यापारांत व धंद्यांत पडल्या शिवाय निभाव नाहीं. आह्मी उमरावतीस जी धंदे शिक्षणाची शाळा काढणार आहों तशी प्रत्येक जिल्ह्या मागें तरी निदान पाहिजे. अशा शाळेला सरासरीने पांच हजार रूपये खर्च येतो. उमरावती म्युनसिपालिटीनें या शाळेला जागा चांगली लांब रुंद व सोयस्कर दिली आहे. तेथें यश आलें तर अकोल्यासही कांहीं खटपट करितां येईल. तूर्त अमेरिकन मिशनची जी शाळा आहे तिचा आपण साधेल तेवढा उपयोग करून घेतला पाहिजे.

येणें प्रमाणें वरील सात विषयावर आम्ही आमचा अभिप्राय आपणास कळविला.

कोणी आपलें कर्तव्य कसें बजवावें हें कांहीं सांगून समजण्या सारखें नाहीं. अंतरीचीच कळकळ व आस्था पाहिजे आहे. यद्यपि कांहीं ठोकळ नियम घालून देण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. गेल्या मार्चच्या २६।२७ तारखेस एक सर्क्युलर काढून तें शाळा पत्रकांत प्रसिद्धही केलें आहे. या आमच्या हुकुमा संबंधानें चांगल्या चांगल्या जमेदार शिक्षकांची नीटशी समजूत पडत नाहीं. अशा ग्रहस्थांस आमचे एवढेंच सांगणें कीं त्यांनीं त्या नियमा प्रमाणें वागून पहावें आणि नंतर तक्रार आणावी. उदाहरणार्थ, लहान लहान मुलांस मोठी ठळक ठळक पण चांगली वळणदार अक्षरें काढता येतील किंवा नाहीं हें पहाण्यासाठीं मी आपल्या सहा वर्षांच्या मुलास शिकवून पाहिलें. प्रयत्नां अंतीं चांगलें यश आलें. तेव्हा सारांश हाच कीं नियमाप्रमाणें वागून पहा म्हणजे आपली खात्री होईल. आमच्या म्हणण्याचा असा अर्थ नाहीं कीं आम्ही म्हणतो तेंच चांगलें. तसा खोटा अभिमान मी धरीतच नाहीं ज्यांस जो उपाय सूचेल त्यांनीं तो सांगावा आम्ही त्यांचें आनदानें ग्रहण करूं. आपण सर्वजण एका जाहजांत बसलों आहों वादळ तुफान वगैरे वाटेनें होतील त्याच्या कचाट्यांतून जो बंदराला सुरक्षितपणें आणील तोच आमचा उत्तम सुकाण्या होय. सारांश, सर्वांनीं आपलें कर्तव्य स्मरलें पाहिजे. आपण सर्वजण परमेश्वराजवळ जबाबदार धरले जाऊं. चाळीस नाहीं. तर तीस रुपये पगार असला म्हणून हरकत नाहीं. कमी पगार असला तरी दररोज ५।६ तास चांगलें कसून काम केलें पाहिजे. असें काम करणाऱ्यांस परमेश्वर कृपेनें यश कांहीं लांब नसते हल्लींच्या इंग्रजा सारख्या न्यायीः राज्यांत आपण उपाशी मरूं लागलों तर तो दोष आपला आहे. आपापलें कर्तव्य बजावा म्हणजे शाळा खात्याची सुधारणा कांहीं अशक्य नाहीं.

# The Berar Samachar

MONDAY NOVEMBER, 26, 1894

## SPEECH FROM THE DIRECTOR OF PUBLIC INSTRUCTIONS

In our last issue we have freely given our opinion on the speech of Raosahib Patwardhan. The speech from an officer at the Head of any of the administrations of the Province is to us poor subjects something like the Forbidden Fruit. The speeches of the previous Directors never aimed at enlightening the teachers to whom they were dilivered on any particular points. The present Director was very open, frank and morally confident. His speech will certainly impose silence on Envy herself. We have summed up his speech in our Vernacular columns and we need not do it in these, though, we fain would have done it. Such a speech unites, with the expressions of a high educational officer, the rare charm of a speech from the highest literary head in the province. We may compare it with the yearly speeches of the Vice—Chancellors of the various Universities from a literary point of view and yet we may compare it with the solemn business like expressions of high and responsible officers explaining their policy. We, therefore congratulate Rao Sahib Patwardhan on having so forcibly done justice to his twofold functions. A rigid adherence to one of these two important elements forming the most important ingredients of the caldron may be had for the asking. But for that fitting and appropriate, bold and confident assertion of the good and vigorous working of the department blended with earnest expressions infusing zeal in every one present and particularty among the masters to whom it was poincipally directed we know not where else to look. By pointing to what may be done towards female education, towards technical education towards moral and physical education we certainly were taught that our energies can be still better directed towards each one of these. His advice to the masters, differing widely from the stereotyped rubric style in which it was hitherto expressed, must have inspired confidence in them that their merit wherever it would be found would be recognised and would never go wantonly unrewarded.

The cause of education and especially that of State Education has claimed the most serious attention from times long past of philosophers like Bacon, Spencer, AdamSmith Reausseau, and several others. For its better maintenance and diffusion it is the most sacred duty of the officer called on by Government to keep those, through whom he seeks to further such a cause contented. Rao Sahib Patwardhan has certainly done ample justice to every thing that has been done by the Deartment. He has in so short a time grasped all the weak and strong points lurking under it. He has also suggested and planned various methods for improving and building up the weak points without eradicating the adjacent merits indissolubly blended with them. Nothing can be more landable in an officer. We admire his zeal; we admire his earnestness; and we admire his singleness of eye and rectitude of purpose.

We think every one present, on the afternoon of Saturday the 17th Instant, out of a large audience of over five hundred citizens anxiously swarmed in a small public school which then had in it besides themselves, the members of the Department, gathered together on purpose, and several school boys and less eminent portion the town, would go in perfect harmony with the Raosahib, and would admire the evenhanded justice with which he dealt castigation to right and left on those whom he almost rightly considered to be remiss in their work.

The Indian Educational Departments have to work against odds unknown to the West. Their hands are tied. Private enterprise is characteristically wanting though towns like Poona, Bombay, Lucknow, Calcutta, Benaras and a few others are taking a move in this direction. It is therefore natural, that an officer in whose hands is vested the real and material advancement of the various units of a nation should be restlessly anxious to see that his subordinates are doing their duty properly. So far we go in perfect harmony with the Raosahib. But we hasten to a part of his speech, which, though it abounds in valuable remarks well deserving to be attentively considered by those for whom they were intended, and though it was like the rest evidently uttered in a spirit of perfect impartiality appears to us in many points objectionable. Except this we may say once for all we go in perfect harmony with Raosahib and have reason to congratulate ourselves on having in him a gentlemen so eminently fitted to have the vital interest of the Province rested in him.

Raosahib admits that low starts are given to graduates the glory of the Department. No doubt such men, if nct exposed to the hourly and unseeming interuptions of a mercenary aristocrtical and high handed official superior, are capable of more completely seasoning the minds of their pupils. The Director said they got or rather accepted such low salaries in their sore need and must work for their bread. So far we see no reason to disagree with him. A waiver whether a graduate or not deserves reprimand for any omission of duty when its effects are to be visited on poor innocent boys, guilty in nothing else except in their teachers. Raosahib acknowledges their importance, pays a tribute to their learning and merits; but appears unconsciously to take advantage of their weakness. We are certainly far from thinking that a Director so conversant with the human nature and with the nature of his own solemn and sacred trust will ever wish to keep them discontented. The disregard which has been shown eversince his assuming the reins of this department for their claims to promotions and preferments may be easily reconciled with his emphatic expressions. Graduates or any one else entering his department may be entering it on a strict understanding that they will never be passed over if they are working well, and vigorously; and may be doing it with an infinite confidence in the actual or presumptive senses of justice and mercy of the Director himself. It appeared that the Director was apprehensive that some of such people were discontented. In our opinion discontent particularly among the servants of an Educational Department is an evil which can never be too exaggerated. If they feel a deadly hatred to their department they certainly deserve to be kicked out. But in fact their feeling can not be such. It is precisely what, in the circumstances in which they have been placed, it would have been. But even if the alleged facts are admitted, the graduates or others are not the only people who have preferred any other department to the educational department. The feeling of duty and devotion to work and predilection for official superiors when a service is in a healthful state springs up by a natural and inevitable association, in the minds of public servants, earning their bread from it, knowing as they do that they owe all their comforts, and pleasures to the bonds that tie them together. But under a partial and oppressive administration these associations can not have that strength which they acquire in a better state of things. There is no feeling which more certainly developes itself in the minds of men living under tolerably fair administrations than the feeling of contentment. The feeling of content among any class of public servants is akin to the feeling of patriotism. Since the beginning of the world, there never was any nation or any large portion of any nation, not cruelly oppressed, which was wholly destitute of that feeling. To give room to the thought that a certain servant is disaffected is a logic which the wolf employs against the lamb. It is accusing the mouth of the stream of poisoning the source. If the interests of every servant of the department no matter however insignificant are scrupulously guarded by their head, their guardian angel, and their safeguard against all oppression and terrorism, on this account and on this account alone there can be no such thing as discontent or disaffection.

If any body is disaffected and does not look upon the department as a mother, it is because the department treats him as a step—mother and is unkind to him.

Heads of any administration and particularly native heads, whom we long for and prefer to our European ones never in touch even with their nearest subordinates who are often treated with more aversion than one feels for vipers or toads, should not be thus suffered to

( पुरवणी पहा )

## कानळापासून सोनें.

लंडनच्या टांकशाळेंतील धुराड्यांत जें कानळ सांचलें होतें, त्यांतून १८८५ सालीं सुमारें ७० पौंडांचें सोनें निघालें. तसेंच दोन चार वर्षांपूर्वीं बर्लिन येथील रॉयल मिंटच्या धुराड्या मधून २०० पौंड किंमतीचें सोनें निघालें. राफेल आणि सन्स कंपनीचा सोनें शुद्ध करण्याचा कारखाना ( हा कारखाना सर्व जगांत अति मोठा आहे ) आहे, त्यांत एका वर्षांत सांठलेल्या कानळापासून ६०० पौंड किंमतीचें सोनें निघालें. तसेंच १८९० सालीं सोनेंरुपें शुद्ध करणाऱ्या एका कंपनीनें आपला कारखाना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेला. तेव्हां पूर्वीच्या ठिकाणचें धुराडें खालीं काढलें व मट्टीपासून धुराड्यापर्यंतचा जो वेगदा असतो तोही खणून काढला तेव्हां वरच्या कानळापासून व खालच्या मातीपासून मिळून १,००,००० पौंड किंमतीचें सोनें सांपडलें.

## गहाण टाकलेलें शहर

घरें गहाण टाकतात, दागिने गहाण टाकतात, शेतवाडी गहाण टाकतात, पण शहर गहाण टाकल्याचें एकच उदाहरण आहे १८०३ सालीं स्वीडन देशानें बाल्टिक समुद्राच्या किनाऱ्यावरचें विस्मान हें शहर मेक्लेन बर्गच्या ड्यूकपाशीं बऱ्याच रकमेला गहाण ठेवलें. गहाणखातांत अशी शर्त आहे कीं, शंभर वर्षांनीं ती रक्कम सव्याज परत केल्यास तें शहर परत द्यावें. हल्लीं ती रक्कम कित्येक कोटीपर्यंत वाढली आहे. तेव्हां ती रक्कम मुदतींत परत होण्याची आशा नाहीं, तेव्हां अर्थांत तें शहरही स्वीडनला परत मिळावयाची आशा नाहीं. हा विलक्षण दस्तैवज झाल्यापासून तेथील म्युनिसिपालिटीच्या खोल दप्तरांत पडून होता, तो नुकताच, त्या शहरीं कस्टमखात्याला बंदराकरचीं कांहीं जमीन द्यावयाची होती, ह्मणून बाहेर निघाला होता. व तेव्हांच ही हकीकत बाहेर आली.

जर्मनींतील बर्लेनेम येथील प्रसिद्ध शिल्पगार हरनोल यानें एक घड्याळ तयार केलें आहे. आहे. त्याला एकदां किल्ली दिली ह्मणजे तें नऊ हजार वर्षें चालेल अशाबद्दल त्यानें खात्री केली आहे ( नऊ हजार वर्षें पर्यंत तें चालेल कीं नाहीं हें पहाण्यास सुमारें दोनशें पिढ्या तरी गेल्या पाहिजेत ) डि० एल० गाफ नांवाच्या एका श्रीमान अमेरिकन गृहस्थांच्या दिवाणखान्यांत एक घड्याळ आहे, ते घड्याळ जों पर्यंत त्या वाड्यांत माणसें राहत तोंपर्यंत तें चालत राहणार. कारण त्याच्या किल्लीची अशी रचना केली आहे कीं वाड्याचा पुढला दरवाजा उघडला किंवा लावला कीं, त्याला किल्ली मिळावी. यामुळें वाड्यांत येणारा किंवा जाणारा प्रत्येक गृहस्थ त्याला किल्ली देण्याचें काम करतो. कालिफोर्निया प्रांतांतील फ्रेसनो येथील टी० जी० फास नांवाचे गृहस्थानें एक घड्याळ अशा रीतीनें बनविलें आहे कीं, पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणानेंच त्याला किल्ली मिळावी, यामुळें तें सतत घड्याळ चालेल असें त्याचें ह्मणणें आहे. या घड्याळाला एक कांचेची तबकडी आहे, व ती त्या दिवाणखान्यांत तक्तपोशीला अडकवून ठेविली आहे व त्या घड्याळाचें जें काय दृष्टीस पडतें तें दोन कांटे मधल्या दांडा व तबकडी हें होय. या खेरीज कांहीं दिसत नाहीं. लीडस ( इंग्लंड ) येथील मि० जे० स्मिथ नांवाच्या मनुष्यानें १८४० मध्यें एक घड्याळ तयार केलें. त्याला किल्ली देण्याचें काम विजेनें होत असे. तें घड्याळ हल्लीं चालत आहे. तो गृहस्थ १८९० त मेला. मायेन्स येथें सेंट क्रॅटिनच्या देवळांत जें घडयाळ आहे तें ५०० वर्षांच्या अवधींत फक्त एकदां बंद पडलें होतें. करमणूक.

चीन व जपान यांजमध्यें समेट करण्याच्या कामीं इंग्लंड शिवाय बाकी कोणी तयार नाहीं. इटाली अर्धीमुर्धी तयार आहे. परंतु जपानची इच्छा या कामीं कोणी मध्यस्ती करूं नये अशी असावीसें दिसतें.

भयंकर आग— अमेरिकेंतील न्यू आर्लिन्स बंदरांत मोठी आग लागून अठ्ठाविस हजार गाठडी इतका कापूस जळाला. यापैकीं पुष्कळ कापूस लिव्हरपूलसाठीं खरेदी केलेला होता.

लंडन टाइम्सनें एक निबंध लिहून, जपानास अशी तासीद दिली आहे कीं, चीनवर आपल्यास निरंकुश वर्तन करण्यास सांपडेल असें जपाननें बिलकूल समजूं नये.

डिसेंबरच्या १५ व्या तारखेस शिंदे सरकारास राज्याधिकार मिळणार.

पारीस येथें एक अतिरुपवान स्त्री आहे. तिला अनेक प्रदर्शनांत महत्वाचीं बक्षिसें मिळालीं आहेत. तिच्या मोहक सौंदर्यदर्शनासाठीं, तिच्या घराभोंवती शेंकडों माणसांची दाटी असते. व त्यापासून त्रास होऊं नये म्हणून पोलीसाचा सक्त पहाराही असतो.

मनुष्याला हवेंतून उडतां येईल असें एक यंत्र अमेरिकेंत तयार झालें आहे. त्याचा विशेष प्रसार होण्यासाठीं तें यंत्र काढणारा पेटेंट मिळविणार आहे.

माडागास्करवर हल्ला करण्यासाठीं फ्रेंचची तयारी चालली आहे.

बंगालयाकडे विक्रमपूर येथें एका शेतांत ऊस आला आहे, त्यांची उंची १२ हात असून, जाडी १ फुटाची आहे.

येत्या कांग्रससाटीं पार्लमेंटचे मेंबर मि० ऑल्फ्रेड वेब यांची अध्यक्षांच्या जागीं योजना झाली आहे.

पंजाब व त्यांतही विशेषें करून लाहोर येथें तापाचा जोर फार वाढला आहे.

रावळपिंडी येथील जुना किल्ला पाडून तेथें दुकानें बांधण्याचें काम चालू आहे. स० वि०

मिस कार्नेलिया सोराबजी बाईस बडोदे संस्थानांत वकिली करण्याची परवानगी मिळाली. स्त्री वकील झाल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे. क० त.

## नोटीस

नोटीस बेशमी कृपाराम पन्नालाल मारवाडी दुकान वडनेर गंगाई तालुके दर्यापूर यांस खालीं सही करणार यानकडून नोटीस देण्यांत येतें कीं कसबे मनकूर येथील शेत सर्वे नंबर ४३५ याचें खातें तुमचे नांवें असून तें शेत मी तुम्हा पासून पांच ५ वर्षां करितां वहितीस कबूल करून दरसाल मालकी बद्दल रुपये ७५ देण्याचें कबूल केलें व ५ वर्षांचे मालकी बद्दल एकंदर रकम रुपये ३७५ बद्दल वहीवर तिकिट लावून सही करून दिली त्या प्रमाणें २ साल शेती वहून १ सालचे रुपये ७५ व गुदस्त सालचे रुपये १४ दिले गुदस्त साला पैकीं रुपये ६१ देणे आहेत. तसेंच साल मनकूराहीं शेताची किस्तकारी मीच करून पळाटीचें व तुरीचें पीक उभारणीस आणिलें व वेचणी सुरू केली असतां तुह्मी जबरदस्तीनें शेतांतील कापूस पहिलें व दुसरें वेंचाचा वेचून नेला. व पुढेंही त्याच प्रमाणें नेणारच आहा. सबब नोटीस देण्यांत येते कीं सदहूं शेतांत अजमासें सहा खंडी कापूस व एक खंडीभर तूर निघेल, असे एकंदर रुपये २३० चें उत्पन्न होईल व तुमचें देणें सालमनकूरचें मालकी सुद्धां रुपये १३६ वजा जातां बाकीं रुपये ९४ मला घेणें निघत आहेत. ते नोटीस पावल्या पासून १५ दिवसांत देऊन निकाल करावा. नाहीं तर या नोटिशीचे खर्चासुद्धां फिर्याद करणें भाग पडेल. मला पुढें तुमचें शेत त्रासामुळें वाहणें नाहीं. तरी शेताची वाटेल तशी व्यवस्था करावी. व माझे जवळून सही करून घेतली आहे ते रुपये जमा करावे. कळावें तारीख २० माहे नोवेंबर सन १८९४ इ०

( सही )

चिहू वल्लद आकाजी माळी
राहणार वडनेर गंगाई
दस्तुर खुद्द.

## नोटीस.

नोटीस बेशमी सखाराम वल्लद गंभीरजी सद्दार रहाणार मौजे पिंपळोद यांस खालीं सही करणार यानकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझे साक्षात आजे असून मजला एक चुलता नांमें बापुजी ह्मणजे तुमचा धाकटा मुलगा असे आहे परंतु बापुजी यांस तुह्मी आपली बहीण नांमें मनाई मर्द उदेभान यांस माझा बाप जिवंत असते वेळींच दत्तक दिला, व तो दत्तक असल्यामुळें तिची सर्व जिंदगी त्यास मिळून वारसांत जमिनीचें खातेंहि त्याचे नांवें आहे व तिच्या घरांतच तो वेगळा रहात आहे. त्याचा तुमचे जवळ असलेल्या इस्टेटीवर कांहींच संबंध नाहीं. या जिंदगीवर ह्मणजे जंगम माल व स्थावर माल, शेती जमीन व घर वगैरे यांजवर हक्क माझा आहे तसेंच ही जमीन वगैरेही वाडिलार्जित असल्या मुळेंही माझाच हक्क आहे माझे ऐकण्यांत असें आलें आहे कीं सदहूं इस्टेट तुमचे मनांतून मला राहूं न देतां बापूजी उदेभान गावंडे यांस द्यावी असा इरादा आहे सबब नोटिशीनें कळविण्यांत येते कीं ही इस्टेट मजकडेस राहूं नये या इराद्यानें कोणास बक्षीस अगर खरेदी अगर गहाण लाऊन देऊं नये अगर जमीन कोणालाही देऊं नये अगर कोणतेच रीतीनें विल्हेवाट करूं नये असें माझें आपणास सांगणें आहे. या प्रमाणें वागणार नाहीं तर तुमचेवर मला रीति प्रमाणें फिर्याद करणें भाग पडेल. तसेंच पेवदे येथील कांहीं जमीन माझें वाडिलांचे व बापूजी यांचे आईचे बापाकडील जमीन होती तीही वारस कोणी नसल्या मुळें आईचे नांवें होऊन ती मेल्यावर वडीलपणाचे नात्यानें माझे नांवें लागणें असतां दगलबाजीनें बापुजी वल्लद उदेभान गावडे याचे नांवें करविली हें मजला आतां समजण्यांत आलें आहे. त्याचाही निकाल तुह्मी आपले हातानें करावा नाहीं तर त्याचे बद्दलही फिर्याद करणें भाग पडेल. तुमचा वृद्धापकाळ झाला आहे सबब फिर्यादींचा प्रसंग येऊं नये ह्मणून आगाऊ कळविलें आहे. कळावें तारीख २१ माहे नोवेंबर सन १८९४

( सही )

रामचंद्र वल्लद जाणुजी सद्दार
पिंपळोद दस्तुर खुद्द.


## जाहिरात,

हे पाक पौष्टीक पहा, व त्वरित गुण–पण–तो मजेदार–किंमत थोडी, व फायदा ज्यास्त– हे सेवन करून अनुभव घ्या. ह्या पासून धातुवृद्धि होऊन मर्दुमी वाढते, व शक्ति स्फूर्ति व स्मरणशक्ति फार मिळेल. आणि श्रम पडून मेंदु बिघडतो तो मस्तक मेंदु तरावट होईल. हात पाय व कंबर व सर्व सांधे दुखतात तो वायु व बाळंत वायु व सर्दी हे सर्व दूर होतील. सर्व स्त्रियांस व हटकून बाळंतिनीस व तिचे रोगावर खाण्यास गूण देणार योग्य–सौभाग्यसूंट. हे सर्व आमचे दवाखान्यांत विक्रीस तयार आहेत. ज्यांना लागेल त्यांनीं रोख पैसे पाठवून अगर व्ह्याल्युपेबल पार्सलनें मागवावें. खाण्याचे रीतीचा खर्डा या सोबत देऊं. दर खालीं लिहिले वमोजी.

त्वरा करा! पांटास खा!! गेला हिवाळा येणार नाहीं!!! वाचा पहा— सालंमिश्री पाक दर १ शेरास किंमत रु० ३; बदाम पाक दर शेरास २॥८; गोखरू पाक शेरास रु० ५ पांच; कोहळे पाक शेरास रु० ४; सौभाग्य सुंट उत्तम शेरास रु० २. प्रत दुसरी—सालंमिश्री व बदाम पाक दर शेरास रुपये २.

पत्ता व सही.
शिवचरणगीर रामगीर वैद्य कुरणखेडकर
दवाखाना अकोला वऱ्हाड.

## घड्याळ.

कि. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे ( ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसविलेले आहेत ) चावी देण्यास मोगरा. कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक विलायती काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेले. या वर आमचें नांव आहे. हें खिशांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।१२ वर्षें दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. ज्यास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता–
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशीक


☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.